माउली संत श्री ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर स्वर्णमहोत्सव जयंती
महापर्वात आयोजित
'श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग – चिंतन महाप्रकल्प' निमित्ताने

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास पथदर्शी

लेखक/आचार्य : प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे

डॉ. दिलीप धनेश्वर
संयोजक/संचालक
श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

प्रकाशक
सा विद्या या विमुक्तये
वीहा पब्लिकेशन
अहिल्यानगर

**श्री ज्ञानेश्वरी अभ्यास पथदर्शी**

**Shree Dnyneshwari Abhyas Pathdarshi**

**लेखक/आचार्य**

**प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

'आई', समर्थनगर, श्रीरामचौक,

पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३

दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७

भ्रमण भाष– ९८८१५००९४२

usahasrabuddhe@gmail.com

Website - www.anilsahasrabuddhe.com

© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे

मो. ९८५०७३१६४०

**प्रकाशक** : वीहा पब्लिकेशन्स,

प्लॉट नं. २१, अजिंक्यनगर, बोरुडे मळा,

भुतकरवाडी, सावेडी रोड, अहिल्यानगर ४१४००३

**प्रकाशन क्रमांक** : पाच

**प्रथमावृत्ती** : २०२५

**टाईपसेटींग** :

श्रीपाद कुलकर्णी, अहमदनगर

मो. ९८५०२३२८९०

**मुद्रक** : वीहा पब्लिकेशन्स, अहमदनगर

**देणगी मूल्य** २००/–

सूचना : केवळ अभ्यासक, साधक यांच्यासाठी विनामूल्य

**श्री माउली ज्ञानेश्वर चरणी...**

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गातील सहयोगी अभ्यासक

**आचार्य**
**प्राचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे**

**संचालक/अभ्यासक**
**डॉ. दिलीप पांडुरंग धनेश्वर**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सौ. उषा अनिल सहस्त्रबुद्धे | १९) | सौ. सुजाता सुनील नरसाळे |
| २) | प्रो.डॉ. माहेश्वरी गावित | २०) | श्री. दत्तात्रेय भाऊसाहेब भालेराव |
| ३) | श्री. विनायक रघुनाथ पवळे | २१) | सौ. सुचित्रा दत्तात्रेय भालेराव |
| ४) | प्रो.डॉ. राजू वसंतराव रिक्कल | २२) | श्री. लक्ष्मीकांत पांडुरंग गोसावी |
| ५) | प्रो.डॉ. मच्छिंद्र केरुजी मालुंजकर | २३) | श्री. उल्हास चंद्रकांत घोडके |
| ६) | सौ. मिनाक्षी मच्छिंद्र मालुंजकर | २४) | श्री. दादासाहेब पांडुरंग वढावकर |
| ७) | श्री. श्रीनिवास गजानन आपटे | २५) | श्री. सुरेंद्र हरिश्चंद्र साळुंके |
| ८) | सौ. धनश्री श्रीनिवास आपटे | २६) | श्री. शंकर बाळू ठुबे |
| ९) | श्री. ज्ञानेश्वर लक्ष्मण महापुरुष | २७) | श्री. लक्ष्मण सखाराम जाधव |
| १०) | श्री. प्रदीप पुरुषोत्तम देवचक्के | २८) | सौ. मोहिनी लक्ष्मण जाधव |
| ११) | श्री. राम अंबादास विद्यासागर | २९) | श्री. रंगराव शामराव भामरे |
| १२) | श्री. गोरक्षनाथ संभाजी पानसरे | ३०) | सौ. ऋता मनोज ठाकूर |
| १३) | श्री. आदिनाथ भगवान जोशी | ३१) | श्री. सोपान पुंजा कदम |
| १४) | श्री. भीमराज सदाशिव पटारे | ३२) | श्री. अशोक दिनकरराव कुलकर्णी |
| १५) | सौ. मीरा भीमराज पटारे | ३३) | श्री. सयाजी कृष्णा कचरे |
| १६) | सौ. इंदु प्रभाकर खेडकर | ३४) | श्री. सुदाम दादा देवखिळे |
| १७) | श्री. संजय लक्ष्मण खेले | ३५) | श्री. यमाजी बापूराव चत्तर |
| १८) | श्री. सुहास धुंडीराज सावेडकर | ३६) | श्री. ओंकार दादासाहेब वढावकर |

# अनुक्रमणिका

| बैठक क्र. | अध्यायाचे नाव | श्लोक संख्या | ओवी संख्या | भाग संख्या | दिवस संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | अर्जुन विषादयोग | ४७ | २७५ | १ | २ |
| २ | सांख्ययोग | ७२ | ३७५ | २ | ४ |
| ३ | कर्मयोग | ४३ | २७६ | १ | २ |
| ४ | ज्ञानसंन्यासयोग | ४२ | २२५ | १ | २ |
| ५ | कर्मसंन्यासयोग | २९ | १८० | १ | २ |
| ६ | आत्मसंयमयोग | ४७ | ४९७ | ३ | ६ |
| ७ | ज्ञानविज्ञानयोग | ३० | २१० | १ | २ |
| ८ | ब्रह्माक्षर निर्देशयोग | २८ | २७१ | १ | २ |
| ९ | राजविद्या राजगुह्ययोग | ३४ | ५३५ | ३ | ६ |
| १० | विभूतियोग | ४३ | ५३५ | ३ | ६ |
| ११ | विश्वरूपदर्शनयोग | ५५ | ७०८ | ४ | ८ |
| १२ | भक्तियोग | २० | २४६ | १ | २ |
| १३ | प्रकृतिपुरुष विवेकयोग | ३४ | ११६९ | ६ | १२ |
| १४ | गुणातीत योग / गुणत्रय विभागयोग | २७ | ४१५ | २ | ४ |
| १५ | पुरुषोत्तमयोग | २० | ५९९ | ३ | ६ |
| १६ | दैवासुरसंपद्विभागयोग | २४ | ४७३ | ३ | ६ |
| १७ | श्रद्धादिनिरुपणयोग | २८ | ४३३ | ३ | ६ |
| १८ | सर्वगीतार्थसंग्रहायोग | ७८ | १८१० | १२ | २४ |
| | | ७०० | ९०३२ | ५० | १०२ |

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय पहिला : अर्जुन विषाद योग** : भ. गी. श्लोकसंख्या ४७, ओवीसंख्या २७५

**बैठक क्र. १ दि. २५/१०/२०२३ व २६/१०/२०२३**

**ब्रह्मविद्या-योगशास्त्र** शास्त्र प्रवृत्ती प्रस्ताव : भूमिकेचे सादरीकरण –

✻ श्री ज्ञानेश्वरीच्या दहाव्या अध्यायात १ ते ९ अध्याय या पूर्व खंडाची अवतरणिका दिली आहे. ओवी क्र. २४ मध्ये – 'प्रथमी अर्जुनाचा विषादु' असा पहिल्या अध्यायाचा विषय स्पष्ट केला आहे.

– ओव्यांनुसार आलेले विषय – तीन भागात विभागले आहेत.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| **भाग १ – मंगलाचरण –** | | |
| १ | ॐ व आत्मरूपांस वंदन | ॐ हे वाणीचे आद्य रूप, आत्मरूप हे अस्तित्वाचे आद्य रूप |
| २ ते २० | गणेश वंदना | षट्भूज गणेशाचे सांगरूपक भारतीय संस्कृतीची वाङ्मय मूर्ती |
| २१ | शारदा स्तवन | |
| २२ ते २७ | सद्गुरु वंदना | सद्गुरु माहात्म्य |
| २८ ते ८२ | महाभारत व भगवद्गीता माहात्म्य कथन | श्रोतृसंवाद |
| ८३ व ८४ | निवृत्तीनाथांची आज्ञा | |
| **भाग २ – युद्धक्षेत्राची माहिती** | कौरव पांडव यांची युद्ध सज्ज्ञता | संजय-धृतराष्ट्र – संवाद<br>दुर्योधन-दर्पोक्ति – संवाद<br>अर्जुन-कृष्ण – संवाद |
| ८५ ते १०२ | पांडव सैन्याचे वर्णन | |
| १०३ ते १२० | कौरव सैन्याचे वर्णन | |
| १२१ ते १२४ | कौरव व्यूहरचना अपेक्षा | |
| १२५ ते १३६ | शंख तथा गर्जना पूर्वक युद्ध सज्ज्ञता | योद्धे व शंखांची नावे वर्णन |
| १३७ ते १७४ | युद्ध सज्ज्ञतेचा वातावरणावर परिणाम, परस्पर शरसंधान, अर्जुन युद्धास सज्ज्ञ, मध्यभागी रथ नेण्यास सांगणे | व्युव्हरचना |
| **भाग ३ – अर्जुन विषाद योग** | विषादपूर्ण अर्जुनाची | पुरुषार्थ विस्मरण |
| १७५ ते २७५ | मोहलिप्त संमोहितता अवसानघात | |

## आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) वेद प्रतिपादन करणारे आद्य स्वसंवेद्य रूप कोणते? ॐ/आत्मरूप/दोन्ही-का? (२) श्रीगणेशांचे सांगरूपक विशद करा. (३) कोणकोणत्या प्रकारचा संघर्ष अनुभवास येतो? भौतिक अर्थात साम्राज्यविषयक युद्ध/भाऊबंदांतील मालकीहक्कासाठी-सूड इ. किंवा मानसिक संघर्ष किंवा तात्त्विक संघर्ष? (४) संघर्षाचे स्वरूप स्पष्ट करा. (५) प्राचीन भारतीय युद्धशास्त्रातील शस्त्रे, सामर्थ्यसंपन्न योद्धे, दलांचे स्वरूप –अश्वदल, गजदल, रथीदल, पायदल. दलाची रचना– सेनापती आणि व्यूहरचना, शंख रणभेरी इ. उल्लेख वर्णन करा. (६) अर्जुनाच्या शौर्याचे वर्णन करा. (७) अर्जुनाला विषाद का निर्माण झाला? स्पष्ट करा. (८) विषादामुळे झालेल्या अवस्थेचे वर्णन करा. (९) विषादस्थितीतील अर्जुनाने श्रीकृष्णांजवळ व्यक्त केलेले तत्त्वज्ञान कोणत्या स्वरूपाचे आहे? संन्यास वृत्तीचे/पुरुषार्थ विस्मरणाचे/मोहवशतेतून निर्माण झालेले नैराश्य प्रदर्शित करणारे की मानव्याचे? स्पष्ट करा. (१०) अर्जुनाने मांडलेल्या पाप पुण्य विचाराचे स्वरूप स्पष्ट करा. (११) ज्ञानेश्वरांनी महाभारत आणि भगवद्गीता यांची थोरवी कोणत्या शब्दात वर्णन केली आहे? (१२) ज्ञानेश्वरांच्या वाग्विलासात प्रकटलेल्या उपमा, दृष्टांत, प्राक्कथा यांचे वैविध्य सोदाहरण स्पष्ट करा. – कौटुंबिक, निसर्ग व पर्यावरणविषयक, भूगर्भशास्त्रीय, सामाजिक व्यवहार, योगशास्त्रीय, राज्यशास्त्रीय, आर्थिक, तत्त्वज्ञानात्मक इ. (१३) ज्ञानेश्वरांचे श्रोतृसंवाद कौशल्य सोदाहरण स्पष्ट करा. (१४) युद्धभूमीला धर्मक्षेत्र का म्हटले आहे? (१५) योगशास्त्राचे संदर्भ स्पष्ट करा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय दुसरा : सांख्ययोग** : भ. गी. श्लोकसंख्या ७२, ओवीसंख्या ३७५ (पैकी ओ.क्र. १ ते १८३) (भाग पहिला)

**बैठक क्र. २ दि. २२/११/२०२३ व २३/११/२०२३**

**ब्रह्मविद्या-योगशास्त्र** सांख्ययोगानुसार (दर्शनानुसार) समुपदेशन

श्री ज्ञानेश्वरीच्या दहाव्या अध्यायात १ ते ९ अभ्यास या पूर्व खंडाची अवतरणिका दिली आहे. ओवी क्र. २४ मध्ये- दुजी बोलिला योगु विशदु । परि सांख्यबुद्धिसि भेदु । दाऊनिया ।।२४।। असा दुसऱ्या अध्यायाचा विषय स्पष्ट केला आहे.

**सांख्य दर्शनाचा स्थूल परिचय** : संख्या मोजणे यापासून 'सांख्य' असा शब्द तयार झाला आहे. मात्र 'सांख्य' हे दर्शनाचे नाव असून, येथे गणिताशी या शब्दाचा संबंध नाही. 'सांख्य' म्हणजे तत्त्वज्ञानविषयक निष्कर्ष होय. सांख्य हे तत्त्वज्ञान वसिष्ठमुनी हे व्यास असतानाच्या काळातील कपिलमुनींनी शास्त्र म्हणून विकसित केले आहे. विश्वाच्या उत्क्रांतीची २५ मूलतत्त्वे ही संख्या त्यांनी निर्धारित केली आहे. हीच तत्त्वे वेदांताने स्वीकारली आहेत. ही तत्त्वे अशी- पुरुष, प्रकृति, बुद्धि तथा अहंकार, मन आणि विकार अशी (५), शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध अशा पंचतन्मात्रा (५), कान, डोळे, जिव्हा, नाक व त्वचा अशी पंचज्ञानेंद्रिये (५), हात. पाय, मुख, गुद व उपस्थ (जननेंद्रिय) अशी पंच कर्मेंद्रिये (५), आकाश, वायू, तेज, पाणी व पृथ्वी अशी पंचमहाभूते (५) = २५ मूलतत्त्वे. 'ब्रह्म' हे तत्त्व सिद्ध करता येत नाही म्हणून ते विचारात घेत नाहीत. सांख्य हे ब्रह्मकारणाने पुरुष आणि प्रकृति अशी तत्त्वे मानतात. यात पुरुष-कार्यक्षमत्व-चेतना आणि प्रकृति हे जडतत्त्व जेथे कार्य घडते असे मानतात. त्यामुळे हे तत्त्वज्ञान द्वैत मानते तरी बेदप्रामाण्य मानते. प्रकृति ही रजतमात्मक आहे. ती प्रज्ञातत्त्व, उर्जातत्त्व आणि शैथिल्य यांना जन्म देते. प्रकृति तिच्या मूळ अवस्थेमध्ये अक्षर-अविनाशी अशी मानली जाते. तर विश्व क्षर-विनाशी मानले जाते. पुरुषाच्या सहकार्याने प्रकृति बुद्धि अहंकार (स्वत्व किंवा व्यक्तिमत्त्व) तन्मात्रा आणि मन घडविते. त्याप्रमाणे प्रकृतीचे विकृति संस्कृति इ. कार्य चालते. यानुसार जीव प्राप्त कर्म अवलंबितो.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १ ते ५ | संजयाचे अर्जुनाच्या विषादाविषयी निवेदन | अर्जुनाची विषादावस्था पाहून श्रीकृष्ण समुपदेशनास तयार |
| ६ ते २९ | अर्जुनाच्या व्यक्तिमत्त्वाची आठवण | अर्जुन विषाद |
| ३० ते ६८ | अर्जुनाची मोहवशता आणि निर्णय दिग्मूढता व्यक्त | ज्ञानेश्वर अर्जुनाची दिग्मूढता श्रोत्यांना समजावून सांगतात |
| ६९ ते ८० | येथवरच्या, अर्जुन संवादावरील ज्ञानेश्वरांचे भाष्य | |
| ८१ ते ९० | संजयाने धृतराष्ट्राला अर्जुनाची स्थिती सांगितली | |
| ९१ ते १८३ | सांख्ययोग निरुपण, अंतर्भूत मायावाद | ओवी क्र. ९५, ९६, १००, १०२ त्यात सांख्य १०४ ते १४४ त्यात १४० वी ओवी मायावाद (प्रकृतिस्वभाव) १४१ पासून सांख्य १५१ (पुरुष स्वभाव) १५२ ते १७९ पुरुष आणि प्रकृति भेद व अनुबंध ज्ञानी स्थितप्रज्ञ अवस्था |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) भगवान श्रीकृष्णांनी समुदपेशनासाठी कोणते ज्ञानदर्शन निवडले? का? (२) अर्जुनाची दिग्मूढता श्री ज्ञानेश्वर कोणत्या शब्दांत वर्णन करतात? (३) अर्जुनाच्या व्यक्तिमत्त्वाची आठवण श्रीकृष्ण का करून देत आहेत? (४) श्री ज्ञानेश्वरांनी सांख्ययोग भाष्य करतांना मायेचा उल्लेख का केला आहे? (५) सांख्य योगातील पंचवीस मूळ उत्क्रांती तत्त्वे कोणती? (६) सांख्य योगातील प्रकृतिप्रक्रिया आणि मायावाद यांची ज्ञानेश्वरांनी संगती कोणत्या प्रकारे लावली आहे? (७) सांख्य हा शब्द सांख्यदर्शनात कोणत्या अर्थाने वापरला आहे? (८) सांख्य भाष्य करतांना प्रतिमा, दृष्टांत, रूपक, उपमा, प्राक्कथा इ. अलंकारांचा वापर सोदाहरण स्पष्ट करा. (९) सांख्यदर्शनातील पुरुषाचे ज्ञानेश्वरांनी कोणत्या शब्दात वर्णन केले आहे? (१०) उत्पत्ति, स्थिती, लय या प्राकृतिक प्रक्रियेतील स्थितीगतीचे वर्णन श्री ज्ञानेश्वर महाराज कोणत्या प्रकारे करतात? (११) सांख्यदर्शन हे द्वैती असूनही वेदप्रामाण्य मानते ते कोणत्या प्रकारे श्री ज्ञानेश्वरांनी सूचित केले आहे? (१२) पुरुष आणि प्रकृति संबंधात 'ब्रह्म' अस्तित्वाचा अनुबंध सांख्य कोणत्या प्रकारे स्वीकारतात? (१३) श्रीमद् शंकराचार्यांचा मायावाद श्री ज्ञानेश्वरांनी कोणत्या प्रकारे स्वीकारला आहे सोदाहरण स्पष्ट करा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय दुसरा : सांख्ययोग** : भ. गी. श्लोकसंख्या ७२ पैकी, ओवीसंख्या ३७५ (पैकी ओ.क्र. १८३ ते ३७५) (भाग दुसरा)

**बैठक क्र. २ दि. २९/११/२०२३ व ३०/११/२०२३**

**सांख्य दर्शनाविषयी** : दांडेकर प्रतीतील प्रस्तावनेतील विचार (१) ज्ञानदेवांना द्वैत मुळीच मान्य नाही. (२) आत्मा हा सत्य, शुद्ध, निरुपाधिक, गुणातीत, भेदशून्य आहे. ब्रह्मदेवापासून मुंगीपर्यंत सर्वच उपाधींमध्ये एकच आत्मा भरलेला आहे. यालाच ब्रह्म म्हणतात. (३) गुरुवर्य विष्णूबुवा जोग यांच्या मते गीता तात्पर्याविषयी शंकराचार्य आणि ज्ञानेश्वर महाराज यांची मते सारखीच आहेत. (४) देह व आत्मा यांचे तात्त्विक स्वरूप सांगितले. (५) आपले स्वधर्मानुरुप विहित निष्काम कर्माचे अनुष्ठान सांगितले. (५) सांख्ययोग–ज्ञानयोग.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १८४ ते २०५ | स्वधर्म | स्वधर्म म्हणजे काय? (प्राप्त कर्म)<br>स्वधर्म का पाळावा? (श्रेय/पुरुषार्थ) |
| २०६ ते २२५ | स्वधर्म आठवण, शौर्यवर्णन न लढणे व्यर्थता | न पाळल्यास अपकीर्ति स्वधर्म पालन हेच श्रेय |
| २२६ ते २३३ | सांख्ययोगानुसार स्थितप्रज्ञतेने पुरुषार्थ साधन ही सांख्य स्थिती बुद्धियोग विषय सुरुवात | प्रकृतीच्या चलन चक्रात सांख्ययोगानुसार प्राप्त कर्म स्थितप्रज्ञतेने करणे. प्रबोध स्वधर्म हा ईश्वरी बुद्धीने आचरण करावा. धर्मशास्त्राची पोपटपंची करून आचरण किंवा कर्म करण्यास सांगणे ही दुर्बुद्धी होय. निष्काम बुद्धीने प्राप्त कर्म अर्थात स्वधर्म आचरण हाच मोक्ष. ७८ व ७९ व्या ओवीतबुद्धियोगी साधकाची व्याख्या |
| २३४ ते २८४ | ईश्वरबुद्धि म्हणजेच निरपेक्ष बुद्धी सापेक्ष किंवा सकाम बुद्धी म्हणजे दुर्बुद्धी. पुरुष किंवा परमात्मा याने ही बुद्धी दिली त्या बुद्धीने प्राप्त कर्मे करावी म्हणजे बुद्धियोग सिद्धहोता. निरपेक्ष बुद्धी म्हणजेच सम–बुद्धी होय. पुरुष कारणाने प्रकृतीच्या चक्रनेमीक्रमात प्राप्त कर्म स्थिरबुद्धीने – ईश्वरबुद्धीने – समत्वबुद्धीने करणे हा बुद्धियोग अर्थात योगसिद्धी होय. | |
| २८५ ते २९२ | अर्जुनाचे स्थितप्रज्ञ विभूतिमत्त्वाविषयी स्वरूप कथनासाठी प्रश्न | ९१ व ९२ स्थितप्रज्ञाची व्याख्या |
| २९३ ते ३२० | स्थितप्रज्ञाचे स्वरूप | समाधी अवस्थेची योग्यता |
| ३२१ ते ३३० | स्थितप्रज्ञ होण्यात प्रकृतीच्या येणाऱ्या अडचणी | स्थितप्रज्ञ तोच ब्रह्मस्थिती प्राप्त झालेला. समाधी सिद्ध मुनी. अशी विभूती मार्गात अनायासे प्राप्त झालेल्या ऋद्धिसिद्धी अडकत नाही. तो आनंदमय स्थिती भोगतो – **स्वधर्माचरण करताना** स्वधर्म करण्याची गरज नाही. अर्थात निर्मोही तो ब्रह्मस्थित असा अर्जुनाचा समज – |
| ३३१ ते ३५४ | अडचणी व त्यावर मात करण्याचे उपाय | |
| ३५५ ते ३७० | पुन्हा स्थितप्रज्ञ अर्थात स्थिर बुद्धी किंवा ब्रह्मस्थितीचे स्वरूप स्पष्ट केले. | |
| ३७१ ते ३७५ | संजयाचे धृतराष्ट्राशी बोलणे धर्मविषयक प्रश्न अर्जुन विचारेल असे भाकित. | |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) श्रीकृष्णांना अर्जुनास स्वधर्माची आठवण का करून द्यावी लागली? अर्जुनाच्या स्वधर्माचे वर्णन श्री ज्ञानेश्वरांनी कोणत्या शब्दांत वर्णन केले आहे? (२) स्वधर्म म्हणजे कोणता धर्म चर्चा करा. (३) स्वधर्माचे पालन करणे श्रेयस्कर होय असे श्रीकृष्ण का म्हणतात? (४) सांख्य योगानुसार, बुद्धियोगांतर्गत स्थितप्रज्ञ विभूतिमत्त्वाचे वर्णन श्री ज्ञानेश्वर कोणत्या शब्दात करतात? (५) बुद्धियोगी साधकाची व्याख्या स्पष्ट करा. (६) स्थितप्रज्ञ स्थितीस पोचण्यात कोणत्या अडचणी येतात? (७) स्थितप्रज्ञेचे ब्रह्मस्थिती असे वर्णन का केले आहे? (८) ईश्वर बुद्धी आणि दुर्बुद्धी यांतील भेद स्पष्ट करा. (९) श्री ज्ञानेश्वरांच्या दृष्टांत मालिकेतील दृष्टांतांचे कुटुंबसंस्था, निसर्ग, पर्यावरण, प्रवाह, व्यवहार इ. संबंधाने वर्गीकरण करा. (१०) श्रीकृष्णांनी केलेल्या सांख्यदर्शन तथा ज्ञानयोग अर्थात बुद्धियोगामुळे आपल्याला कोणतेही काम करण्याची गरज नाही असे अजुनाला का वाटले? स्वधर्माच्या दृष्टीने विषद करा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय तिसरा : कर्मयोग** : भ. गी. श्लोकसंख्या ४३, ओवीसंख्या २७६

**बैठक क्र. ३ दि. १३/१२/२०२३ व १४/१२/२०२३**

ज्ञानमार्ग (सांख्ययोग) व कर्ममार्ग या दोन्ही मार्गाचे साध्य मोक्ष हेच आहे. ज्ञानमार्गाने तात्काळ मोक्ष प्राप्त होतो; तर कर्ममार्गाने योग, उपासना इ. मार्गाने संसारप्रापंचिकांना मोक्ष करण्यास दीर्घ काळ लागतो. त्यासाठी वेदविहीत निष्काम कर्म हेच स्वधर्म साधन होय. कर्मफळाची आसक्ती जीवाला बंधन करते म्हणून कर्माचा त्याग करण्याऐवजी कर्मफळाचा त्याग करणे श्रेयस्कर होय. कर्तृत्वाभिमान व फलाशारहित ईश्वरार्पण बुद्धीने कर्म करून निष्काम कर्मयोग साधावा. १८व्या अध्यायात मग अज्ञानें बांधलेयां । मोक्षपदी बैसावया । साधनारंभु तो तृतीया । ध्यायीं बोलिला ।।१४३७।। जे देहाभिमानबंधे । सांडूनि काम्यनिषिध्यें । विहित परी अप्रमादें । अनुष्ठावें ।।१४३८।। ऐसेनि सद्भावें कर्म करावें । हा तिजा अध्यावो जो देवे निर्णय केला ते जाणावे । कर्मकांड येथ ।।१४३९।।

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १ ते ३१ | ज्ञानमय अवस्थेत कर्म आणि कर्ता राहातच नाही त्यामुळे युद्ध करण्याचे कारणच नाही. तरी श्रीकृष्ण घोर युद्ध करावयास सांगतात. त्यामुळे अर्जुन अधिक गोंधळून, परमेश्वराला नक्की काय करावे म्हणजे सार्थक होईल ते सांगण्याची प्रार्थना करतो. कारण श्रीकृष्ण हे अर्जुनाचे सर्वाश्रय स्थान आहे. | ज्ञानयोगाने कर्म आणि कर्त्याचा निषेध झाल्यामुळे, कर्म करण्याविषयी अर्जुनाची पुन्हा संभ्रमावस्था. |
| ३२ ते ६४ | ज्ञानमार्ग आणि कर्ममार्ग हे दोन्ही भगवंतांनीच सांगितले. देहाला प्रकृतीच्या सृष्टीसारणीप्रमाणे कर्म अपरिहार्य असते. कर्म करावेच लागते ते स्वधर्माप्रमाणे प्रांजळपणे करावे. आसक्तीमुळे फलाशा निर्माण होते. त्यामुळे स्वधर्मकर्म स्वार्थमूलकतेने होते. त्यामुळे आपण देहासक्तीत अहंकाराने अडकतो. त्यामुळे मोक्षापासून लांब जातो. हे अडकणे त्यागून कर्मपर व्हावे म्हणजे ठायीच मुमुक्षुपणे निष्काम कर्म घडेल. | ज्ञान झाले तरी कर्म करावेच लागते. आसक्तीने कर्मफलसापेक्ष होते. कर्माचा त्याग करण्यापेक्षा कर्मफलाचा त्याग करावा म्हणजे आनंदप्राप्ती होते. |
| ६५ ते १४५ | वेदातून स्वधर्मनिर्मिती, वेदविहीतकर्म, वेदातील देव (वेदातील देव म्हणजे पंचम हाभूतांच्या शक्ती) त्या देवांना संतुष्ट करणे म्हणजे स्वधर्म. जो स्वधर्म अनुसरत नाही तो स्वतःचाच नाश करतो. स्वधर्मकर्म म्हणजेच यज्ञ. या यज्ञामुळे ऋतुचक्र तथा जीवनचक्र नित्य स्थिर राहू शकते. नित्य यज्ञकर्म करावे. | यज्ञात भवति पर्जन्यः अन्न- अन्नातून भूते. म्हणून यज्ञातूनच सारे निष्पन्न होते. यज्ञ- म्हणजेच कर्म - स्वधर्मानुसार कर्म- निष्काम कर्म. |
| १४६ ते १९७ | ज्ञानी आपोआपच निष्काम कर्म करू लागतो. त्यालाच ज्ञानोत्तर कर्म (ज्ञानोत्तर भक्ती) असे म्हणतात. हे ज्ञानोत्तर कर्म म्हणजे सर्वकल्याणात्मक सृष्टीचक्राचे अबाधितपणे रक्षण करीत कर्म करणे होय. लोकसंग्रहासाठी म्हणजे लोकांना ज्ञानात्मक कर्म करण्यास प्रवृत्त करण्यासाठी ज्ञानी नेहमी कर्म करतात. ते कर्मात लिप्त होत नाहीत. जे देहधर्मात म्हणजे प्राकृतिक स्वभावात मोहवश होऊन देहाचे लाड पुरविण्यात धन्यता मानतात ते अपयशी होतात. | योगी, सिद्ध, संन्यासी, ऋषी, तपस्वी, ज्ञानी हे आपोआपच कर्मात लिप्त न होता, निष्काम कर्म करतात. म्हणजे स्वधर्माचे पालन करून सर्वकल्याण साधतात. |
| १९८ ते २०१ | मूर्खाचे लक्षण | वासना देहाधीन होऊ नये. षड्रिपुंच्या योगामुळे अविद्येने ज्ञान झाकले जाऊन, माणूस ज्ञानात्मक कर्मापासून च्यूत होतो. |
| २०२ ते २०९ | इंद्रियांचे (देहाचे लाड नको) ज्ञानी लाड करीत नाहीत. | |
| २१० ते २१८ | वासनेंद्रियांनी कामक्रोधाधीन होऊन संतोष कधीच मिळत नाही. | |
| २१९ ते २३१ | स्वधर्माचे महत्त्व पटवून दिले. | |
| २३२ ते २३८<br>२३९ ते २७६ | कळून न कळल्यासारखे लोक/ज्ञानी का वागतात? काम, क्रोध यामुळे बुद्धी वासनादेहाच्या आधीन व त्यामुळे ज्ञानाला पारखे होऊन, माणूस आत्मघाताला प्रवृत्त होतो. ज्ञानात्मक कर्म होण्यासाठी इंद्रियांतील वासनांवर अर्थात कामक्रोधावर विजय मिळवा. संयमाने ज्ञानी ही गोष्ट करतात. | |

## आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) अर्जुनाची पुन्हा संभ्रमावस्था का झाली? (२) ज्ञानमाग आणि कर्ममार्ग हे दोन्ही मार्ग मोक्षाप्रत नेतात. त्यामुळे त्यातील भेद भगवंतांनी कसे स्पष्ट केले आहेत? (३) वेदविहीत स्वधर्मात्मक कर्माचे स्वरूप स्पष्ट करा. (४) निष्कामकर्म कसे साधता येते? निष्काम कर्माचे वैशिष्ट्य कोणते? (५) स्वधर्म आणि कर्म यांचा संबंध स्पष्ट करा. (६) श्रीकृष्णांनी मूर्ख कोणास म्हटले आहे? का? (७) स्वधर्म निष्काम कर्म साधण्याचा योग्य असा उपाय कोणता? (८) कामक्रोधादि वासनाविकारांचे कार्य स्पष्ट करा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय चौथा : ज्ञानसंन्यासयोग.** : भ. गी. श्लोकसंख्या ४२, ओवीसंख्या २२५

**बैठक क्र. ४ दि. २०/१२/२०२३ व २१/१२/२०२३**

उपासना कांडास सुरुवात. निष्काम कर्मयोग का सांगितला याचे स्पष्टीकरण केले. अर्जुनास निःसंशय होऊन; निष्काम कर्मरूपी ज्ञानयज्ञ करून मोक्षप्राप्ती करून घे, असा उपदेश केला. ज्ञानसंन्यास योग म्हणजे ज्ञानी माणसाने ज्ञानवान कर्म करणे होय.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १ ते १५ | गीता निवेदन प्रसंगाची महती श्रोत्यांना आणि श्री निवृत्तीनाथांकडे कथन – श्रोतृसंवाद | अलौकिक योगायोग – ज्ञानग्रहणाचा |
| १६ ते ३१ | निष्काम कर्मयोगात तत्त्वज्ञानाची परंपरा सूर्यापासून इक्ष्वाकूपर्यंत. वासनेमुळे या ज्ञानाचा विसर – अर्थात धर्मग्लानी | वासनेत गुंतल्याने निष्काम कर्मतत्त्वाचा विसर |
| ३२ ते ५९ | जन्मपरंपरेचे रहस्य सांगून अवतार मीमांसा व कारणपरंपरा कथन. सर्वकल्याणात्मक असे निष्काम कर्म करणारे म्हणजे स्वधर्माचरण करणारे निर्माण करून सर्वकल्याणासाठी सिद्ध असे ज्ञानवान, निष्काम कर्मयोगी निर्माण करण्यासाठी श्रीकृष्ण अवतरतो. | अवतार मीमांसा |
| ६० ते ८८ | कर्मअपरिहार्य, सापेक्ष कर्म करणारे फलाची अपेक्षा करतात. कर्मानुसार फलप्राप्तीसाठी उपासना करतात ही केवळ त्यांच्या मायेचा – मनाचा खेळ असतो. जसे कर्म तसे फळ! विविध देवता व विविध उपासना ही फलाशेने घडते. त्यातून सर्वकल्याणाचा विचार झाकला जातो. यात भलेभलेही भ्रमतात. | सामान्य प्रापंचिक कर्मफलाच्या अपेक्षेने कर्म करतो व उपासना करतो. |
| ८९ ते ११५ | स्वधर्मानुसार, निष्कामपणे, स्वरूपाने म्हणजे परमेश्वरस्वरूप होऊन, विश्वकल्याणाच्या भूमिकेतून कर्तव्य बुद्धीने व विवेकाने कर्म करणारा साधू अर्थात सत्पुरुष परमेश्वरस्वरूपच कर्म करतो. | निष्काम कर्मयोगाचा अनुसार म्हणजेच ज्ञानवान कर्मतत्परता होय. |
| ११६ ते १५५ | योग प्रक्रियेच्या आधाराने, रूपकात्मकतेने, ब्रह्मस्वरूप असलेल्या योग्याचे कर्म अर्थात यज्ञ ब्रह्मस्वरूपच होणे याला कर्मलय असे म्हटले आहे. आत्मा व जीवात्मा यांच्या सामरस्याने यज्ञ केल्यास, यज्ञ मोक्षदायी होतो. असे अनेक प्रकारचे यज्ञ सांगितले आहेत. मंत्र, तंत्र, यज्ञक्रिया इ. क्रियांनी यज्ञ साधता येतो. विवेकाने परिपक्वता आल्याने हे घडते. परिपक्वता साधली नाही तर यज्ञच घडत नाही. ऐहिक आणि पारलौकिक सुख दोन्हीही लाभत नाही. | कर्म हाच यज्ञ. कर्मातून – यज्ञाची निर्मिती – यज्ञातून मोक्ष. |
| १५६ ते १८६ | ज्ञानयज्ञ सर्वश्रेष्ठ आहे. त्या यज्ञाचे ज्ञान गुरुकृपेनेच होते. ज्ञानासारखे पवित्र काही नाही! ज्ञानोपासना निगर्वीपणे व गुरुकृपासाधनेने करावी लागते. | ज्ञानयज्ञ सर्वश्रेष्ठ होय. |
| १८७ ते २१० | श्रद्धावान, आत्मसंयमी योग्याला ज्ञानप्राप्ती होते. ती संशयी, अश्रद्धाला होत नाही. संशय नाश करण्यासाठी ज्ञान हेच शस्त्र असते. | श्रद्धेने ज्ञानप्राप्ती. |
| २११ ते २२५ | ज्ञान आणि कर्म यांच्या सामरस्याची चर्चा ही अपूर्व कथा आहे. तिच्या केवळ श्रवणानेही संशय फिटून ज्ञान प्राप्ती होते. स्वधर्म कर्मास योगी सिद्ध होतो. म्हणून या चर्चेकडे अवधान द्यावे. | श्रवणयज्ञानेही ज्ञानप्राप्ती होते. |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) निष्काम कर्मज्ञानाची परंपरा सांगा. (२) अवतार का घेतला जातो? (३) धर्मग्लानी म्हणजे काय ते स्पष्ट करा. (४) कर्मातून यज्ञ व यज्ञातून कर्म कसे प्रकटते ते सांगून यज्ञ कोणकोणते उल्लेखिले आहेत? (५) ज्ञानप्राप्ती केव्हा घडते? (७) गुरुचे महत्त्व विषद करा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय पाचवा : कर्मसंन्यासयोग** : भ. गी. श्लोकसंख्या २९, ओवीसंख्या १८०

**बैठक क्र. ५ दि. २७/१२/२०२३ व २८/१२/२०२३**

कर्मसंन्यास म्हणजे फलाशा न ठेवता केलेले कर्म अर्थात निष्काम कर्म करणे होय. कर्मसंन्यास योग म्हणजेच ज्ञानसंन्यास अंतर्गत निष्काम कर्मयोग, अर्थात 'योगगर्भयोग' होय.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १ ते १४ | कर्मसंन्यास आणि कर्मयोग अर्थात ज्ञानसंन्यास, कर्म यापैकी कोणते निवडावे हे कर्मत्याग आणि कर्म याविषयी प्रश्न विचारून – स्पष्टीकरण करावयास सांगितले. | – |
| १५ ते ७० | कर्मयोगी अर्थात ज्ञानयोगी संन्यासी म्हणजे सिद्ध, साधू, स्थितप्रज्ञ, योगी. कर्मात लिप्त होत नाही, तो नेहमी ज्ञानमग्न असतो. याचे वर्णन केले आहे. वरवर पाहता सामान्याप्रमाणे त्याचे कर्म दिसते, परंतु योगी समाधीमग्न असतो. | कर्मत्याग व निष्काम कर्मानुष्ठान एकच. शांत रसाचा उल्लेख शांतरस म्हणजे ज्ञान. |
| ७१ ते १०२ | ब्रह्मानुभवी पुरुषांचे लक्षण म्हणजे तो स्वतःच ब्रह्मरूप होतो! त्याला सृष्टीचा चक्रनेमीक्रम आड येत नाही. तो जीवनमुक्त होतो. त्याला समदृष्टी प्राप्त होते म्हणजे तो सर्वांठायी ब्रह्मतत्त्वाचा अनुभव घेतो. | मुमुक्षुपदाला पोचतो. |
| १०३ ते १२८ | ब्रह्मवेत्ता, स्थिरबुद्धी पुरुषाचे वर्णन– तो सुखदुःखातही विचलित नाही. सुख व दुःख हे देहाहंकाराने, वासनामयतेने अनुभूत होते. स्थिरबुद्धीमुळे वासनांच्या वर, संयमाने विजय मिळविल्यामुळे, स्थिरबुद्धी विरक्त, योगी, या भ्रामक, क्षणभंगूर सुखदुःखाने लिप्त होत नाहीत. सामान्य संसारी माणूस या अविद्यारूप पापपुण्य, सुखदुःख कल्पनेत अडकतो. | स्थिरबुद्धी झालेला पुरुष सदैव ज्ञान–अनुभवात स्थिर असतो. |
| १२९ ते १५० | ज्ञानी, अद्वैत पावलेल्या योग्याचे वर्णन – संत हेच परमेश्वर स्वरूप. | |
| १५१ ते १८० | ज्ञानी, अद्वैतानुभूती भोगणारा योगी कसा निर्माण होतो याचे वर्णन केले आहे. अष्टांगयोग मार्ग सांगण्यास सुरुवात. अमनस्कयोग घडतो. सर्व विश्व हेच परमेश्वरस्वरूप आहे, असे वाटू लागते. तो योग म्हणजे अष्टांग योग साधना होय. याविषयी पुढील अध्यायात सांगण्याचे आश्वासन. | अष्टांग योगाचा प्रस्ताव. |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) ज्ञानसंन्यास आणि कर्मसंन्यास ह्या कल्पना स्पष्ट करा. योगगर्भयोग असे या विवेचनास का म्हटले आहे? (२) ज्ञानयोगी संन्याशाचे वर्णन करा. (३) ब्रह्मानुभवी पुरुष हा जीवनमुक्त पदास का पोचतो? (४) समदृष्टी म्हणजे काय? स्पष्ट करा. (५) ब्रह्मवेत्त्या पुरुषाचे वर्णन करा. (६) अमनस्कयोग केव्हा घडतो, ते स्पष्ट करून सांगा. (ओवी क्र. १५६)

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय सहावा : आत्मसंयमयोग,**: भ. गी. श्लोकसंख्या ४७, ओवीसंख्या ४९७ (पैकी ओ.क्र. १ ते १६२) (भाग पहिला)

**बैठक क्र. ६ दि. ३/१/२०२४ व ४/१/२०२४**

ध्यानयोग, हटयोग, ब्रह्मसाम्ययोग यांचे वर्णन, भेद, लक्षणे व फल निवेदन. प्रपंचात राहूनही आत्मसुखाचा अनुभव कर्मयोगाने घेता येतो. हटयोग अर्थात ध्यान योग मार्गानेही जाता येते. सर्व मार्गाचे ध्येय आत्मसुखाचा अर्थात ब्रह्मसुखाचा अनुभव घेणे हेच असते.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १ ते ३८ | ज्ञान ऐकण्याची पर्वणी. धृतराष्ट्र मोह विवश. सहावा अध्याय गीतार्थाचे सार आणि 'विवेकसिंधू'चा मतितार्थ. मराठीचा अभिमान व शब्दकळेची थोरवी. हे ज्ञान एक चित्ताने ऐकले तरच उपयोग. हे ज्ञान म्हणजे परिस. | श्रोतृसंवाद सहाव्या अध्यायाची महती. |
| ३९ ते ६१ | संन्यासी आणि योगी एकच. जो प्रपंचात निष्कामपणे कर्तव्यतत्पर राहिला तोच योगी किंवा संन्यासी समजावा. त्याने अष्टांगयोग आचरला असेच मानावे.<br>मनोनिग्रहाने योगीच झाला असे समजावे. प्रपंच सोडण्याचे कारण नाही. | योगी/संन्यासी दोन नावे.<br>गुण सारखेच. निष्काम ता. |
| ६२ ते ८७ | निरासक्त असतो तोच योगी. कर्माच्या बाबतीत संकल्प सांडणे म्हणजे फलाची अपेक्षा करत नाही, तोच योगी होय किंवा जो ठायीचा आत्मा हाच परमात्मा आहे हे ध्यानात घेऊन, तो कर्मसंकल्पात अडकत नाही. त्यामुळे जो स्वतःच ब्रह्मस्वरूप स्थिती ठायीच भोगतो. (श्लोक ५) | स्वतः स्वतःला ओळखा आणि निष्काम व्हा. |
| ८८ ते १६२ | प्रपंचात राहून योगसाधना करणाऱ्याला ज्ञान झाल्याने प्रपंच व्यर्थ वाटतो. त्याला निरिच्छता प्राप्त होते. तो समबुद्धी होतो. समबुद्धी प्राप्त अर्थात अद्वैत प्राप्त योग्याची लक्षणे सांगितली. परंतु समबुद्धीने ईश्वरस्वरूप झाल्यास द्वैतच राहात नाही. मग भक्त आणि भज्य यातील सुखसंवादच नष्ट होतो. म्हणून द्वैतात अद्वैताचा सुखानुभव घेण्यासाठी अर्जुन व कृष्ण अशा द्वैताचा आभास ठेवला आहे. अर्जुनाची योग्यता योगी होण्याची असून, प्रत्यक्ष अद्वैत ज्याच्याशी घडायचे तोच सिद्ध होय. योगी कसे व्हावे याविषयी श्रीकृष्ण अर्जुनाला वात्सल्याने ज्ञान देणार आहेत. या प्रसंगाचे श्री ज्ञानेश्वर श्रोत्यांपुढे वर्णन करतात. श्रोते अर्जुन व कृष्णातील, योग सिद्धी ज्ञानाविषयीच्या कथेचे निरुपण करावे अशी विनंती करतात. येथे कृष्णच अर्जुनाच्या आधीन गेला आहे.<br>'पंथराजाचे वर्णन'– पंथराज म्हणजे नाथ संप्रदायातील सर्वश्रेष्ठ असा समाधीयोग. या मार्गाची थोरवी व कठीणता वर्णन केली आहे. | भक्त व भज्य यातील अद्वैत सिद्धीचे ज्ञान वितरित करण्याचा प्रसंग.<br>श्रोतृसंवाद.<br>अर्जुनाची ज्ञानासाठी याचना. |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) सहावा अध्यायास भगवद्गीतेत अधिक महत्त्व श्री ज्ञानदेवांनी का दिले आहे? (२) मराठीचा अभिमान आणि शब्दकळेची थोरवी कोणत्या शब्दांत स्पष्ट केली आहे? (३) योगी किंवा संन्यासाचे खरे लक्षण कोणते? (४) ध्यानयोगाचा पंथराज श्रीकृष्ण अर्जुनाला सांगण्यास का तयार झाले? (५) सहावा अध्याय ही श्रोत्यांना पर्वणी आहे असे का म्हटले आहे?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग


## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय सहावा : आत्मसंयमयोग,**: भ. गी. श्लोकसंख्या ४७, ओवीसंख्या ४९७ (पैकी ओ.क्र. १६३ ते ३४८) (भाग दुसरा)

**बैठक क्र. ६ दि. १०/१/२०२४ व ११/१/२०२४**

योगसाधनेची कृती कथन. भारतीय योगशास्त्रानुसार (१) मूलाधार (२) स्वाधिष्ठान (३) मणिपूर (४) अनाहत (५) विशुद्ध (६) आज्ञा अशी षटचक्रे (शक्तिस्थाने) मानली आहेत. नाथपरंपरेप्रमाणे, आर्विकरांच्या 'दिव्यामृतधार' ग्रंथात, हृतचक्र (कालचक्र), तालुचक, ललाटचक्र अशी चक्रे मानली ओत. एकूण ९ चक्रे होतात.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १६३ ते १९५ | योगसाधनेसाठी, वैराग्य सहज प्राप्त होईल असे निसर्गरम्य स्थान शोधून तेथ सहज स्थिर आसन घालावे, याविषयी सविस्तर वर्णन. – स्थळ | निगूढ मठ अपेक्षित. भोग्यालाही वैराग्य प्राप्त अशी जागा, – ज्ञानेश्वर व्याघ्राजीन उल्लेखित नाहीत. |
| १८६ ते २०० | आसनावर – मूळबंध अर्थात वज्रासन (नाथसंप्रदायाप्रमाणे) घालावे व शरीर – गुद व वृषण (लिंग/योनी) यांच्या मधोमध – **आधारचक्र** असते. त्यावर भार तोलावा – प्रवृत्ती सांडून समाधी अवस्था. गुरुस्मरण. | वज्रासनाची मार्गाप्रमाणे स्थिती. |
| २०१ ते २५४ | जालंधरबंध व वोढीयाणा बंध साधावा. मनाचे संयमन, ब्रह्मचर्य निकराने पाळावे. अपानवायू रोधला जातो. डोळे अर्धवट मिटतात. दृष्टी नासाग्रावर स्थिर होते. अपानवायूच्या संचाराने छाती, उदर यांत भयावह हालचाल होते. मूळबंधाने किंवा वज्रासनामुळे बेंबीजवळ छोट्या पेटीत सर्पिणीच्या पिलासारखी तेजस्वी अशी कुंडलिनी असते. चेतवली जाते. ती आपले साडेतीन वेढे सोडवून, उर्ध्वगति निघू लागते.<br>कुंडलिनी देहवासनांमुळे अनेक दिवस उपाशी असते (देह पोसला जातो) ती उर्ध्वगामी होऊन पोसलेल्या देहाचे (पान (प्राण) वायू, मांस, पाणी) शोषण करते आणि देह कोरडा करते. त्या अवस्थेत षटचक्र केवळ पदरांप्रमाणे राहतात. अखेर कुंडलिनी शुषुम्नेमध्ये शांत होते. केवळ प्राणवायू राहतो. नऊ वायू नाश पावतात. कुंडलिनी मुखातून विषरूपी अमृत बाहेर टाकते. या अमृताने योग्याचे शरीर तेजस्वी दिसते. | जालिंधर बंध वोढीयाणा बंध यांची माहिती कुंडलिनीचा उल्लेख<br>कुंडलिनीचे कार्य देहातील षटचक्रांचा उल्लेख |
| २५५ ते २९३ | समाधिस्थ योग्याचे वर्णन. सर्वज्ञता प्राप्त होते. (शांतिमय अवस्था) २७२ व्या ओवीपासून कुंडलिनी शक्तीचे वर्णन. अनाहत नाद सुरू.<br>अनाहताचे वर्णन– कुंडलिनी प्राणवायूरूप होते. चैतन्यच शिल्लक. पंचमहाभूते अटविण्याची मूस बनते. पंचमहाभूतांपलिकडे मोक्ष–शांती. सिद्ध सिद्धान्त पद्धतीप्रमाणे स्वाधिष्ठानचक्र, मणिपूरचक्र, हृतचक्र, विशुद्धचक्र, तालुचक्र, आज्ञाचक्र, ललाटचक्र, सहस्त्रावधार व निर्वाणचक्र अशी ९ चक्रे मानली. काही लोक ८ चक्रे मानतात. | कुंडलिनीचे पर्यवसान– समाधीयोगाने मोक्षस्थितीत होते. आत्मसंयमनाने मोक्षसिद्धी. |
| २९४ ते ३४८ | समाधी अवस्थेचे वर्णन– येथे वाणी मागे सरते. विचाराला थारा राहात नाही. चैतन्य राहाते तेही निजरूपात अद्वैत होते. योगमार्गाने सच्चिदानंदरूप होता येते. पण अर्जुनासारख्याला त्याचा अनुभव घेता येत नाही. त्यावर श्रीकृष्ण प्रापंचिकाला योग साधता येतो असा उपदेश करतात. त्यासाठी किमान संयम आणि विवेक ठेवून विहित कर्मे करावीत. म्हणजे ठायीच योगसिद्धीचा अनुभव येतो. | प्रापंचिकाला विहित कर्म निरासक्तीने करून योगसिद्धी प्राप्त होते. |




### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) समाधी योगसाधनेची प्रक्रिया स्पष्ट करा.

(२) प्रापंचिकाला योगसिद्धी कशी प्राप्त करता येते?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय सहावा : आत्मसंयमयोग,**: भ. गी. श्लोकसंख्या ४७, ओवीसंख्या ४९७ (पैकी ओ.क्र. ३४९ ते ४९७) (भाग तिसरा)

**बैठक क्र. ६ दि. १७/०१/२०२४ व १८/०१/२०२४**

योगी होण्याचे महत्त्व सांगून, मोक्ष मिळण्याचे सर्वोत्कृष्ट साधन असे का म्हटले, याचा विचार सांगितला आहे. (४६ वा श्लोक)

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| ३४९ ते ३५६ | आहार आणि विहार यातील मर्यादा आणि नियमितता या युक्त क्रियेने योग सहज घडतो. आत्मसुखाचा अनुभव अधिकाधिक वाढत जातो. अपवर्गी – मोक्ष. | त्याला आत्मसिद्धीचा अनुभव येतो. |
| ३५७ ते ३७४ | इंद्रिय निग्रहाने युक्त योग आचरू लागले की आत्मसुख प्राप्ती होते. त्यापासून मन चळत नाही. आत्म्याला परमात्मस्वरूपाचा अनुभव होऊ लागतो. देहभाव अर्थात देहसुख संवेदित होत नाही. तो संसार बंधने तोडतो. | निग्रहाने आत्मसुख अनुभवण्यासाठी देहाला निग्रहाने न घाबरता नियमित करावे. |
| ३७५ ते ४१० | यमनियम, निग्रह, समदृष्टी– यामुळे योगी अद्वैत होतो. म्हणून निश्चयाने योग अनुसरला पाहिजे. समदृष्टीने जो सर्वभूती स्वतःस राहतो तो आत्मस्वरूपाचा अनुभव घेतो. मनोनिग्रहाने योग आचरावा. | यमनियमाचे महत्त्व अद्वैताची अवस्था. योग्याची विदेही स्थिती. |
| ४११ ते ४३६ | मनाची चंचलता अर्जुनाला जाणवते. अशा चंचल मनाला योगाभ्यासानेच आचरावे लागते, असे श्रीकृष्ण सांगतात. तर या आवरण्याच्या अभ्यासात आयुष्य संपून जाईल असे अर्जुन निवेदितो. मग योग कसा? | कृष्णार्जुनांचा मन आणि इंद्रिय संयमाविषयी संवाद. |
| ४३७ ते ४९७ | योग अनुसरणे सर्वश्रेष्ठ. जो योगमार्गाला निघाला तो मोक्षपदाला जाईपर्यंत योगाभ्यास – ज्ञानचिंतन करीत राहातो. त्यासाठी एक किंवा अनेक जन्म अपुरे पडले तरी प्रत्येक जन्मात पुढील अभ्यास सुरू होतो. त्यासाठी योग्य कुटुंबात तो जन्म घेतो. अशा योगमार्गावर पुन्हा पुन्हा जन्म घेऊन योग साधना करीत<br>मोक्षापर्यंत जाणाऱ्यास, नव्या जन्मात त्याला **योगभ्रष्ट** असे म्हणतात. मोक्ष मिळेपर्यंत तो योगाभ्यास करीत राहातो. एक जन्म संपला की दुसरा जन्म होईपर्यंत तो स्वर्गसुखच भोगतो परंतु मोक्षसुखापुढे त्याला ते हलके वाटते. भक्तियोगाने जो परमात्मरूपापर्यंत पोचला तो मोक्षपदास जातोच.<br>योगी हा सर्व प्रकारच्या योगांपेक्षाही श्रेष्ठ होय.<br>समाधीयोगी– (तपस्विभ्योधिकोयोगी – श्लोक ४६) | योग प्रक्रियेतील मोक्ष पदापर्यंतचे दीर्घ प्रक्रिया वर्णन केली आहे.<br>योगभ्रष्ट म्हणजे योग पूर्णत्वास जाण्यापूर्वी ज्याचा जन्म संपला व नवा जन्म घेतला व मागील साधनेपुढे साधना करू लागतो असा योगी. |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) यमनियमांचे योगातील महत्त्व विशद करा. (२) योगभ्रष्ट म्हणजे काय? (३) योगमार्ग किती काळ अवलंबावा लागतो? (४) योगसाधनेचे अंतिम फळ कोणते?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय सातवा : ज्ञानविज्ञानयोग** : भ. गी. श्लोकसंख्या ३०, ओवीसंख्या २१०

**बैठक क्र. ७ दि. २४/०१/२०२४ व २५/०१/२०२४**

ज्ञान, विज्ञान व अज्ञान यांचा विचार, प्रपंच म्हणजे विज्ञान, विज्ञान हेच सत्य मानणे म्हणजे अज्ञान, ज्ञानाच्या ठिकाणी तर्क व जाणीव नसते. माया नदीचे रूपकात्मक वर्णन, भक्तांचे चार प्रकार १) आर्त २) जिज्ञासू ३) अर्थार्थी ४) ज्ञानी असे होत.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १ ते १०९ | ज्ञान, विज्ञान व अज्ञानभेद निरुपण, महत्तत्त्व (परब्रह्म – पुरुष) महाशक्ति (निजा)–प्रकृती. प्रकृति अष्टधा. परमेश्वर हेच परा–अपरा–पराअपरा (सूक्ष्मा) या रूपाने प्रत्येक सूक्ष्म जीवाच्या ठायी आहे. या विस्ताराला माया असे नाव आहे. जीवन मृगजळासारखे. प्रकृतीचा. विलय परब्रह्मात. सर्व जीवमात्रांच्या ठिकाणी परब्रह्मच असते. परंतु ते देहाहंकाराने जगतात. जे देहाहंकार टाकून कर्म करतात ते कर्मातही मोक्ष अनुभवतात. त्रिगुणात्मकतेने देहाहंकार प्राप्त होतो. वास्तविक त्रिगुणात्मक आकारविश्व ही परमेश्वराची माया – (भ्रामक विकास–स्वप्न) आहे. मायेमुळे महत्तत्त्वातून प्रकटलेले जीव (प्रकृतीची रूपे) मूळ महत्तत्त्वच विसरतात (मडक्याचा दृष्टांत) त्यामुळे माया ओळखून महत्तत्त्वापर्यंत जाणे कठीण आहे. मायेचे रूपकात्मक वर्णन. केवळ सद्‌गुरुकृपेने मायेची भ्रामकता कळते आणि देहाहंकार नाहीसा होऊन मायेचा पूर ओसरतो. आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी व ज्ञानी चार प्रकारचे भक्त असतात. त्यातील ज्ञानी परब्रह्मापर्यंत पोचतो. | परा, अपरा परापराचे नाण्यांच्या रूपकातून निवेदन<br><br>मायेतच गुंतल्याने परब्रह्माचा विसर, त्रिगुणात अडकण्यात निर्गुणाचा विसर पडतो. |
| ११० ते २१० | चार प्रकारच्या भक्तांत ज्ञानी भक्त ईश्वराशी कसा समरस होतो याचे विविध दृष्टांतांनी वर्णन. इतर भक्त ईश्वराला प्रियच असतात. ते संसारचक्रात अडकतात व तात्पुरत्या देवांची उपासना करतात. ते ईश्वररूप होत नाहीत. आर्त, जिज्ञासू आणि अर्थार्थी भक्त साधन म्हणून भक्ती करतात. ते ज्या ज्या देवरूपाची भक्ती करतात ती देवरूपे ईश्वराचीच असली तरी ती साधनरूप होऊन क्षणभंगूरच होतात. ज्ञानी मात्र अखेरपर्यंत सर्वाभूती परमेश्वर या विचाराने कर्म करीत ईश्वरभक्ती करतो. तो अखेर ईश्वररूपच होतो. अधिभूतासह (शरीरासह), अधिदैवाला (जीवाला), अधियज्ञाला (ज्ञानाला) जे शरीर मन ज्ञान यासह ईश्वराला शरण जातात ते अद्वैत होतात. अद्वैताची सप्तपदी– १) ब्रह्म २) अध्यात्म ३) कर्म ४) अधिभूत (शरीर) ५) अधिदैव (जीव) ६) अधियज्ञ (ज्ञान) ७) प्रयाण – आधारचक्र – षट्‌चक्र + प्रयाण (सहस्राधारचक्र) या सर्व पदी एकरूप होणे म्हणजे अद्वैत होणे किंवा मोक्ष ज्ञान होय. | आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी, हे हेतुपुरते देव भजतात. ते प्रपंचात अडकतात.<br><br>प्रपंच क्षणभंगूर तसे त्यातील हेतू क्षणभंगूर ते पूर्ण करण्यासाठी देव साधन हेही क्षणभंगूरच. म्हणून देवांच्या विविध रूपांतच प्रापंचिक अडकतो. |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

१) भक्तांचे चार प्रकार कोणते? का? त्यातील कोणता प्रकार सामरस्यापर्यंत जातो? २) भक्त आणि भगवान यांचे सामरस्य कोणत्या प्रकारे दृष्टांतासह वर्णन केले आहे? ३) माणूस प्रपंचात अडकल्याने हेतूपूर्ततेसाठी कोणत्या प्रकारे भक्ती करतो? त्यांचे स्वरूप दृष्टांतासह स्पष्ट करा. ४) भक्त आणि भगवान यांचे अद्वैत ज्ञान अर्जुनाला चमत्कारस्वरूप जाणवले त्याचे वर्णन करा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय आठवा : ब्रह्माक्षर निर्देशयोग** : भ. गी. श्लोकसंख्या २८, ओवीसंख्या २७१

**बैठक क्र. ८ दि. ०७/०२/२०२४ व ०८/०२/२०२४**

अर्जुनाचे सात प्रश्न व त्यास उत्तरे

३३ कोटी देव – अष्टवसु, एकादशरुद्र, द्वादश आदित्य, इंद्र आणि प्रजापति = ३३

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १ ते ५८ | ब्रह्म, कर्म, अध्यात्म, अधिभूत आणि अधिदैव म्हणजे काय? अधियज्ञ म्हणजे काय? प्रयाणकाळाची गती? असे प्रश्न – ब्रह्म – अविनाशी – अध्यात्म – अविनाशित्व – मर्म – सृष्टिव्यापार अधिभूत – नाशवंत, जीव (आत्मा) मूळ दैवत – अदिदैवत, अधियज्ञ – आत्मरूप (परब्रह्म) हे ज्ञान झाल्याने अष्ट सात्त्विक भाव दाटले – स्तंभ, स्तरभंग, रोमांच, अश्रू, वेपथू, स्वेद वैवर्ण्य, प्रलप. | ज्ञान अवस्थेत अष्टसात्त्विक भाव दाटतात. |
| ५९ ते १७८ | देह हे वरील वस्त्राप्रमाणे, टाकून दिले तरी आत्मा अमर असतो. ब्रह्मस्वरूपाशी बुद्धि एकरूप की देहभाव राहात नाही. अंतकाळी ज्या विषयाशी बुद्धि एकरूप होते तीच गती जीवात्म्याला मिळते. मन व बुद्धि श्रीकृष्णाठायी अर्पण करण्याचा उपदेश जो अभ्यासाने योगसाधना करतो तो मद्रूप होतो (सच्चिदानंद) ज्याने सच्चिदानंद रूप होण्याचा निश्चय केला आणि ज्ञानात्मक कर्म करू लागतो तो अखेर मद्रूपच होतो. निश्चय केला पण देह साथ देत नाही अशावेळी अवघा भाषाव्यवहार ज्यातून प्रकटला असे एकाक्षर ब्रह्म ॐ रूप त्याचाच जप केला तर योग साध्य समरसता प्राप्त होते. मद्रूप होता येते. त्यालाही पुनर्जन्म नाही. पुनर्जन्म नको असेल तर अभ्यासाने मद्रूप होणे आवश्यक आहे. असा मनाने व बुद्धीने नित्य परमेश्वराचे स्मरण असलेल्या परमेश्वर त्याच्याच ठायी असल्याचा अनुभव येतो. म्हणून निदान देहावसनाप्रसंगी ॐकार जप करावा. (जप–अभ्यास) ब्रह्मदेवाचे कालमापन हजार चौकड्यांचा दिवस व तेव्हढीच रात्र म्हणजे एक दिवस. अर्थात १४ आकड्यांच्या ऐवजी हे लक्षणेने म्हटले आहे. ब्रह्मदेव स्थिती ही सृष्टीरूपी बीजाचे साठवण अशी आहे. एवढ्या काळातही मद्रूप झालेल्या योग्याला जन्म मृत्यू नाही. | युद्ध करतांना म्हणजे मृत्यू समोर दिसत असताना कृष्णाचे ध्यान करावे.<br><br>कर्मयोगी वा संन्यासी दोघांनाही नित्य ॐकार अभ्यासाने मद्रूप होता येतो. अर्थात अजन्मा होता येते.<br><br>ब्रह्मदेवाच्या दिवसाचे परिमाण |
| १७९ ते २१९ | परमधाम म्हणजेच निर्गुण निराकार परब्रह्म होय. ज्याच्याठायी हे स्वरूप प्रकटले तो जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त होतो. कारण तो नित्य परम स्वरूप होतो. देह कर्म करीत असले तरी तो निद्रिताप्रमाणे स्वानंदात मग्न असतो. मृत्यू हा कालसापेक्ष आहे. त्यामुळे योग्याच्या आयुष्यातही अपघात होऊन, पुनर्जन्म येऊ शकतो व पुन्हा तपश्चर्या करावी लागते. | समाधीमग्नता |
| २२० ते २७१ | अर्चरा मार्ग (उत्तरायण मार्ग) फल. दक्षिणायन (धुम्र मार्ग) फल. जो तपश्चर्येपासून भ्रष्ट होऊन प्रपंचात गुरफटतो त्याची– पुनःजन्म फेरा. विवेकाने योगमार्ग सोडू नये. दृढयोग मार्गानेच स्वर्गापेक्षाही केवळ निरुपाधिक सुख अर्थात ब्रह्मसुख प्राप्त होते. | अर्चिरा मार्ग<br>धुम्रमार्ग |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

१) अर्जुनांचे सात प्रश्न कोणते? त्यांची उत्तरे स्पष्ट शब्दात लिहा. २) योगमार्गासाठी देह आणि मन यांसाठी कोणता विवेक पाळण्याचे मार्गदर्शन केले आहे ते तुमच्या शब्दात स्पष्ट करून लिहा. ३) ऋतुमानाप्रमाणे दोन मार्ग कोणते? त्यातील कोणता मार्ग सायुज्यमुक्ती स्पष्ट होण्यासाठी योग्य? का?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय नववा : राजविद्या राजगुह्य योग** : भ. गी. श्लोकसंख्या ३४, ओवीसंख्या ५३५ (पैकी १ ते १८७) (भाग पहिला)

**बैठक क्र. ९ दि. १४/०२/२०२४ व १५/०२/२०२४**

राजविद्या म्हणजे ज्ञानयोग. गुह्य – महत्त्वाचे व गुप्त ज्ञान. परमेश्वर सर्वत्र भरून असे ज्ञान झालेला तो ज्ञानी. भगवंताची भक्ती हाच सर्वोत्तम ज्ञान मार्ग होय.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १ ते ३३ | श्रोतृसंवाद – लडीवाळपणे, श्रोत्यांना सर्वज्ञ मानून, अवधानाची विनंती<br>**अनन्वय** अलंकाराची आश्चर्यकारक उदाहरणे येथे आढळतात.<br>ओवी क्र. २०, २१, २२ तशीच **व्यतिरेकाची** उदाहरणे २४, २५.<br>अलौकिक **स्वभावोक्ती** २५, २६, २७, २८, २९. | उत्तम वाग्विलास. |
| ३४ ते ८८ | सत्‌शिष्य किंवा ज्ञानपिपासू अर्जुन म्हणून ज्ञान निवेदन. ज्ञानविज्ञान कथन – निःशंक करणारे ज्ञान. श्रद्धावानाला हे ज्ञान मिळते. परमेश्वरापासूनच सर्व विस्तार परमेश्वरात त्याचा समावेश. हे जाणून घेणे आवश्यक. परमेश्वर विस्तारला की भूते (आकार दिसतात) म्हणजे परमेश्वरच सर्व आकारात असतो. ते आकार त्याच्यातच लय पावतात तरीही तो ठायीच सत्य स्वरूपात असतो – प्रसरण आणि विलयन हे केवळ माया आहेत म्हणजेच सर्वांभूती परमेश्वर, सर्वांभूती परमेश्वरी तरी परमेश्वर तटस्थ केवळ हेच सत्य. राजाश्रिया योग वर्णन ऐश्वर्य योग – सर्व विस्तारूनही तटस्थ राहणे – हे वर्णन केले. | प्रकृतिविलास<br>मायावाद<br>सांख्यदर्शन (विज्ञान)<br>हेच स्वप्न ठरविले. |
| ८९ ते १८७ | ११७ व्या ओवीमध्ये प्रकृतिविलास – (पुरुष तटस्थ) – राजाचे रूपक ओवी क्र. ३१–३५ ऐश्वर्ययोग. मी त्रिभुवनात नाहीत, भुते माझ्यात नाहीत – तरी मीच सर्वत्र सत्य, हे गूढ उकलून दाखविले.<br>निर्गुण, निराकार, निर्विकार सत्याला कल्पनेने सगुण पाहणे म्हणजे भ्रामकत्व होय. ओवी १५५ ते १६२. कल्पनेच्या खेळात सत्य म्हणून रमतात – विज्ञानातच सत्यपणाचा आनंद घेण्याचा प्रयत्न करतात. प्रतिकपूजा ही केवळ तात्कालिक असते.<br>ओवी १७० जो विज्ञानाला सत्य मानतो त्याला ज्ञानापर्यंत येता येत नाही.<br>मूर्खाला सत्य सांगणे योग्य नाही १८७ ओ. | अलंकारिकता |
| | १) श्रोतृसंवादातील वाग्विलास सोदाहरण वर्णन करा.<br>२) ऐश्वर्ययोग ही कल्पना स्पष्ट करा.<br>३) सगुण रूपाविषयीचा अभिप्राय स्पष्ट करा.<br>४) सत्यनिवेदनासाठी कोणती मर्यादा घातली आहे? | |

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय नववा : राजविद्या राजगुह्य योग** : भ. गी. श्लोकसंख्या ३४, ओवीसंख्या ५३५ (पैकी १८८ ते ३५०) (भाग दुसरा)

**बैठक क्र. ९ दि. २१/०२/२०२४ व २२/०२/२०२४**

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १८८ ते २९५ | जो पूर्ण ज्ञानी झाला म्हणजे स्वरूप स्थितीत पोहचला तो केवलानंद शांतिमग्नतेने मद्‌रूप होऊन माझी सेवा करतो. (म्हणजे ब्रह्मांडातील चराचराची सेवा करणे) **ज्ञानोत्तर भक्ती** त्याची स्थिती विरोधाभासाने वर्णन केली आहे. ओ. २०१ ते २०४. असे ज्ञानी भक्त परमेश्वराची कीर्ति गातच वावरतात.<br>क्षेत्र म्हणजे देह. देहाहंकारी मन ह्या क्षेत्रात ज्ञानी विरागी होऊन राहतो. ब्रह्मानुभवी पुरुष हा भगवंताला सत्य असे परमेश्वरस्वरूपच वाटतात. समाधीयोगाने देहरूपी किल्ल्यावर विजय प्राप्त केला. आत्मानुभवाचे राज्य सुख अनुभवले. सर्वसृष्टी हे माझेच रूप अर्थात आत्म्याचेच रूप मानून कर्म हाच यज्ञरूप भक्ति असे त्याचे वर्तन असते.<br>(१) हटयोगी देहाशी संग्राम करून समाधी सुख अनुभवतो तर<br>(२) कर्मयोगी स्वधर्माचरणाने यज्ञस्वरूप सेवेत गढून त्याला आत्मसुखाचा अनुभव घेतो. कर्मयोग्याच्या धारणादृष्टीचे वर्णन– वाणी, चराचर वस्तुजात, प्राणीजात, पंचमहाभूते म्हणजे ब्रह्मांडातील सर्व घटक हे परमात्मारूप आहेत हे जाणून आपले कर्म आहुतीरूप करीत असतो. त्याला तेच समाधी सुख मिळते. त्याच्या ठायी परमेश्वरच सर्वसत्ताधीश आहे असा भाव असतो. हे जाणून तो समर्पित भावाने कर्मयज्ञ करतो. | ज्ञानोत्तर भक्तीची अवस्था<br>ओ. १९६<br><br>गुरुवीभक्ती<br>सद्‌गुरु परंपरेत निवेदित केलेला योगमार्ग |
| २९६ ते ३३४ | परमात्मा आणि सृष्टी एकरूपच आहे. विनाशी अविनाशी ही दोन्ही रूपे परमेश्वराची आहेत हे कळत असूनही जे त्यांना नाकारतात ते अज्ञानी, त्यांना आत्मसुख मिळत नाही. विज्ञानालाच ज्ञान समजून, मी सर्वत्र भरून आहे हे कळत असूनही स्वधर्म निष्कामपणे करीत नाहीत असे हेतुपूर्वक कर्म करणारे यज्ञयागादी तपसाधना करूनही जीवनमुक्त होत नाहीत. जे स्वर्ग आणि नरक या सुखदुःखात्मक भ्रामक कल्पनात अडकत नाहीत. परमेश्वरच सर्वत्र आहे हे ज्ञान घेण्याची पात्रता असून जे स्वतःचीच फसवणूक स्वार्थमूलकतेने करतात ते कल्पवृक्षाखाली बसूनही भिकारी राहतात. ह्याचा विचार करावा. अन्यथा जन्ममरण फेऱ्यात अडकतात. परमेश्वराची जाणीव दृष्टीआड करून वागणे म्हणजे मृत्यूच्या फेऱ्यात सापडणे. | स्वर्ग आणि नर्क ह्या ऐहिक जीवनसापेक्ष भ्रामक कल्पना आहेत. |
| ३३५ ते ३५० | जो ईश्वरस्वरूप होऊन कर्म करतो, सर्वात्मक परमेश्वर जाणून जो निरासक्त कर्म करतो, त्याच्या जीवनाचा त्या व्यक्तीला विचारच करावा लागत नाही कारण त्याचे जीवन म्हणजे तो परमेश्वरच असतो. | ज्ञानात्मक कर्माचे फळ म्हणजे परमेश्वर स्वरूप होणे होय. |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) पूर्ण ज्ञानी विभूतिमत्त्वाची वैशिष्ट्ये विषद करा. (२) हटयोगी देहाशी योगी संग्राम कसा करतो ते योगसंग्रामाचे रूपक स्पष्ट करून सांगा. (३) माणूस स्वतःचीच फसवणूक करतो असे का म्हटले आहे?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय नववा : राजविद्या राजगुह्य योग** : भ. गी. श्लोकसंख्या ३४, ओवीसंख्या ५३५ (पैकी ३५१ ते ५३५) (भाग तिसरा)

**बैठक क्र. ९ दि. २८/०२/२०२४ व २९/०२/२०२४**

भक्तीचे स्वरूप, भक्तीचा अनुसार प्रापंचिकांनी कसा करावा याचे ज्ञान.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| ३५१ ते ३८१ | निरनिराळ्या देवतांच्या नावाने यज्ञ केले तरी त्यांचा भोक्ता मीच (परमात्मा) असतो. स्वतः आपण त्या परमेश्वराचा अत्यंत लघु अंश आहोत असे निरहंकारी व्यक्तिमत्त्व सिद्ध करून परमेश्वराला भजावे त्याला तो परमेश्वर सहज असतो. शिव, लक्ष्मी यांनाही हे लहानपण स्वीकारल्यानेच परमेश्वर प्राप्ती आली. | अहंकारशून्य व्हावे तरच सायुज्य मुक्ती |
| ३८२ ते ३९७ | केवळ शुद्ध, उत्कट भक्तीनेच मी (परमात्मा) प्रसन्न होतो. अर्पण करण्याच्या वस्तु या केवळ निमित्तसाधनमात्र आहेत. | |
| ३९८ ते ४०६ | जे कर्म करशील ते निर्मळमनाने अहंकारशून्यपणे मला अर्पण कर अन्यथा केलेले कर्म केवळ भोग ठरतील आणि जन्ममरण फेरा चुकणार नाही म्हणून सारे मलाच (परमात्म्यालाच) अर्पण करणे हाच सुलभ राजयोग होय. | |
| ४०७ ते ४४२ | मी सर्वांच्या ठिकाणी असल्याने सर्व माझेच. त्यात आपपर लहान–मोठा नाही. जो भक्तीने माझ्याठायी आला त्याशी मी (परमात्मा) एकरूप होतोच. त्याला अक्षय शांती – सायुज्यता प्राप्त होते. भक्तीनेच परमेश्वरस्वरूप होता येते. कोणतीही लहान–थोर अवस्था असो. जेथे माझी (परमेश्वराची) भक्ती आहे. त्याचा उद्धार होतोच. | |
| ४४३ ते ५१६ | भक्ती करायला कोणताही भेद आड येत नाही. जो भक्ती करील तो परमेश्वरस्वरूप होईल. कोणत्याही उद्देशाने परमेश्वराचे स्मरण झाले तरी परमेश्वरापर्यंत जाता येते. पौराणिक कथा नद्या व समुद्र आदींचे दृष्टांत दिले. भक्ती हेच इहलोकीचे सायुज्यमुक्तीसाठीचे साधन होय. मृत्यूलोकात सर्वच देहासक्तीने वासनापूर्तीच्या मागे लागून दुःख सोसत असतात. त्यांना नश्वरता माहीत असूनही ते अंधपणे वासनाधीन होतात. यातून सुटण्याचा मार्ग म्हणजे परमेश्वर सत्य हे लक्षात घेऊन त्याचीच भक्ती करणे होय. | |
| ५१७ ते ५३५ | सर्व सुख प्राप्त होण्यासाठी ईश्वरभक्ती व समर्पितता हा एकमेव मार्ग आहे हे गुह्य सांगितले. परमेश्वरसुखाचा अनुभव घेताना अष्टसात्त्विक भाव दाटून येतात (स्तंभ, स्तरभंग, रोमांच, अश्रू, वेपथू, स्वेद, वैवर्ण्य आणि प्रलय) तशी संजयाची अवस्था झाली. मात्र दुर्भाग्यवश धृतराष्ट्राला हे साध्य झाले नाही. | भक्तीची अनिवार्यता अष्टसात्त्विक भाव |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) भवसागरात अज्ञानवश प्रापंचिक कसे गुंततात याचे वर्णन करा. (२) भवसागरातून सुटण्याचा सुलभ मार्ग कोणता हे विविध दृष्टांतातून कसे समजावून दिले. (३) संजयाला ज्ञान झाले आणि अष्टसात्त्विक भाव दाटून आले अशा अवस्थेचे वर्णन करा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय दहावा : विभूतियोग** : भ. गी. श्लोकसंख्या ४२, ओवीसंख्या ३३५ (पैकी १ ते १८४) (भाग पहिला)

**बैठक क्र. १० दि. ०६/०३/२०२४ व ०७/०३/२०२४**

श्रीगुरु माहात्म्य वर्णन. भगवंताने सर्वव्यापकता वैशिष्ट्यपूर्ण उदाहरणांनी स्पष्ट करून सांगितली.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १ ते २३ | सद्गुरुकृपा वर्णन केले आहे. | ज्ञानावस्थेचे श्रेय श्रीगुरुंना |
| २४ ते ३२ | १ ते ९ अध्यायांची अवतरणिका | उजळणी |
| ३३ ते ४० | नऊ अध्यायांच्या चर्चेचे श्रेय श्रीगुरुंना दिले. | |
| ४१ ते ४९ | दहाव्या अध्यायाचा प्रस्ताव व मराठी भाषेची थोरवी. | संस्कृत–नागर मराठी बोली |
| ५० ते ९१ | ९ अध्यायांच्या आकलन परीक्षेत अर्जुन उत्तीर्ण झाल्यामुळे तेच ज्ञान भगवंत विस्ताराने सांगतात. मात्र ते आपण स्वतःचे ज्ञान उजळण्यासाठी सांगतो आहोत असे म्हणतात. भगवंतच सर्व विश्वप्राकट्याचे उगमस्थान असल्याने त्याचे आकलन सामान्य विभूतींना होत नाही.<br>भगवंताची सर्वात्मकता जो जाणतो ती विभूति भगवंतस्वरूप ज्ञानी असते. भगवंताचे स्वरूप विभूतींच्या उदाहरणातून पाहता येते. सर्वविकार (सर्व प्रकारचे जीव) भगवंताचीच रूपे आहेत. | अवघ्याचे ज्ञान – साधनेतील महत्त्व |
| ९२ ते १०३ | परमेश्वराच्या मनापासून मनु, ऋषी, लोक, लोकपाल, प्रजा अशा सृष्टीउत्पत्तीचे वर्णन. | चार मनु, सात ऋषी असे ११ राजे व ही त्यांची प्रजा |
| १०४ ते १४० | सर्व परमेश्वरापासून निर्माण व परमेश्वररूपच आहे असे अभेद ज्ञान अनुभवून जो परमेश्वराची भक्ती करतो तो जीवनमुक्त होतो. त्यासाठी भक्तियोग सूत्र (ओ. ११८) परमेश्वरच सर्वकाही आहे हे जाणून समरसतेने जो वर्तन करतो त्यावर परमेश्वर मातेप्रमाणे प्रेम करतो. सर्वाभूती परमेश्वर अशी त्याची बुद्धी आकलन करते. (समबुद्धी) (बुद्धियोग) | भक्तियोगाला बुद्धियोगाचे स्वरूप – श्रद्धा व ज्ञान प्राप्त होते. |
| १४१ ते १४८ | अर्जुनाला भक्तियोग बुद्धियोगाने प्राप्त झाला. आत्मज्ञान झाले. | |
| १४९ ते १८४ | पंचीकरणातील पुरुष तूच आहेस याचे ज्ञान झाले. (पुरुष–सांख्ययोग) परमेश्वरच अंतरबाह्य आहे याचे ज्ञान झाले. नारदांनी याच ज्ञानाचे गायन केले आहे. व्यासांनी तेच सांगितले. ते आता प्रत्यक्ष परमेश्वराच्या मुखाने ऐकल्याने पूर्णज्ञान झाले. तरीदेखील ते अधिक स्पष्ट करण्यासाठी विभूतींची उदाहरणे देण्याची विनंती अर्जुन करतो. कारण त्याचा तोच पूर्णज्ञान प्रकटवू शकतो. | |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) सद्गुरुचे माहात्म्य वर्णन करून लिहा. (२) १ ते ९ अध्यायांची अवतरणिका सूत्ररूपाने कशी सांगितली ते स्पष्ट करा. (३) मराठी भाषेची थोरवी कोणत्या शब्दांत वर्णन केली आहे? (४) भक्तियोगाचे प्रवचन श्रीकृष्णाने अर्जुनापुढे का करावयाचे ठरविले? (५) परमेश्वराची मनापासून विश्वोत्पत्ती कशी होत गेली हे क्रमपूर्वक सांगा. (६) अभेद ज्ञानाचे महत्त्व भक्तियोगात कोणत्या प्रकारे पटवून दिले आहे. (७) भक्तियोगाचे सूत्र स्पष्ट करा. (८) भक्तियोगातून बुद्धियोग कसा साधला जातो ते स्पष्ट करा. (९) श्रीकृष्णांनी सर्वात्मकतेचे प्रसृत केलेले ज्ञान यापूर्वी अर्जुनाने कोणाकोणाकडून ऐकले होते. (१०) सर्वात्मक सृष्टीचे बीजवृक्ष सांगरूपकातून स्वरूप स्पष्ट करा. (११) पाणी आणि प्रकाश यातील सर्वात्मकतेचे दृष्टांत स्पष्ट करा. (१२) श्रीगुरु वर्णनातील अनुप्रासात्मकता स्पष्ट करा. (१३) अर्जुनाने विभूतियोग सांगण्याची विनंती का केली?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय दहावा : विभूतियोग** : भ. गी. श्लोकसंख्या ४२, ओवीसंख्या ३३५ (पैकी १८५ ते ३३५) (भाग दुसरा)

**बैठक क्र. १० दि. १३/०३/२०२४ व १४/०३/२०२४**

भक्तीचे महत्त्व स्पष्ट करून भक्तीमुळे अर्जुनाला ज्ञान प्राप्त होत आहे असे कथन करून विभूतींची जीवनाच्या सर्व अंगोपांगातील उदाहरणे दिली आहेत. निर्माता व अंत परमेश्वरच असतो असे कथन केले.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १८५ ते २०५ | अर्जुनाने अत्युत्कट भक्तीने, कोणत्या विभूतींचे वा वस्तूंचे दर्शन घेता परमात्म्याचा अनुभव येईल त्या विभूति कथन करण्याची प्रार्थना केली. | विभूतियोग सांगण्याचा प्रस्ताव |
| २०६ ते २२० | परमात्मा सर्वव्यापी असून, त्यातील उदाहरणे देणेही कठीण आहे. म्हणून प्रधान (महत्त्वाच्या) विभूति श्रीकृष्ण सांगतो असे ज्ञानेश्वर म्हणतात. | |
| २२१ ते २७२ | विष्णू आदित्य, अंशुमान (सूर्य), मरीची, चंद्रमा, सामवेद, इंद्र, मन, चेतना, शंकर, कुबेर, अग्नी, मेरूपर्वत, बृहस्पती, कार्तिकेय, सागर, भृगु, ॐ, जपयज्ञ, हिमालय, पिंपळवृक्ष, नारद, चित्ररथगंधर्व, कपिलमुनी, उच्चेश्रवाअश्व, ऐरावत, राजा, वज्र, कामधेनू, मदन, वासूकीसर्प, अनंतनाग, वरुण, अर्यमापितर, यम, प्रल्हाद, काल, सिंह, गरुड, वायू, राम, मकर, जान्हवी. सृष्टीचा आदि, मध्य व अंत परमेश्वर आहे. विभूति केवळ मोजकी उदाहरणे आहेत.<br>अध्यात्मविद्या, वाद, अ हे अक्षर, द्वंद्वसमास, विश्वोत्पत्ती करणारा 'पुरुष' (सांख्यदर्शन) – अमर्यादकाळ, ब्रह्मदेव (पुरुष) | विभूति कथन |
| २७३ ते २९९ | सर्वसंहारक मृत्यू व सर्वनिर्माता परमेश्वरच आहे. स्त्रीवाचक शक्ती, किर्ती, संपत्ती, वाणी, स्मृती, बुद्धी, धृती, क्षमा या सातही परमेश्वर विभूति आहेत.<br>बृहतसाम, गायत्रीछंद, मार्गशीर्षमास, वसंतऋतु, द्युत, तेज, सिद्धी (विजय), उद्योग, सत्व, यादवीत श्रीकृष्ण, अर्जुन, व्यासमुनी, मुशना अर्थात शुक्राचार्य, न्याय. (ओवी क्र. २८७ ते २९२) कृष्णगौरव, शासन, नितीशास्त्र, मौन, ज्ञान, एकूण – ७५ विभूति. | विभूति कथन<br>७५ विभूति |
| ३०० ते ३३५ | सर्व भूतमात्रांचे बीज परमेश्वरच, संपत्ती आणि दया जेथे एकत्र आहेत ती माझी विभूति होय. सर्वात्मकता जाणावी – समदृष्टीने पाहावे. परमेश्वर एकाच अंशाने सर्व विश्व व्यापून आहे.<br>संजयाची खंत– विभूतियोग धृतराष्ट्राला कसा कळणार? अर्जुनाला विराटस्वरूप पाहण्याची इच्छा झाली. | |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) अर्जुनाने विभूति स्पष्ट करून सांगण्याची विनंती का केली? (२) श्रीकृष्णाने अर्जुनाला विभूतिज्ञान देण्याचे का ठरविले? (३) कोणत्या व किती विभूतींचा उल्लेख श्रीकृष्णाने केला आहे? जीवनाच्या धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चारही अंगांसंबंधी त्यांचे प्रातिनिधिकत्व कसे जाणवते? (४) विभूति जाणण्याचे कोणते सूत्र श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले? (५) संजयाला कोणती खंत वाटली स्पष्ट करा. (६) अर्जुनाने अखेर कोणती इच्छा व्यक्त केली?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय अकरावा : विश्वरूपदर्शनयोग** : भ. गी. श्लोकसंख्या ५५, ओवीसंख्या ७०८ (पैकी १ ते १९६) (भाग पहिला)

**बैठक क्र. ११ दि. २०/०३/२०२४ व २१/०३/२०२४**

अर्जुनाच्या इच्छेनुसार भगवंताचे विश्वरूप दर्शन. विश्वरूप केवळ दिव्यदृष्टीलाच दिसते.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १ ते १० | शांत व अद्भूत रसात्मक, त्रिवेणी संगमासारखा पवित्र असा रसाळ व नेत्रदीपक, पावनकारक, विश्वरूपदर्शनप्रसंग श्रीगुरु कृपेने संस्कृतातून मराठीत आला आहे. त्याचा लाभ, संसारास विसरून घ्यावा. | शांत व अद्भूत रसात्मक अध्याय |
| ११ ते ४३ | अध्याय मोक्षदायी आहे, देवाचे विश्रांतीस्थान. मराठीमुळे अनुभव सर्वगत झाला. श्रोते व सद्गुरु यांना अवधान देऊन आपल्याकडून मला बोलविते करून आपणच आपले अनुभव माझ्या मुखे ऐकवावे, असे अवधानाचे अमृतसिंचन करावे. गीतेची व गीतेतील ज्ञानाची थोरवी. अर्जुनाच्या मनाची संकोचपूर्ण अवस्था व आतुरता. स्वतःच्या अधिकाराचे चिंतन आणि विश्वास. देव आणि भक्त प्रेमभाव हेच विश्वरूप दर्शन घडविण्याचे कारण. | श्रोतृसंवाद |
| ४४ ते ६८ | देहाहंकाराने, संसारप्रपंचच सत्य मानून मोहवश झालेल्या अर्जुनाला वराह अवतारात बुडत्या पृथ्वीला वर काढावे तसे अध्यात्मज्ञान देऊन अर्जुनाला अधःपतनातून सावरले अशी कृतज्ञता अर्जुन व्यक्त करतो. | |
| ६९ ते ८८ | मोहापासून दूर होऊन आत्मज्ञान संपादन करणाऱ्या अर्जुनाने निःसंकोच विश्वरूप दर्शनाची इच्छा व्यक्त केली. | |
| ८९ ते १२२ | विश्वरूप पाहण्याची आपली योग्यता आहे का? या शंकेने व्याकूळ अशा अर्जुनाने श्रीकृष्णाची योग्यायोग्य अशा सर्वांसाठीची उदारता लक्षात घेऊन; श्रीकृष्ण आपल्या इच्छेप्रमाणे विश्वरूप दाखवेल अशी अर्जुन खात्री बाळगतो. परंतु विश्वरूप दर्शनाचा अनुभव घेण्यात आपली दृष्टी योय आहे का? असाही प्रश्न होता. श्रीकृष्णाने भुकेल्या भूमीवर मेघाने वर्षावे अशा अधीरतेने आपली अनेक रूपे दाखविण्यास सुरुवात केली. नंतर अर्जुनाला समर्थ दृष्टी हवी हे लक्षात आले. | अर्जुनाला दिव्य दृष्टी नाही हे लक्षात न घेता भक्ताला विश्वव्यापक स्वरूप दाखविण्यासाठी श्रीकृष्ण अधीर झाला. |
| १२३ ते १६४ | श्रीकृष्णाने विश्वस्वरूप अनेकविध रूपे दाखविण्यास सुरुवात केली. पंचमहाभूतांपासून सृष्टीनिर्मितीतील विविध रूपे दाखविली. अर्जुनास पाहाण्याचे आवाहन केले, तेव्हा त्याला पाहाता येत नाही हे लक्षात घेऊन श्रीकृष्णाने आत्मज्ञानात्मक, दिव्यदृष्टी प्रदान केली. या वर्णनात श्री ज्ञानदेवांची प्रतिभा लालित्यपूर्ण अद्भूतरसाने ओतप्रोत सृष्टीतील विविधतेचे वर्णन करते. | अद्भूत वैविध्य |
| १६५ ते १९६ | संजयांना, अर्जुनाला दिव्यदृष्टी शक्तिपाताने कशी प्राप्त झाली हे समजले. हे संपूर्ण विश्व ज्यातून निर्माण झाले तेथेच ते समरस होते याचा आत्मज्ञानात्मक अनुभव अर्जुनाला कसा झाला? संजयाने पाहिले व थक्क झाला – अद्भूत रस. | |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) अकरावा अध्याय त्रिवेणी संगम आहे असे ज्ञानेश्वरांना का वाटते स्पष्ट करा. (२) हा अध्याय मोक्षदायी आहे असे ज्ञानेश्वर का म्हणतात? (३) अर्जुनाच्या मनात कोणत्या शंका निर्माण झाल्या? त्या कशा दूर झाल्या? (४) विभूतियोग श्रीकृष्णाने कोणत्या भावनेने सांगितला? (५) अर्जुनाला दिव्यदृष्टी का आवश्यक होती? ती कोणत्या आधारे प्राप्त झाली? (६) अद्भूत रसाची उदाहरणे स्पष्ट करून लिहा. (७) संजयाला श्रीकृष्णार्जुनांचा कोणता प्रसंग दिव्यदृष्टीने अनुभवता आला. त्याला कोणत्या गोष्टीची खंत वाटली? (८) श्रीकृष्ण योग्यायोग्यता न पाहता केवळ नामभक्तीने उद्धार करतो असे अर्जुनाला कोणत्या उदाहरणांवरून वाटले? (९) उल्लेखित किमान पाच पुराणकथा स्पष्ट करा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय अकरावा : विश्वरूपदर्शनयोग** : भ. गी. श्लोकसंख्या ५५, ओवीसंख्या ७०८ (पैकी १९७ ते ३९१) (भाग दुसरा)

**बैठक क्र. ११ दि. २७/०३/२०२४ व २८/०३/२०२४**

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १९७ ते २३६ | विश्वरूपाची अनेक सौम्य, सुंदर, भयावह, भयंकर, विक्राळ अशी विविध मुखे पाहिली. त्यावरून दर्शन पूर्ण होईना म्हणून डोळे पाहिले तेही मुखाप्रमाणे अनेक प्रकारे झळाळत होते. म्हणून पाय शोधले, हात शोधले व एकूण सर्वांग शोधले तेव्हा अंग, अलंकार, हातपाय, जीव, शरीर सारे कृष्णानेच भरले असे असे ज्ञानात्मक दर्शन अर्जुनाला झाले. अर्जुनाला सर्वत्र व्यापक अद्भूत असे विश्वंभर दर्शन डोळे झाकले तरी घडत होते. हे दर्शन अद्भूत रसाचा परिपोष करणाऱ्या चमत्कृतीपूर्ण कल्पनाविलासाने करतात. त्या सर्वव्यापी, सर्वदर्शी विश्वरूपाचे दर्शन अर्जुनाला होते. ते दिव्यदृष्टीमुळे संजय हस्तिनापुरात घेत होते. | अनेक रूपांनी विश्व भरले आहे. |
| २३७ ते २५४ | संजयालाही ते अद्भूत सर्वव्यापी दर्शन होत होते. ते दर्शन घेताना स्वतःही त्यातच सामावलो आहोत. अर्जुनही त्यातच सामावला आहे असे अद्वैताचे ज्ञान अर्जुनाला आणि संजयाला झाले असे श्री ज्ञानेश्वर सांगतात. | दिव्य दृष्टी असलेल्या संजयाला हे रूप पाहता येते. |
| २५५ ते २९३ | दिव्य दृष्टीने अर्जुनाला विश्वरूपदर्शनात सर्वलोक, सर्वभूते, त्रिदेव, ऋषी आदि सर्व विश्वरूपात साठविले आहे. त्यात सगुण श्रीकृष्णही आहे. संपूर्ण पसारा त्यातच सामावला आहे हे पाहून यात आदि, मध्य, अंत नाही असा निराकार विश्वरूप असा परमेश्वर आहे. मात्र भक्ताच्या समाधानासाठी भक्ताला आवडणारे रूप तो धारण करतो. तोच सर्व विश्वाचा सारथी असल्याचा अनुभव अर्जुनाला आला. | विश्वरूप दर्शनाने आदि, मध्य, अंत नसलेल्या सर्वव्यापक स्वयंभू परमेश्वराचे ज्ञान झाले. |
| २९४ ते ३९१ | श्लोक क्र. १५. ओवी २५५ पासून विश्वरूपदर्शन स्तोत्र आहे. त्यातील २९३ ओव्यांपर्यंत अद्भूतातले दिव्य दर्शन होते. त्यापुढे अर्जुनाला भयचकित व भयाकूल करणारे दर्शन घडले व शरण्यभाव प्रकटला. २५ सांख्य तत्त्वे – (देहतत्त्वे) – चत्वार मनु + सप्तर्षी = ३६ तत्त्वे ॐकारातून लक्षात आली. त्यांच्या पलिकडे परमात्मा ३७ वे तत्त्व (नाथांचा आत्मा) विश्वरूप दर्शनाने सर्वव्यापक अशी कृपा अनुभवास येते त्यास ते सर्वसमावेशक प्रलयंकारी वाटते त्यामुळे प्रापंचिकांना ते भयंकर वाटते. अर्जुनाला भय वाटते आहे. कारण जर आपण या विश्वरूपात सामावलो तर विश्वरूपाचा दिव्यानंद कसा घेणार? विश्वरूप हे पूर्णाद्वैत तर रूपदर्शन आणि दर्शक अर्जुन कृष्ण द्वैत. द्वैताशिवाय कृपाळू सर्वसमावेशक आनंदमय देवाचा अनुभव घेता येत नाही. सर्व विश्व जर त्याच परमात्म्यात सामावले तर महाप्रलयाचा भयावह अनुभव येऊन; विश्वरूपापासून घटकरूपाला (अर्जुनाला) (सामान्य माणसाला) दुःख भय यांचेच अनुभव येतील म्हणून सामान्य प्रापंचिक द्वैतभाव स्वीकारून कृपावंत परमेश्वराची भक्ती करणे योग्य असा विचार अर्जुनाच्या मनात येते व तो सौम्यरूप धारण करण्याची विनंती करतो. | |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) अर्जुनास विश्वरूप दर्शनात दोन प्रकारची अनुभूती कोणत्या प्रकारे येते? (२) संपूर्ण सृष्टी विश्वरूपात सामावते आहे हे कोणत्या घटकांच्या उल्लेखातून अर्जुनाने सूचित केले? (३) श्रीकृष्ण हे ३७ वे तत्त्व आहे असे अर्जुन का मानतो? (४) सामान्य माणसाला विश्वरूप दर्शनाने दुःखच अनुभूत होईल असे अर्जुन का म्हणत आहे? (५) दिव्यदृष्टीलाही विश्वरूप दर्शन अनुभवणे कठीण आहे असे अर्जुनाला का वाटले? (६) संजयाचे श्रेष्ठपण कोणत्या प्रकारे अधोरेखित होते? (७) श्रीकृष्णाने पुन्हा सौम्यरूप धारण करावे असे अर्जुन का विनवित आहे? (८) विराटरूपाच्या स्तोत्रात अद्भूत आणि भयानक रसांचा परिपोष कसा झाला ते सोदाहरण स्पष्ट करा. (९) भीतीलाही भीती वाटेल अशा अनुभूतीची वर्णने श्री ज्ञानेश्वर.कोणत्या उदाहरणातून.करतात?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय अकरावा : विश्वरूपदर्शनयोग** : भ. गी. श्लोकसंख्या ५५, ओवीसंख्या ७०८ (पैकी ३९२ ते ५६०) (भाग तिसरा)

**बैठक क्र. ११ दि. ०३/०४/२०२४ व ०४/०४/२०२४**

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| ३९२ ते ४४३ | सर्व कौरव सैन्य श्रीकृष्णाच्या मुखात गेल्याचे पाहून, आपण विभूती दर्शन घेऊन संतुष्ट न होता, विश्वरूप दर्शनाचा हट्ट धरल्याने प्रलय लोटला. विधीलिखित चुकत नाही पण आपणच याला कारणीभूत झालो असे वाटून अर्जुन दुःख करू लागला. वास्तविक कोणीच कोणाचे कारण वा कार्य नाही सर्व निर्मिती व विनाश परमेश्वरातच आहे हे परमसत्य सांगण्यासाठी विश्वरूप दर्शन घडविले. प्रलयकाळच्या अवस्थेत सर्व परमेश्वरमुखी गिळले जाते असा महाप्रलयाचा अनुभव येतो. महाप्रलय काळी (१४ मन्वंतरातील स्वर्ग कल्पना १४ व सप्तपाताळ कल्पना या अशा २१ लोकावस्था) पाताळासह स्वर्ग सर्व २१ लयाला जातात. विश्वरूपाच्या विक्राळ आणि सौम्य अशा विविध मुखात सर्व सामावते आहे असे दिसते. हा विनाश पाहून विश्वरूपाची न संपणारी भूक आणखी किती विनाश करणार हे जाणून आता आपलाही विनाश अटळ आहे असे अर्जुनाला वाटले व त्याने जगत्पालनाच्या व्रताची विश्वरूपाला आठवण करून दिली. म्हणजे अर्जुनाला विश्वरूप विनाशकारी दर्शन असह्य झाले | परमेश्वर– आदि व अंत विश्वरूपातून सर्वव्यापी सर्व प्राकट्याचे व विनाशाचे समावेशन – परमेश्वर! |
| ४४४ ते ४५० | विनाश थांबविण्याची अर्जुनाची प्रार्थना. हाच श्रीकृष्ण आहे, याविषयी शंका. | |
| ४५१ ते ४८१ | अर्जुनाच्या विनवणीने श्रीकृष्णाने महाप्रलयाचे रहस्य सांगितले. सर्व असत्य नाश पावते व सत्य तेच शिल्लक राहते त्याप्रमाणे पांडव राहतील अन्य सर्व नष्ट झाले आहेत. ते नष्ट होण्यास अर्जुन केवळ निमित्त आहे. असत्य नष्ट होण्यास सत्य निमित्त असते. विश्वरूप या सत्याने असत्य अगोदरच नष्ट केले आहे त्यामुळे अर्जुनरूपी सत्यपक्ष हा केवळ निमित्त असून ते निमित्त आभासाचा नाश करते. | महाप्रलयात सत्यच शिल्लक राहते. |
| ४८२ ते ४९० | अपूर्ण मनोरथ अवस्थेत संजयांनी धृतराष्ट्राला कथा सांगितली. त्यावेळी अर्जुनाची अवस्था सुखी की दुःखी हे भयावस्थेमुळे कळत नाही असे संजयाला वाटले. अतिशय गांभीर्याने श्रीकृष्ण अर्जुनाला अनुभव घेण्यास सांगतो तेव्हा भयग्रस्त अवस्थेत अर्जुन निवेदन करू लागतो. | |
| ४९१ ते ५६० | विक्राळ रूपात सर्वच गिळंकृत केले आहे. असे महाप्रलयाचे रूप अर्जुनाने पाहिले व भयचकीत झाला. श्रीकृष्णाने गांभीर्याने कौरव व पांडव सैन्य स्वतःत सामावल्याचे चित्र दाखवून पांडव शिल्लक राहतील असे आश्वासन दिले. हे विश्वाला विश्वातील चांगल्या वाईट सर्व गोष्टींना सामावून टाकणारे विश्वरूप पाहून अर्जुनाला श्रीकृष्णाच्या अनंत व्यापक विश्वरूपाचे ज्ञान झाले आणि त्या दिव्य रूपाला तो नमस्कार करू लागला. ते विश्वरूप सर्वसमावेशक, आदि अंत नसलेले, पाठपोट नसलेले असे अनुभवास आल्याने ज्ञानमय अवस्थेतील अर्जुनाला नमस्कार कोठे करावा असा संभ्रम निर्माण झाला. अष्टसात्विक भाव दाटून अर्जुन पूर्ण शरण गेला तेव्हा अज्ञानवश अवस्थेत या विश्वात्म्याला आपण सामान्य मित्रासारखे वागविले याचा पश्चात्ताप होऊन अर्जुन ओशाळलेपणाने पुन्हा शरण जातच राहिला. नमस्कार या शरणभावापलिकडे सर्वव्यापी, सर्वज्ञ, आदि अंत स्वतःच असलेल्या श्रीकृष्णाची स्तुती तरी कोणत्या शब्दात करावी म्हणून तो परमेश्वराची करुणा भाकतच राहिला. | |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) विश्वरूप दर्शनाने भयचकित झालेल्या अर्जुनाचे वर्णन करा. (२) श्रीकृष्णाचे विश्वरूप महाप्रलयंकारी आहे हे श्रीकृष्णाला कोणत्या दृश्यांतून जाणवले? (३) श्रीकृष्णाने महाप्रलयाचे कोणते रहस्य अर्जुनाला सांगितले? (४) संजयाने धृतराष्ट्राला अपूर्ण मनोरथी का संबोधिले? कोणते दृश्य संजयाला विस्मयचकित करीत होते? (५) अर्जुन श्रीकृष्णाला सतत नमस्कार का करू लागला? (६) अर्जुनाला पूर्ण ज्ञान झाल्याने त्याची कोणत्या प्रकारची अवस्था झाली याचे वर्णन ज्ञानदेवांनी कसे केले आहे? (७) अर्जुनाला पश्चात्ताप का झाला? (८) अर्जुन श्रीकृष्णांना पुन्हा पुन्हा का शरण जात आहेत?

तैसा वाग्विलास विस्तारूं । गीतार्थेंसी विश्व भरूं ।। आनंदाचे आवारूं । मांडूं जगा ।। ज्ञा.अ.१३ ओ.क्र. ११५९।।

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय अकरावा : विश्वरूपदर्शनयोग** : भ. गी. श्लोकसंख्या ५५, ओवीसंख्या ७०८ (पैकी ५६१ ते ७०८) (भाग चौथा)

**बैठक क्र. ११ दि. १०/०४/२०२४ व ११/०४/२०२४**

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| ५६१ ते ६०८ | शरणागत स्तोत्र पुढे चालू – संपूर्ण विश्वाचा पिता, आद्य सद्‌गुरु वेदोपनिषदांनाही ज्ञात होणार नाही असे अपार ज्ञानस्वरूप पाहून अर्जुनाला पूर्ण ज्ञानमय झालो असे वाटत असतानाच सामान्य कुटुंबवत्सल माणसाला ते ज्ञान पेलता येणे शक्य नाही याची जाणीव होऊन एका बाजूला ज्ञान जाणिवेने अष्टसात्विक भाव दाटून आले तर दुसऱ्या बाजूला हे संपूर्ण विश्व सामावून टाकणारे केवळ व्यापक रूप सर्वनाशक वाटल्याने अर्जुन भयग्रस्त झाला. सामान्याला ते चतुर्भुज रूपच पेलणारे व आनंद देणारे आहे. त्याच्या भक्तीतच आनंद हे जाणवून अर्जुन श्रीकृष्णांना अनन्यपणे शरण जात आपण श्रीकृष्णाला सामान्य मित्र, सेवक मानून वागविले याविषयी परोपरीने क्षमायाचना करीत; आपले चतुर्भुज रूप दाखवावे, त्यासाठी आपले अपराध पोटात घालून आपल्या अपत्याचे लाड पुरवावेत अशी प्रार्थना अर्जुन करतो. महत्प्रयासाने योग इ. मार्गाने जे साध्य होत नाही ते परमेश्वराने आपणास विनासायास दाखविले याबद्दल परोपरीने कृतज्ञता व्यक्त करून पुन्हा पुन्हा चतुर्भुज रूप दाखविण्याची विनंती करतो. | पूर्ण ज्ञान झाल्याने सात्विक भाव दाटून आले. सर्व प्रयत्न करून जे साध्य होत नाही ते साध्य झाले हे जाणून शरण्यभाव प्रकटले; सामान्याला पेलणारे नाही म्हणून सगुण रूप दाखविण्याची प्रार्थना. |
| ६०९ ते ६३९ | अर्जुनाच्या सौम्यरूप दर्शन अपेक्षेने श्रीकृष्णांना आश्चर्य वाटले. जे वेदोपनिषदे, योगी, मुनीजन वा अन्य कोणालाही साध्य होत नाही, असे विश्वरूप दर्शन सहज घडूनही, त्याची भक्ती सोडून, असमर्थता व्यक्त करून सौम्य रूप दर्शनाची आकांक्षा हा गावंढळपणा किंवा करंटेपणा होय. मूळ तत्त्व दिसत असूनही सावलीला कवटाळणारा तो कमनशिबीच म्हटला पाहिजे. जो संसारप्रपंचात बुडाला त्याला तो संसारच श्रेय वाटतो तेव्हा तू त्या सौम्य, सावलीसमान रूपाचेच सुख भोग असे श्रीकृष्ण उद्वेगाने म्हणाला. | दैव देते आणि कर्म नेते असे अर्जुनाचे झाले. |
| ६४० ते ६६२ | संयमाने श्रीकृष्णाच्या अज्ञानवशतेचे, भयग्रस्ततेचे आणि प्रपंच प्रेमाचे उपरोधाने वर्णन केले आहे. जे कोणासही शक्य ते अर्जुनास प्राप्त होऊनही अर्जुन मोहवश सौम्यरूपातच श्रेय मानू लागला. | दिव्य दृष्टीने विश्वरूप पाहणाऱ्या संजयाला अर्जुनाविषयी भ्रम निरास झाला. |
| ६६३ ते ६७२ | अर्जुनाला आपण सर्वव्यापीरूपात नाहिसे झालो होतो त्यातून परत मूर्त रूपात प्रकटलो असे वाटले. विश्वरूप बुद्धिपलीकडील असून प्राण्याला वास्तव जीवनातच कर्म करावे लागते अर्थातच विश्वव्यापक तत्त्व प्रपंचातच शोधावे लागते असे अर्जुन म्हणाला. | विश्वरूप हे तत्त्व. हे जग वास्तव. ज्ञान आणि व्यवहार दोन्ही सत्यच होत |
| ६७३ ते ७०८ | श्रीकृष्णांनी विश्वरूपदर्शनाचे महत्त्व स्पष्ट केले. देव, योगी, वेद यांनाही याचे दर्शन होत नाही मात्र तुझ्यासारख्या अनन्यभक्ताला होते. तथापि माझी अनन्य भक्ती करतांना तू द्वैतच इच्छिलेस. विश्वरूपात ज्ञानात्मकतेने सामावून अद्वैत होणे हीच सर्वश्रेष्ठ गोष्ट होय. तथापि तू भक्तीने सगुणभक्तीचीच याचना केलीस. अहंकार नष्ट झाल्यावरच अद्वैत सिद्धी अर्थात विश्वरूपात समावेशन होते. मात्र भक्तीने सगुण असे द्वैतभावात्मक रूप आणि समर्पण भावाने – ज्ञानात्मक अद्वैत रूपही अनुभवता येते. अर्जुनाने ही दोन्ही रूपे ठायीच अनुभवली एवढा अर्जुन श्रेष्ठ भक्त आहे असे संजय म्हणाला. | भक्तीने सगुण निर्गुण दोन्ही प्रकारे ज्ञान प्राप्त होते. भक्तियोग सर्वश्रेष्ठ होय. |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) अर्जुनाने शरणागतीने विश्वरूपाचे स्तोत्र या गायिले? (२) अर्जुनाने सौम्यरूप दर्शनाची इच्छा का केली? (३) विश्वरूपदर्शन हे केवळ दुर्लभ आहे हे श्रीकृष्णाने परोपरीने का सांगितले? (४) भक्तिसाधनेने दोन्ही प्रकारच्या रूपांचा अनुभव अर्जुन घेऊ शकला असे संजय का म्हणतो? (५) द्वैत आणि अद्वैत यावरील श्रीकृष्णाचे भाष्य स्पष्ट करा. (६) भक्तियोग हाच सर्वश्रेष्ठ होय असे श्रीकृष्ण का म्हणतात? (७) अद्वैत होण्याची सर्वात मोठी अट कोणती सांगितली आहे?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय बारावा : भक्तियोग** : भ. गी. श्लोकसंख्या २०, ओवीसंख्या २४६

**बैठक क्र. १२ दि. १७/०४/२०२४ व १८/०४/२०२४**

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १ ते १९ | श्रीगुरु माऊली सांगरुपकात्मक गुणगौरव | |
| २० ते ३४ | सगुणोपासना करणारे कर्मशील भक्त व निर्गुणोपासना करणारे योगी भक्त यांत श्रेष्ठ भक्त कोणते ते समजून सांगण्यासाठी विनंती अर्जुन करतो. | भक्तिमार्गाची श्रेष्ठ कनिष्ठता विषयक प्रश्न |
| ३५ ते १२४ | मनोभावे सर्वस्व अर्पण करून रात्रंदिवस माझी उपासना करतात ते श्रेष्ठ भक्तियोगी होत.<br>राजयोग किंवा समाधीयोग मार्गाने कठोर योगसाधना करून जे सोऽहं भावाने सिद्ध होतात ते मद्रूप होतात तथापि मनुष्य देहाला या मार्गे जाऊन केवळ क्लेश, दुःख भोगावे लागते. निर्गुण रूपात अद्वैत साधण्यात कोणतेही सुख नरदेहाला नाही. म्हणून नरदेहाने संसारप्रपंच टाकून निर्गुणोपासना करणे हे सोऽहम् सिद्धी घडली तरी वेडेपणाचेच होय.<br>परमेश्वराच्या ठिकाणी निस्सीम व दृढ श्रद्धा ठेवून जो प्राप्त कर्म त्याच्या सत्तेने घडते आहे असे मानून कर्मफलाची अपेक्षा न ठेवता कर्म परमेश्वराला अर्पण करतो तो मद्रूपच होतो.<br>परमेश्वरावर निष्ठा ठेवून निरासक्तपणे जो सतत कर्म करतो व ते कर्म आपण करतो असे न मानता परमेश्वराची सत्ता मानून कर्म घडत आहे असे मानतो तो नित्य माझे स्मरण करून कर्मामध्ये रममाण होतो. त्याचा योगक्षेम परमेश्वरच चालवतो. जो भक्त परमेश्वरावर विसंबतो त्याला त्याच्या प्रपंचाची काळजी करण्याचे कारण नसते.<br>ज्याला संसारसुख सोडवत नाही त्याने संसारातील सर्व भोगकारक कर्मे करीत असतांना कुळधर्मकुळाचार पाद्यपूजा इ. नवविधा भक्ती उपचार म्हणून करीत असतांना किंचित जरी माझे स्मरण केले तरी मी भक्ताला भवसागर पार करवितो. म्हणून माझ्याशी एकरूप होण्याच्या चिंतनाचा अभ्यास करावा. अभ्यासाने अशक्यही शक्य होते. अर्जुनाने निदान विचारपूर्वक असा मार्ग अनुसरावा. | निर्गुण भक्ती क्लेशदायक<br><br>सगुण भक्ती अभ्यासाने साध्य |
| १२५ ते १४३ | कर्माच्या आदि, मध्य किंवा अंती माझी भक्ती किंवा स्मरण करावे. कर्मफळाची आशा न ठेवता फल मलाच अर्पण करावे. कर्मफल त्यागरूपी योग सर्वश्रेष्ठ योग होय. भक्ती, ज्ञान, कर्मफल त्याग यातूनच शांतीचा लाभ होतो. हाच मार्ग सांसारिकांना अभ्यासातून सहज अनुसरता येतो. | त्यागाने शांती मिळते. |
| १४४ ते १६४ | कर्मफल त्यागपूर्वक भक्त योगी होतो. त्याच्या ठायी समबुद्धी प्रकटते. तो निःस्वार्थ (निरासक्त) होतो. असा भक्त, योगी व मुक्त असतो तो परमेश्वराचा लाडका होतो. त्याच्या प्रेमाला प्रिया आणि प्रियु यांची सुद्धा उपमा कमी पडते. | |
| १६५ ते २४६ | लोकात सर्वप्रियतेने राहातो तो भक्त प्रिय होय. अनन्य भक्त देवाला प्रिय आहे. जो निस्सीम व अनन्य भक्ती ठेवून धर्म, अर्थ, काम या पुरुषार्थाचे फल त्याग करतो. निरहंकारी होतो तो मद्रूप होतो म्हणजे मोक्ष पुरुषार्थ साधतो म्हणून असा भक्त योगी व मुक्त होतो. तो समदृष्टीने सर्वांठायी प्रेमानंदाने, निरासक्तीने व्यवहार करतो. मुक्त असूनही म्हणजे मोक्ष (ज्ञानमय अवस्था) पुरुषार्थ साधूनही, म्हणजे अद्वैत अनुभवूनही. भक्तीसुख अनुभवण्यासाठी देव व भक्त असे द्वैत मानून भक्तिउपासनेतच रममाण होतो. तो सर्व तीर्थक्षेत्रांपेक्षा पवित्र होतो. असा भक्त देव डोक्यावर धारण करतो. देवच भक्ताची पूजा करतो. जसे शिव विष्णूंची व विष्णू शिवांची पूजा करतात. म्हणूनच अशा श्रद्धायुक्त मत्परायण भक्ताला प्रपंचातही अद्वैतसुखाचा अनुभव घेता येतो. देव त्याच्यासाठी अवतारही घेतो. असा देव कृपावत्सल व भक्तिप्रिय आहे असे संजय धृतराष्ट्राला सांगतात. | |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) श्री गुरुमाऊली आईप्रमाणे सांभाळ करते हे सांगरूपकातून कसे सांगितले आहे? भक्तीचे कोणते तीन मार्ग सांगितले आहेत? (ध्यानयोग मार्ग, निष्काम कर्मयोग युक्त भक्ती, संसारासक्तीतही? सर्वथा श्रद्धायुक्त व परमेश्वर परायण राहून कर्मफलत्याग पूर्वक आदि अंती परमेश्वराची पूजा) (३) अर्जुनाला (सामान्य माणसाला) कोणता मार्ग अनुसरावा असे सुचविले आहे? (४) भक्त तोच योगी व तोच मुक्त असे कोणत्या प्रकारच्या भक्ताला म्हटले आहे? (५) अशी समदृष्टिभक्ताची लक्षणे ज्ञानेश्वरांनी कोणत्या दृष्टांतातून वर्णिली आहेत? (६) कोणत्या भक्ताला आपण शिरीचा मुकुट करतो असे श्रीकृष्ण म्हणतात? (७) कर्मफलत्यागी अनन्य व समबुद्धी प्राप्त झालेल्या भक्ताच्या व देवाच्या प्रेमसंबंधाला कोणती उपमा देण्याचा प्रयत्न केला आहे?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय तेरावा : प्रकृतिपुरुष विवेक योग** : भ. गी. श्लोकसंख्या ३४, ओवीसंख्या ११६९ (पैकी १ ते १९५) (भाग पहिला)
(क्षेत्र क्षेत्रज्ञ विभाग योग – असेही नाम)

**बैठक क्र. १३ दि. २४/०४/२०२४ व २५/०४/२०२४**

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १ ते ६ | मंगलाचरण व अध्याय प्रस्ताव – श्रीगुरु वंदना | |
| ७ ते २६ | शरीर म्हणजे क्षेत्र. शरीर स्थिती जाणणारा तो क्षेत्रज्ञ म्हणजे आत्मतत्त्व/ज्ञानी. ज्ञान म्हणजे क्षेत्र व क्षेत्रज्ञाविषयी जाण. क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या रूपआकलनासाठी सर्वप्रकारचे वाद विविध प्रकारच्या शास्त्रज्ञांनी/ऋषींनी मांडले. या तर्कांचा वितंडही आणला. याचे यथार्थज्ञान होण्यासाठी प्रत्यक्ष शिव व ब्रह्म देखील थकून गेले. सगुणरूपातील हे तर्कवादी मृत्यूभयाने ग्रासले. योगी संन्यासी झाले. म्हणून स्वतः ज्ञानच थेटपणे विष्णू क्षेत्र, क्षेत्रज्ञ अर्जुनाला बजावून सांगतात. | |
| २७ ते ७१ | (१) जीववादी, (चार–प्राण (कुळ) – अपान, व्यान, उदान, समान) प्राण मनायोगे काम करतात. जीव हे स्वयंभू क्षेत्र–क्षेत्रज्ञ. (२) प्रकृतिवादी– जीव तात्कालिक आहे. अनादी प्रकृति ही क्षेत्रज्ञ – प्राण हे वहिवाटदार आहे. प्राण हे प्रकृतीत स्वयंभू आहेत. (तीन गुण– सत्व, रज, तम)<br>(३) संकल्पवादी– विष्णू निद्रेत असतांना त्याला जागृती आली आणि त्रिभुवन याच्या इच्छेने निर्माण– इशावास्योपनिषद. एकोऽहं बहुस्याम असा संकल्प. सर्व सृष्टि निर्माण झाली. त्यात जन्म–मृत्यू फेरा सुरू. (४) स्वभाववादी– देह क्षेत्र स्वभावसिद्ध आहे. (५) काळवादी– काळ विश्वरूपदर्शन – हेच सिद्ध. हा सगळाच वितंड. | ४. वायू<br>३. गुण |
| ७२ ते १८३<br>१८४ ते १९५ | आकाश, वायू, तेज, पाणी, पृथ्वी (५), अहंकार/बुद्धी, पुरुष, प्रकृति, मन, विकार (५), कान, डोळे, जिव्हा, नाक व त्वचा ज्ञानेंद्रिये (५), हात, पाय, मुख, गुद, उपस्थ पंचकर्मेंद्रिये (५), शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध (५) = २५ मूलतत्त्वे, चेतना, धृती, सुख, दुःख, द्वेष संघात, इच्छा (७) (३२), (४ युग + सप्तर्षि)<br>प्रकृती ही अव्यक्त – परा–अपरा (जीवदशा) – मन त्याचा देहधारणेतील बुद्धी व अहंकार यांच्या योगे चंचल आविष्कार असे मानले जाते. तथापि मनाच्या योगाने ब्रह्म (आत्मा) जीवदशेत येतो. विकारांनी सुख, दुःख कल्पना प्रकटतात. यांपलिकडे आत्मसुख – चेतना तटस्थ असते. हाच पुरुष–आत्मन् अंश होय. वरील ३६ तत्त्वांचा संघात म्हणजे समुच्चय म्हणजे क्षेत्र होय. या क्षेत्रात पाप, पुण्य रूपात कर्माचे पिक येते. प्रकृति हेच क्षेत्र. गुणांच्या योगाने भेद दिसतो. (सत्व, रज, तम)<br>ज्ञान म्हणजे वर्णन न करता येण्यासारखे रूप – परमात्मा – देहाच्या ठिकाणी – ज्ञान म्हणजे आत्मरूप होय. | |
| | ज्ञानी पुरुषाची लक्षणे निरीच्छता, अदांभिकता, अहिंसा, शांती, आर्जव, गुरुसेवा, शुद्धता, मनाची स्थिरता आणि आत्मसंयम. | |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ या विषयी कोणते वाद निर्माण झाले? (२) वादांचा वितंड का झाला? (३) क्षेत्र म्हणजे काय? क्षेत्राची ३६ तत्त्वे कोणती? (४) सांख्य योगाने केलेल्या वर्णनातील तत्त्व विवेचनाचा आधार का घेतला आहे? (५) मनाचे वर्णन करा. (६) विकार का निर्माण होतात? (७) ज्ञान म्हणजे काय? स्पष्ट करा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय तेरावा : प्रकृतिपुरुष विवेक योग** : भ. गी. श्लोकसंख्या ३४, ओवीसंख्या ११६९ (पैकी १९६ ते ४०९) (भाग दुसरा)
(क्षेत्र क्षेत्रज्ञ विभाग योग – असेही नाम)

**बैठक क्र. १३ दि. ०१/०५/२०२४ व ०२/०५/२०२४**

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १९६ ते ३३८ | (१८४ ओवीपासून) निरिच्छता (मोठेपणाची इच्छा नसणे) अदांभिकत्व, अहिंसा, शांती, सरळपणा, गुरुसेवा, शारीर व मानसिक शुद्धता, मनोस्थैर्य आणि आत्मसंयम ही ज्ञानी माणसाची लक्षणे होत. त्याला लौकिकातही एकांत किंवा अनोळखपण आवडते. तो ज्ञानातच गुंग असतो. (अमानित्व २००) स्वधर्म पालन करतो, उदारता असते, चातुर्याने आत्मचर्चा करतो परंतु त्याचे प्रदर्शन करीत नाही (अदांभिकत्व २१५) न दुखावता विरुद्ध मत खोडतो. अहिंसेने हिंसा करतो. हितकारक हिंसेने अहिंसा साधली जाते म्हणून सद्हेतुने केलेली हिंसा हीच कर्मकांडात अहिंसा ठरते. अहिंसा अंगी बाणली तर ज्ञानात्मक वर्तन घडते. त्याविषयी चर्चा – ज्ञान + मन = अहिंसा (हे सूत्र) सत्य आणि मवाळ, मित व रसाळ, जणू अमृत कल्लोळ (असे गोड बोलणे). सत्य पण गोडव्याने, सर्वाभूती वस्तु (आत्मा) आहे जाणून वागतो. असे सज्जनाचे शील स्वाभाविकच असते. सर्वेंद्रियांनी अहिंसाच प्रकटते. मन, देह आणि वाचा सर्व मार्गांनी अहिंसाच प्रकटते (३२१) म्हणजेच ज्ञानमय अवस्था – मूर्तिमंत अहिंसा. असे सर्व विद्यांच्या आधारे ज्ञानेश्वर अहिंसेचे, मतांतरे सांडून भाष्य करतात. सर्व संतांना (श्रोत्यांना) सहज कळावे या प्रकारे भाष्य करतात. जास्त विवरणाकरिता ज्ञानेश्वर श्रोत्यांची क्षमा मागतात. (३३४ – श्रोतृसंवाद) | |
| ३३८ ते ४०९ | क्षमेच्या ठिकाणी ज्ञानात्मकता असतेच. क्षमेची लक्षणे समुद्राप्रमाणे कोणतेही प्रवाह सामावून घेतो. जवळचे, लांबचे, वाईट, चांगले, सुष्ट, दुष्ट, निंदा, प्रशंसक अशा कोणत्याही द्वंद्वाचा विचार न करता सर्वांकडे क्षमाशीलतेने पाहातो. कोणतीही तक्रार करीत नाही. हाच ज्ञानाचा मोठेपणा असतो.<br>अर्जव या गुणाचे स्वरूप सांगतात– सेवा करणे, शिष्य एकाग्र अवधान ज्ञानाकडेच देतो. सर्वस्व अर्पण करून तो गुरुभक्तिमय होतो. गुरुआज्ञेशी तो बांधलेला असतो. गुरुभक्तीनेच जगतो. अशा गुरुभक्तीमुळे ध्यानातूनच ज्ञान प्रकटते. ज्ञानसागर उसळतो. सर्वथा गुरू असलेल्या गुरुंना आपली आई मानून जवळीक करतो. गुरुभक्तीचे व्याख्यान पुढे चालू. | |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) अमानित्व म्हणजे काय? (२) श्री ज्ञानेश्वरांनी ते कोणत्या दृष्टांतांनी स्पष्ट केले आहे? (३) विविध प्रमाणांनी अदांभिकत्व कसे स्पष्ट केले आहे? (४) अहिंसेचे स्वरूप सांगतांना ज्ञानेश्वरांच्या विग्विलासाला हळूवारपण कसे आले आहे स्पष्ट करा. (५) अहिंसेच्या संदर्भाने झालेला श्रोतृसंवाद श्री ज्ञानेश्वरांची नम्रता कोणत्या प्रकारे प्रकटवितो? (६) क्षमावंताची लक्षणे सांगा. (७) आर्जव म्हणजे काय ते व्यक्तिमत्त्वातून कसे प्रगट होते? (८) गुरुभक्तीविषयी विवेचन करा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय तेरावा : प्रकृतिपुरुष विवेक योग** : भ. गी. श्लोकसंख्या ३४, ओवीसंख्या ११६९ (पैकी ४०१ ते ६०२) (भाग तिसरा)
(क्षेत्र क्षेत्रज्ञ विभाग योग – असेही नाम)

**बैठक क्र. १३ दि. ०८/०५/२०२४ व ०९/०५.२०२४**

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| ४१० ते ४४० | आपले काया, वाचा मन सर्वस्व श्रीगुरुंना समर्पण करून त्यांच्या दिनचर्येचे व व्यवहाराचे आपण साधन व्हावे. देहाची पर्वा न करता पंचप्राणाने गुरुसेवा करावी असे समर्पित भक्त म्हणतो. | गुरुजीवनाचे साधन आपण व्हावे |
| ४४१ ते ४५४ | गुरुसाठी झिजतो त्याचे कुळ व परिवार आपलाच मानून सेवा करतो. गुरु संप्रदाय, वर्णाश्रम हे गुरुसेवेचे व्यसन अंगी बाणतो तेच आपले वर्णाश्रमधर्म मानतो. उत्क्रांत मतीसाठी गुरुभक्ती हे कारण ठरते म्हणून तो सर्व गोष्टी श्रीगुरुमध्येच अनुभवण्याचा प्रयत्न करतो. अशा गुरुसमर्पित भक्तासाठी ज्ञानाची कवाडे उघडी होतात. तो भक्त ज्ञानस्वरूपच होतो. | |
| ४५५ ते ४५९ | गुरुसेवेच्या अभिलाषेने ज्ञानदेवांनी एव्हढे गुरुभक्तीविषयी भाष्य केले व क्षमा मागून, समजून घेण्याची विनंती केली. | श्रोतृसंवाद |
| ४६० ते ५११ | शुचित्वाचे लक्षण पुढीलप्रमाणे– ज्ञानात, तेच मनात, तेच कर्मात असा पूर्ण प्रांजळ, तो खरा सोवळा. विकल्प येत नाहीत तेथे ज्ञान प्रकटते. स्थिरबुद्धी होतो. ही स्थिरबुद्धी हेच ज्ञानाचे निधान होय. मन चळू नये म्हणून तो सावधान असतो. योगसाधनेप्रमाणे त्याची अशी अवस्था होते. स्थिरबुद्धीलाच अंतःकरणाचा निग्रह म्हणतात. तो मनुष्य ज्ञानाचा पुतळा असतो. | शुचित्वाने स्थिरबुद्धी स्थिरबुद्धीने ज्ञानी अवस्था |
| ५१२ ते ६०२ | इंद्रियांविषयी वैराग्य हीच आत्मलाभासाठी योग अवस्था होय. त्यामुळे जीव (शरीर) ब्रह्मानंद भोगण्यास योग्य होतो. विजनवासात तपःश्चर्येला जाण्याची गरज नसते. कारण त्याची वृत्ती उदासीन झालेली असते. निरहंकारीपणे कर्म करतो. जणू त्याच्यामुखे वेदच बोलतात. निरहंकाराजवळच ज्ञानाची वस्ती असते. त्याच्या दृष्टीने देह हा निखळ अहंकाराचे दमन करण्यासाठी वापरावा अन्यथा देह हा क्रमाक्रमाने नष्ट होणारी, त्याज्य गोष्ट आहे. जोवर शरीर आहे तोवर ज्ञानसाधना करावी. भक्ती करावी अन्यथा शरीर काम करेनासे झाले तर सर्वच त्याच्या मरणाची वाट पाहतात. म्हणून वेळीच आत्मज्ञानाचा मार्ग चोखाळावा. अशा वृत्तीने जगतो तो गोसावी. स्थितप्रज्ञ, ज्ञानी, संन्यासी, सिद्ध इ.<br>दारा गृह पुत्री याविषयी प्रपंचाविषयी निरासक्त अर्थात उदास असतो तो ज्ञानी समजावा. सुखदुःखाच्या ठिकाणी समबुद्धी राहतो तो ज्ञानी. | उदास निरासक्त तो ज्ञानी वेळीच सावध असतो तोच ज्ञानी होतो. |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) गुरुंसाठी समर्पणभाव कोणत्या प्रकारे वर्णन केला आहे? (२) गुरू कोणत्या प्रकारच्या भक्तासाठी ज्ञानाची कवाडे उघडतो. (३) गुरुभक्तीविषयी श्री ज्ञानेश्वर विस्ताराने बोलण्यात का रंगून जातात? श्रोतृसंवादातून स्पष्ट करा. (४) शुचित्व, स्थिरबुद्धी आणि ज्ञान यांचा संबंध श्री ज्ञानेश्वरांनी कसा स्पष्ट केला आहे? (५) इंद्रिय दमनाचे किंवा इंद्रिय वैराग्याचे महत्त्व स्पष्ट करा. (६) वेळीच ज्ञान साधनेसाठी सिद्ध व्हावे असे श्री ज्ञानेश्वर का म्हणतात? उदासीनता, निरासक्ती आणि सावधपणा यांचे ज्ञानसाधनेतील महत्त्व श्री ज्ञानेश्वरांनी कोणत्या प्रकारे विशद केले आहे?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय तेरावा : प्रकृतिपुरुष विवेक योग** : भ. गी. श्लोकसंख्या ३४, ओवीसंख्या ११६९ (पैकी ६०३ ते ८०६) (भाग चौथा

(क्षेत्र क्षेत्रज्ञ विभाग योग – असेही नाम)

**बैठक क्र. १३ दि. १५/०५/२०२४ व १६/०५/२०२४**

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| ६०३ ते ६१४ | परमेश्वर (कृष्ण) अनन्य भक्त – समर्पित व्यक्ती ज्ञानाचा पुतळा होतो. (ज्ञानमय होतो. अद्वैत सिद्धी घडते) | |
| ६१५ ते ६३५ | ज्ञान म्हणजे परमात्मा, त्या व्यतिरिक्त स्वर्गादिविषयीही अज्ञानच होत अशा अवस्थेस पोचलेला भक्त केवळ ज्ञानरूपच होणे तो ज्ञानाच्या रूपाने – मर्यादेतच प्रकट होतो. असे श्री ज्ञानेश्वर श्रोत्यांना परोपरीने सांगतात. | ज्ञानऐक्य पावलेला भक्त अन्य सर्व गोष्टी अज्ञान मानतो. |
| ६३६ ते ६४९ | ज्ञान, ज्ञानी आणि ज्ञानलक्षणे अर्थात आत्मरूपाचे यथोचित रसाळ वर्णन ऐकून श्रोत्यांनी कृतज्ञतापूर्वक पुढील विषय सांगण्याची विनंती केली. तेव्हा १८ ज्ञानलक्षणे सांगण्यास सुरुवात केली. | श्रोतृसंवाद |
| ६५० ते ७१० | ज्ञान हे निर्गुण, निराकार स्वसंवेद्य ते जाणवते पण वर्णन करता येत नाही म्हणून अज्ञानाची लक्षणे सांगितली की ज्ञान होते. (१) गर्व (सन्मानासाठी झपाटलेला) (२) स्वधर्माचे प्रदर्शन मांडतो. (३) स्वतः विद्वान म्हणून मिरवतो. (४) जगाला आचरणाने दुःख देतो. (५) जीवनात सुख, दुःख सापेक्षतेने मानतो. (६) स्तुतीने चढून जातो. (७) निंदेने दुःख करतो. (८) वरवर गोड आतून कडू (मतलबी). (९) गुरुभक्तीला लाजतो आणि ज्ञान मिळाल्यावर गुरुवर उलटतो. (१०) आळशी संशयी (११) स्वार्थी (१२) स्त्रीलंपट (१३) कर्मधर्म मानत नाही. (१४) भित्रा (१५) मनोरथांतच गुंग (१६) अस्थिर (१७) असंयमी (१८) विषयासक्त | करतलावरील आवळा दिसतो नि नाहिसा होतो तसं ज्ञान जाणवतं पण वर्णन करता येत नाही. |
| ७११ ते ७२६ | देहाहंकाराने आत्मरूप विसरून देहालाच सर्वस्व मानून सुखदुःखे भोग भोगतो. सतत गर्व, ताण यांनी वागतो, तरी अतृप्त राहतो त्याच्याजवळ वाढते अज्ञान राहते. | |
| ७२७ ते ८०६ | देह हेच खरे रूप मानून राजस व तामस गुणांचा परिपोष करण्यातच त्याचा देह मनासह रममाण होतो. पूर्वजन्म, जन्ममृत्यू फेरा, मृत्यू याविषयी तो विचारच करत नाही. देहाचे बाल्य, तारुण्य, वार्धक्य आणि मृत्यू या अवस्थाच तो मानत नाही. गर्व, ताण, स्वकेंद्रित सुख कल्पना यातच तो गुंग होतो. स्वतःलाच सर्वश्रेष्ठ, सर्वज्ञानी, सर्वोत्तम मानतो व अहंकारमयतेने, आसक्ती, वासनामयतेने तो केवळ प्रत्यक्षच स्वतःच्या लहरीप्रमाणे व स्वार्थाने जगतो. पापपुण्य या गोष्टी, देवधर्म या गोष्टींना तो पाखंड मानतो. क्षणाक्षणाने मृत्यू जवळ येतो यावर त्याचा विश्वास नसतो. एवढेच नव्हे तर देह सर्वशक्तीमान, अमर आहे असे मानतो व धन, दारा आणि घरेदारे अशा स्थावर जंगमातच तो रमतो. स्त्रीलंपट होऊन भोगाचाच दासानुदास होतो. तेथे अज्ञानाचे घर मानावे. | |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) ज्ञानाचा पुतळा कोण होऊ शकते? (२) ज्ञानाचे स्पष्टीकरण करण्यासाठी अज्ञानाची लक्षणे का सांगावी लागतात? (३) क्षेत्र क्षेत्रज्ञ, प्रकृतिपुरुष या कल्पना स्पष्ट करून ज्ञान माणसाकडून कोणत्या प्रकारच्या वर्तनाची अपेक्षा केली आहे? (४) अज्ञानाची १८ लक्षणे कोणती? (५) देहवासनांच्या आहारी गेलेल्या माणसाचे ज्ञानेश्वरांनी दिलेल्या दृष्टांताआधारे वर्णन करा. (६) अज्ञानी माणसाचे स्वरूप स्पष्ट करा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय तेरावा : प्रकृतिपुरुष विवेक योग** : भ. गी. श्लोकसंख्या ३४, ओवीसंख्या ११६९ (पैकी ८०७ ते ९९५) (भाग पाचवा)
(क्षेत्र क्षेत्रज्ञ विभाग योग – असेही नाम)

**बैठक क्र. १३ दि. २२/०५/२०२४ व २३/०५/२०२४**

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| ८०७ ते ८२४ | अनेकेश्वरी भक्तीत गुंततो आणि अनन्य नित्य आत्मरूपाला विसरतो. विविध दैवतांची फलसापेक्ष पूजाव्रते करतो तो मूर्तिमंत अज्ञानी होय. तीर्थयात्रा करू शकतो इ. | अनन्यता नाही. |
| ८२४ ते ८४५ | आत्म्याचे प्रत्यक्ष दर्शन लाभेल हे ऐकून जो भजनी लागतो परंतु अध्यात्मविद्येत रमत नाही. एकाग्र न होता अनेक शास्त्रांच्या मागे लागतो. चर्चा व वितंड करीत बसतो. अध्यात्माशिवाय नित्य सत्य नाही हे कळत नाही अशा ठिकाणी अज्ञान वेलीची बी रुजली असे समजावे | केवळ शास्त्र वितंड |
| ८४६ ते ८५२ | जेथे ज्ञान असते तेथेच अज्ञानाचे लक्षण असते. १८ अज्ञान लक्षणे. | मागील ज्ञान<br>अज्ञान लक्षणे |
| ८५२ ते ८६३ | श्रोतृ, गुरु, ज्ञानेश्वर संवाद – अज्ञानाची लक्षणे खूप झाली. ज्ञान कथन व्हावे. | श्रोतृसंवाद |
| ८६४ ते ८७२ | ज्ञान वस्तू म्हणजे परब्रह्म हे होय. परब्रह्माची जाणीव होणे म्हणजे ज्ञात्याला ज्ञान होणे. त्यासाठी प्रकृतीच्या विळख्यात सुटावे लागते. प्रपंच दूर सारावा लागतो तेव्हा ज्ञानाची जाणीव होते. | ज्ञानवस्तु – ज्ञेय<br>ज्ञेयाची जाणीव–ज्ञान<br>ज्याला ज्ञान होते–ज्ञाता |
| ८७३ ते ८९० | ज्ञात्याची, ज्ञेय जाणल्याने (ज्ञेयाचे ठायीच ज्ञान झाल्याने) परमेश्वरस्वरूपाचा अर्थात विश्वव्यापकत्वाचा अनुभव ही अनुभूती सद्‌गुरु आणि सत्‌शिष्य यांच्या अद्वैतात घडते. मात्र हे अद्वैत द्वैत होऊन पाहावे लागते. या अवस्थेचे वर्णन विश्वरूप दर्शनातील विश्वपुरुषाप्रमाणे केले आहे. विश्वांध्रि, विश्वचक्षू, विश्वमूर्धा, विश्वतोमुख अशी नावे अवयवांनुसार दिली आहे. | अद्वैताने विश्वरूप अवस्था |
| ८९१ ते ९३८ | अद्वैत स्थिती ही जीवात्म्याच्या ठिकाणी आत्मरूपा सामरस्याने प्राप्त होते. आत्मरूपात तो आत्मरूप होऊन वर्तन करतो मात्र हे अद्वैत जीवात्म्या ठायी जाणवते हे परोपरीने उदा. आकाशात–आकाश इ. दृष्टांतातून स्पष्ट केले आहे. तेच विविध रूपात जाणवते. पुरुष अर्थात आत्मतत्त्व नित्य असते. तेच चक्रनेमीक्रमात विविध अवस्था भोगते. तरी स्थिर असते. त्या नित्य वस्तूला महाशून्य म्हटले आहे. त्या नित्य परमात्मारूपामुळेच सर्व चलन होत असते. उदा. कानातले कान! | सर्व क्रियांचे कारण तेच चैतन्य तत्त्व – आत्मरूप असते. |
| ९३९ ते ९५६ | क्षेत्र, ज्ञान, ज्ञेय, अज्ञान हे एकच आत्मरूपाचे स्वरूप आहे. त्याचे चार भाग केले (ओवी ५१) हे सर्व ज्ञाता जीवात्मा यालाच अनुभूत होते. जीवात्मा हाच क्षेत्रज्ञ. | |
| ९५७ ते ९९५ | कपिल मुनींच्या भूमिकेत प्रकृतीपुरुष विवेक कथन. अनादिसिद्ध अशा परमात्म्यातून–प्रकृतिपुरुष प्रकटतो. प्रकृति हे क्षेत्र. पुरुष हा क्षेत्रज्ञ. प्रकृतीमुळे–कर्मनिष्पत्ती, प्रकृतीचेच संस्कृति, शास्त्र आदि विलास होत. पुरुष केवळ भोक्ता तटस्थ. | सांख्य योगातील प्रकृतीचे कार्य चलन |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) माणूस आत्मरूपाला कसा विसरतो? (२) शास्त्रीय ज्ञानाने आत्मदर्शन का घडत नाही? (३) अज्ञानाच्या स्वरूप दर्शनाने ज्ञान बोध कसा होतो? (४) नित्य वस्तुचा अनुभव कोणत्या प्रकारे घडतो? (५) अद्वैतानुभूती द्वैतानुभूतीनेच भोगावी लागते असे ज्ञानेश्वर का म्हणतात? (६) क्षेत्र, ज्ञान, ज्ञेय, अज्ञान हे सारे एकच आत्मरूपाचे भाग आहेत असे श्रीकृष्ण का म्हणतात? (७) श्रीकृष्णांनी कपिलमुनींची भूमिका का स्वीकारली आहे? (८) पुरुष केवळ नपुंसक आहे असे श्रीकृष्ण का म्हणतात?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय तेरावा : प्रकृतिपुरुष विवेक योग** : भ. गी. श्लोकसंख्या ३४, ओवीसंख्या ११६९ (पैकी ९९६ ते ११६९) (भाग सहावा)
(क्षेत्र क्षेत्रज्ञ विभाग योग – असेही नाम)

**बैठक क्र. १३ दि. २९/०५/२०२४ व ३०/०५/२०२४**

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| ९९६ ते १०२० | अद्वयापासून म्हणजे निर्गुण इ. प्रकारचा परमात्मा पुरुष रूपात प्रकटतानाच त्याच्यातून महाशक्ती प्रकृतिरूपाने प्रकटते. ही प्रकृति त्या पुरुषाची दुसरी जोडीदारीण होते (परमात्म्याची पहिली जोडीदारीण निर्विकारता होय.) अर्थातच सविकारता होते. तिच्या आधीन होऊन ती सर्व संसार भोग स्वतःच्या कर्मांबरोबर पुरुषाला भोगावयास भाग पाडते. म्हणजे परमात्मा पुरुष झाल्यामुळे विकारी वाटतो मात्र प्रत्यक्ष परमात्म्याच्या ठिकाणी विकार घडत नाही कारण त्याची आत्मशक्ती त्याच्या ठायीच असते. द्वैत होताना ती आत्मस्वसंवेदना (स्वसंवेदना) म्हणून तेथेच राहाते तरी प्रकृति म्हणून विलगही होते. त्यामुळे पुरुष तटस्थ, निस्तेज व आधीन भासमान होतो. | प्रकृति पुरुष संसार प्रकृतिमुळे पुरुष भोग भोगतो. मुळात परमात्मा निर्विकारच आहे. |
| १०२१ ते १०२८ | पर्वताचे प्रतिबिंब प्रवाहात पडले की ते प्रवाहाबरोबर वाहते असे वाटते. तथापि पर्वत अचल असतो. तसा पुरुषरुपातील परमात्मा प्रकृतिबरोबर वाहात जात नाही उलट प्रकृति पुरुषामध्ये कल्पांतासमयी परमात्मस्वरूप होते. | प्रकृतिचे विस्तार विभ्रम हे भ्रामक होत. |
| १०२९ ते १०३५ | हा पुरुष–प्रकृति योग ज्याला जाणवतो तो निष्काम कर्मयोगी होतो. त्याचा अहंकार नाहीसा होतो. संन्यासी, ज्ञानी होतो. | |
| १०३६ ते १०३९ | असा सांख्य योग ज्याला कळला तो स्वतःच्या ठायी परब्रह्म जाणतो. | |
| १०४० ते १०४९ | ज्याला कळत नाही त्याने गुरुकडून उमजून घ्यावे म्हणजे त्यालाही परब्रह्म ज्ञान होईल असे सिद्धांतनवनित श्रीकृष्ण अर्जुनास देतात असे ज्ञानेश्वर म्हणतात. | |
| १०५० ते १०५५ | क्षेत्रज्ञापासून क्षेत्राच्या ठिकाणी पंचमहाभूतात्मक सृष्टि होते परंतु ती प्रकृतिच्या ठिकाणी (क्षेत्राच्या ठिकाणी) क्षेत्रज्ञाच्या ठिकाणी नव्हे. | सिद्ध स्थिती तुर्यावस्था |
| १०५६ ते १०८२ | प्रकृतितील सृष्टिच्या ठिकाणी विविध रूपाने सृष्टि भासते. त्यात सर्वत्र पुरुष तत्त्व रूपाने असतोच. अशी समदृष्टी योग्यांना प्राप्त होते म्हणजे ज्ञान होते. ते तुर्यावस्थेस पोचतात. त्याला जन्ममृत्यूची जाणीव राहात नाही. सिद्ध होतो. | सिद्ध स्थिती तुर्यावस्था |
| १०८३ ते ११०० | समदृष्टी झाला त्याला ब्रह्मस्वरूप प्राप्त होते हे प्रकृतिपुरुष विवेकाने जाणवते. ब्रह्म सर्वत्र, सर्वाठायी असल्याचे जाणवते तरी ते स्थिर व नित्य हे ज्ञान त्याला होते. | आत्मतत्त्वाची वैशिष्ट्ये तथा स्वरूप |
| ११०१ ते १११८ | आत्म्याचे नित्यत्व स्पष्ट केले. तो सर्वत्र आहे असे अनुभूत होते तरी तो विरक्त व नित्य असतो. प्रकृतिच्या रूपामुळे भासणारे भिन्नत्व त्यास नसते. निर्गुण निराकार असा तो नित्य आहे | आत्मतत्त्वाची वैशिष्ट्ये तथा स्वरूप |
| १११९ ते ११२१ | क्षेत्रज्ञ– (आत्मा) क्षेत्रविहीन असतो. तो लिप्त होत नाही. क्षेत्रज्ञ सर्व क्षेत्राला सचेत करतो तरी तो अलिप्तच असतो. | आत्मतत्त्वाची वैशिष्ट्ये तथा स्वरूप |
| ११२२ ते ११४२ | ज्ञानी माणसाला या आत्मतत्त्वाची नित्यता सार्वत्रिकता व अलिप्तता जाणवते कारण, कार्य, कर्ता सारे तोच असतो तरी तो नित्य मुक्त असतो. | आत्मतत्त्वाची वैशिष्ट्ये तथा स्वरूप |
| ११४२ ते ११६९ | श्रोतृसंवादात आपण नाविन्यपूर्ण वेल्हाळ विवेचन करून शांतीकथा अर्थात भगवद्गीतेत सच्चिदानंदरुपाचा पंचेंद्रियांना सारखाच अनुभव घडवू व गीतार्थाने विश्व भरून जगाला आनंदाचे प्रांगण करू. असे जाणकार संतस्वरूप श्रोते आणि सद्गुरु कृपेने घडवू असे ज्ञानेश्वर म्हणतात. | श्रोतृसंवाद |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) प्रकृति आणि पुरुष यांचा संबंध श्री ज्ञानेश्वरांनी कसा स्पष्ट केला आहे? (२) सांख्य योग ज्याला कळला तो ठायीच परब्रह्म स्वरूप झाला असे श्री ज्ञानेश्वर का म्हणतात? (३) समदृष्टीने जगाचा अनुभव कोणत्या प्रकारे घेता येतो? (४) सिद्धावस्था केव्हा प्राप्त होईल? (५) आत्मतत्त्वाचे स्वरूप कोणत्या दृष्टांतांनी श्री ज्ञानेश्वरांनी स्पष्ट केले आहे? (६) श्रोतृसंवादात आत्मविश्वासाने श्री ज्ञानेश्वर कोणती प्रतिज्ञा करतात? (७) कश्मिरी विद्येने कोणती अवस्था प्राप्त होते?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय चौदावा : गुणातीतयोग / गुणत्रय विभाग योग** : भ. गी. श्लोकसंख्या २७, ओवीसंख्या ४१५ (पैकी १ ते २०३)
(भाग पहिला)

**बैठक क्र. १४ दि. ०५/०६/२०२४ व ०६/०६/२०२४**

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १ ते २४ | श्रीगुरु माहात्म्य वर्णन. श्रीगुरु केवळ ज्ञानाचा पुतळा. | श्रोतृ, गुरु शिष्य संवाद |
| २५ ते ३१ | श्रीगुरु व श्री ज्ञानेश्वर संवाद – गुरुआज्ञा हाच गुरुप्रसाद. | श्रोतृ, गुरु शिष्य संवाद |
| ३२ ते ४० | क्षेत्र क्षेत्रज्ञ योगात प्रकृतिपुरुष योगाने जो जीवात्मा निर्माण होतो त्याचा त्रिगुणात्मक अवस्थेने व्यवहार कसा होतो व गुणातीत होऊन ज्ञानमय अवस्था अर्थात आनंद अवस्था कशी प्राप्त करता येते या ज्ञान संवादाचा प्रस्ताव | श्रोतृ, गुरु शिष्य संवाद |
| ४१ ते ५१ | आत्मांश हा ठायीच असलले उत्तम असे ज्ञान असतो. तो मनाच्या योगाने देहवासनेत अडकतो आणि ज्ञानाला पारखा होतो. स्वर्गादिभोगात रमतो. खरा मुक्त आनंद देहातीत मनोवृत्तीत मिळतो. मनाने देहातीत होऊन आत्मरूप संयोग झाला की ठायीच उत्तम ज्ञानाचा ठेवा सापडतो | देहातील आत्मांश हेच ज्ञान असते म्हणजे ब्रह्म असते. |
| ५२ ते ६६ | परमात्मास्वरूप त्यापासून पुरुषप्रकृति त्यापासून जगत–जगतातील भूतमात्र यांचा गुणात्मक प्रवास. परंतु अद्वैत योगाने पुन्हा मूळ ज्ञानाकडे येता येते. | परमात्मा पुरुष प्रकृती–जगत यांचे अवतरण प्राकट्य |
| ६७ ते ११५ | सांख्यदर्शनाप्रमाणे व ईश्यावास्योपनिषदाप्रमाणे परमात्म्यापासून पुरुष–प्रकृति यांचा २५ तत्त्वांचा ब्रह्मांडगोलक कसा निर्माण झाला, म्हणजे परमात्मा हे ज्ञान, या ज्ञानातूनच स्वसंवेद्यतेने प्रकृति पुरुष प्रपंच हे अज्ञान–चौखाणी सृष्टीचे चलन अशी मर्त्य, भ्रामक, माया/अविद्या स्वरूप या अज्ञानाचा युगे प्रवास व अंती महाप्रलय ज्ञानातच – म्हणजे परमात्म्यात होतो. | परमात्मा ब्रह्मांडव्यापक ब्रह्मांड माया व्याले व तेच महाप्रलयात सामावते. |
| ११६ ते १३७ | परमात्मा–महतत्त्व/पुरुष/अंशात्मा हा पिता व महद्ब्रह्म – महाशक्ती प्रकृतीचे प्राकट्य. ती विविध रूपाने भासमान परंतु त्या वैविध्यात आत्मांश एकच असतो – महाबीज – उत्पत्तीकर्ता एकच आहे. हीच बहुविधतेतील एकात्मता. बहुविधता विविध गुणधर्मांनी सिद्ध होते | एकच ब्रह्म सर्वरूपात चेतना म्हणून उपस्थित आहे. |
| १३८ ते २०३ | सत्त्व, रज, तम या त्रिगुणात्मकतेने विविधता सिद्ध होते. मात्र हे तीनही गुण एकाच देहाच्या ठायी असतात. चैतन्याच्या आणि मनाच्या योगाने या तीन गुणांचे क्षेत्राच्या (देह) ठिकाणी संयोगात्मक कमीअधिक्य होते त्यामुळे वैविध्य भासमान होते. सत्वगुण उत्तम. परंतु त्याच्या ज्ञान (माहिती–तत्त्व व तपशील) याविषयी अहंकारी होतो व आत्मांशाला पारखा होतो. अज्ञानी होतो. रजोगुण मध्यम असतो. तो सुखभोग कारक असतो. त्याच्या अधिक्यामुळे त्याची भोगतृष्णा (भोगआशा) सतत वाढत जाते आणि तो भोगाविषयीही अतृप्त राहून देहाहंकारात अडकतो. तम हा अधम, अज्ञान, आळस, निष्क्रियता तरी देहाहंकार असतो. तो निद्रेतच सुख मानतो. त्याला निद्रेचा त्याग करावा लागला तर तो संतापतो. त्याच्या प्रलयाचीही भीती त्याला नसते. आहे तोपर्यंत विनासायास सुखाची अपेक्षा करतो, त्यामुळे आडवाटेला जातो. हे तिन्ही गुण एकाच क्षेत्राच्या ठिकाणी परस्परांवर मात करीत स्वतःचे अधिक्य निर्माण करण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे स्वभाव वैविध्य निर्माण होते. | सत्त्व – रज – तम या गुणांयुक्त पृथकदेह – गुणांच्या परस्पर संयोगाने स्वभाव वैशिष्ट्ये निष्पन्न होतात. |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) श्रीगुरुंना ज्ञानाचा पुतळा का म्हटले आहे? (२) देहाठायीचे ज्ञान कोणते? (३) जगताच्या अवतरणाचे वर्णन सांख्य दर्शनाप्रमाणे कसे करता येते? (४) जगताचा चक्रनेमीक्रम कोणत्या प्रकारे वर्णन केला आहे? (५) वैश्विक एकात्मता कोणत्या कारणाने जाणवते? (६) त्रिगुणांची वैशिष्ट्ये विविधता कोणत्या प्रकारे निर्माण होतात?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय चौदावा : गुणातीतयोग / गुणत्रय विभाग योग** : भ. गी. श्लोकसंख्या २७, ओवीसंख्या ४१५ (पैकी २०४ ते ४१५)
(भाग दुसरा)

**बैठक क्र. १४ दि. १९/६/२०२४ व २०/६/२०२४**

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| २०४ ते २५९ | सत्वगुणाच्या अधिक्याने व्यक्ती विवेकपूर्णतेने ज्ञानात्मक कर्म उपभोगू लागते. त्यामुळे सांख्य मतातील ३६+१ तसेच पंचमहाभूते वगळून २५ तत्त्वे त्याच्या ठायी ज्ञानात्मक व्यवहार करू लागतात. पंचेंद्रिये, ५ कर्मेंद्रिये, ५ तन्मात्रा, ५ अहंकार/बुद्धी–मन, वासना/विकार, पुरुष, प्रकृति + ३ तीन गुण १ युग = २४ + परमात्मा = २५ या सर्व गोष्टींचे सर्वोत्तम स्वरूप देहाला लाभते असे सत्वगुणाचे अधिक्य.<br>रजोगुणी राजपाट भोग भोगण्यासाठी हवेनको ते कर्म भोग पूर्ण करण्यासाठी करत राहतो. आशेने तो विश्वाला आव्हान देतो.<br>सत्व आणि रजोगुणाला मागे सारून प्रकटतो तो तमोगुण (अज्ञानवशता) होय. दुष्कृतीची आवड उत्पन्न होते. तो माणूसपण विसरतो. प्राणीवत जगणे. | ५– पुरुष, प्रकृति, बुद्धी/अहंकार, मन, विकार + ५– पंचमहाभूते + ५– पंचज्ञानेंद्रिये + ५ – कर्मेंद्रिये + ५– तन्मात्रा + चत्वार युगे + ७– ऋषी = ३६ + १ परमात्मा (किंवा दशेंद्रियांचे गुणदोष + युग + परम त्मा) |
| २६० ते २६४ | सत्वाचे – निर्मळफळ, राजसाचे – भोग युक्त तरी अतृप्त दुखद फळ, तामसाचे – अज्ञान सर्वनाश | गुणफळनिष्पत्ती |
| २६५ ते २७० | सत्व – ज्ञानमय, रज – लोभ व द्वैतकारण, तामस – प्रमादी घोड चुका करतो. | |
| २७१ ते २७८ | जीवात्मा गुणाप्रमाणे देही रूप घेतो. सत्व–स्वर्गाचा राजा, रज–मनुष्य जन्म मृत्यू फेरा तम – सतत मरणवाटेने जातो. | |
| २७९ ते २९९ | परमात्म्याचा स्वभाव त्रिगुणाच्या पलिकडे असतो (निर्गुण) – तो देहात अकर्ता सत्तारूप असतो. | |
| ३०० ते ३१९ | ज्ञानाने गुणातीत होऊन परमात्मास्वरूपाने ज्ञानी तटस्थ – निर्लेप असे वर्तन करू लागतो. गुण केवळ देहातच लीला करतात. त्याला देहगुण राहात नाही. | ज्ञानी निर्गुण होतो. |
| ३२० ते ३२६ | ज्ञान, वैराग्य, लक्ष्मी, औदार्य, ऐश्वर्य, यश या षड्गुणांनी संपन्न श्रीकृष्णांना, निर्गुणी कसा आचरतो असा प्रश्न विचारला. | |
| ३२७ ते ३७० | सत्वाचा प्रकाश, रजोगुणाची प्रवृत्ती आणि तमोगुणाचा मोह यांची इच्छा किंवा तिरस्कार करत नाही – तटस्थता – सामान्य लोकांप्रमाणे तो प्राप्त कर्म करीत असतो तथापि त्या कर्माचा यश–अपयश इ. परिणाम त्याच्यावर होत नाही. सुखदुःख, लाभालाभ, निंदास्तुती यांविषयी तो निर्विकार असतो. मानापमान, शत्रुमित्र अशा द्वंद्वात तो अडकत नाही. म्हणून गुणातीत कसे होतात याचे विवेचन पुढे केले. | गुणातीताची वैशिष्ट्ये |
| ३७१ ते ४०८ | अव्यभिचारी (भेदरहित) अर्थात समदृष्टीने जो सर्वांचा विचार करतो (भक्ती) तो गुणातीत होतो. सर्वत्र सर्वमात्रांत परमात्मा (चैतन्य) व्यापून आहे असे जाणून समरसतेने जो सर्वांठायी समत्वाने प्रेम करतो (भक्ती) तो गुणातीत असा परमतत्त्वाला पोचतो. म्हणजे परमेश्वर भक्ताठायी प्रकटतो तेच ब्रह्मज्ञान होणे होय. यालाच सायुज्यमुक्ती म्हणतात. यालाच मोक्ष पुरुषार्थ असे म्हणतात. परमात्माच ब्रह्म होय. | |
| ४०८ ते ४१५ | न विचारता तत्त्वज्ञान सांगत बसू नये युद्धवार्ता सांगावी असे धृतराष्ट्र संजयाला म्हणतो. त्यावर संजय मनोमनी धृतराष्ट्राला सद्बुद्धी व्हावी अशी प्रार्थना करतो. | संजय धृतराष्ट्र संवाद व संजयाचे स्वगत |

## आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) विविध गुणाधिक्याने विविध प्रकारे मनप्रवृत्ती कशी निर्माण होते? (२) त्रिगुणांची तीन प्रकारची भिन्न फलनिष्पत्ती कोणती? (३) गुणातीत होण्यासाठी कोणत्या प्रकारची साधना करावी लागते? (४) गुणातीत पुरुषाचा व्यवहार कोणत्या प्रकारे घडतो? (५) श्रीकृष्णांनी भक्ती साधनेच्या अवस्थेचे कोणते वैशिष्ट्य सांगितले आहे? (६) मोक्ष किंवा सायुज्यमुक्ती कोणत्या मनोवृत्तीने साधली जाते? (७) संजय आणि धृतराष्ट्राच्या संवादातील मर्म कोणते?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय पंधरावा : पुरुषोत्तमयोग** : भ. गी. श्लोकसंख्या २०, ओवीसंख्या ५९९ (पैकी १ ते २०९) (भाग पहिला)

**बैठक क्र. १५ दि. ३/७/२०२४ व ४/७/२०२४**

संसाराचे अनित्यत्व व परमात्म्याचे नित्यत्व हेच खरे ज्ञान. जीवात्मा आणि परमात्मा यांचे ऐक्य स्पष्ट केले आहे.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १ ते २८ | श्री गुरु स्तवन – नाथ परंपरेने सर्वकाही गुरुमय. गुरु हेच सर्वस्व. | |
| २९ ते ७१ | पंधराव्या अध्यायात उर्ध्वमूल असलेल्या अश्वत्थ (पिंपळ) या वृक्षाच्या रूपकातून ब्रह्मांडरूपी मायेचा पसारा खाली कसा नित्य नव्याने वाढत जातो कारण मुळात तो अनित्य असतो. (म्हणजे प्रत्येकवेळी नवी पालवी, पारंबी फुटते.) तो त्यामुळे नित्य वाटतो परंतु प्रतिक्षण पूर्वरूप टाकून (मृत) नवे प्रकटते. (जन्म मृत्यू फेरा) या अश्वत्थाचे मूळ परब्रह्मात असते व त्यातूनच हे पुरुष+प्रकृती (संसारप्रपंच) स्वरूपात भासमान होते म्हणून या ब्रह्माण्डाला म्हणजे अश्वत्थ वृक्षाला काही माया, अविद्या असे म्हणतात. युगायुगात नवी पालवी फुटते व त्यांना पुन्हा नव्या फांद्या फुटतात मात्र हे सारे आभास असते त्या ब्रह्मत्व (परमात्मा तत्त्व) मूळात महत्तत्त्व स्वरूपात परमात्म्यापासूनच प्रकटते. या ब्रह्माण्डाला अश्वत्थ अशा रूपकातून मांडले आहे. | परमात्मा<br>↓<br>महत्तत्त्व<br>↓<br>पुरुष–प्रकृति असे चक्रनेमिक्रम असणारे सृष्टीचक्र ब्रह्माण्डपणे भासते. अश्वत्थ रूपक. |
| ७२ ते ८१ | उर्ध्व मूळ असलेल्या वृक्ष म्हणविणाऱ्या अश्वत्थाचे मूळ हे परब्रह्म होय. ते अद्वैत आहे. त्यास उर्ध्व, मध्य, अधर असे काहीही नाही. ते कार्य किंवा कारणही नाही. त्याला एक, दुजे असे भेद नाहीत. ज्ञातृज्ञेय या गोष्टीच नाहीत. ते सत् किंवा असत् नाही. | निर्गुण असे परब्रह्म हे या अश्वत्थाचे मूळ आहे. |
| ८२ ते १४३ | भव म्हणजे ब्रह्मांड ही त्या वस्तुची (परमात्म्याची) प्रभा = माया आहे. त्या ब्रह्माच्या आश्रयाने असूनही ते जाणवत नाही. ब्रह्माच्या अबोध अवस्थेतून हे मूळ (महत्तत्त्व) प्रकटले हेच वेदाने मान्य केले आहे. त्यातून बिजांकुर न्यायाने हे ब्रह्माण्ड विस्तारले आहे. निर्मळ अशा उर्ध्व आत्म्यापासून हा माया योग साधला आहे. महत्तत्त्वापासून कोंभ म्हणजे पान निपजले. त्या पानातून सत्व, रज, तम गुणांच्या फांद्या फुटल्या. तेथे भेदाभेद जाणवतात. सांख्यांनी वर्णिल्याप्रमाणे ३६ गुणी प्राकृतिक ब्रह्मांड–देह यांचा पसारा होतो. तो पसारा दिसतो म्हणून खरा हेच अज्ञानाचे मत = अद्वैत (प्रपंच नसतो) परंतु यालाच प्रतिध्वनी नाशवंत अशी पाने, फांद्या इ. विस्तारतात व नष्ट होतात (सृष्टी चक्रनेमिक्रम) म्हणून त्याला अश्वत्थ असे नाव आहे. नित्य परब्रह्मरूप ग्रंथ अलौकिक परंतु अश्वत्थ झाल्याने त्याला क्षणिक नाव अश्वत्थ असे मिळते. प्रकृतीला मनाने नावे दिलेली असतात. त्यामुळे नित्यालाच अनित्य असा माया भास होतो. | प्रकृति (ब्रह्माण्ड) हे अज्ञानाचे मूळ. परब्रह्म ज्ञान हे होय. |
| १४४ ते २०९ | ब्रह्माण्डपसारा जो युगानुयोगे उत्पत्ती स्थिती लय या क्रमात चक्रनेमी आहे. त्या अज्ञानाचा उहापोह, त्याचे मूळ कारण परब्रह्म हे लक्षात घेऊन श्रुतिवाङ्मय करते आहे. हे एकप्रकारे अज्ञानाविषयी तपशीलवार विवेचन असते. या ब्रह्माण्डपसाऱ्यात चौखाणी जीवमात्र<br>त्रिगुणात्मकतेने जगत असतात तथापि माणसाच्या संबंधाने लौकिकाचा विचार आगमादी शास्त्रे परब्रह्म मूळ लक्षात येऊनही करतात. हा वाणीचा विलास म्हणजेच युगांचे चक्र होय. भेदाभेद हे काल्पनिकस्वरूप तपशील मानले जातात व तेच अज्ञानवशतेने खरे मानले जाते असे या अश्वत्थ तरुचे रूप आहे. या सर्व तपशीलाचा विचार केल्यानंतर अखेर लक्ष मुळाकडे जाते. | सर्व चर्चा केवळ फोल असून परब्रह्मच सत्य या मुळाकडे यावे लागते. |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) श्रीगुरुस्तवन नाथपरंपरेने कसे प्रकटले आहे? (२) अश्वत्थाचे रूपक कोणत्या कारणाने केले? (३) अश्वत्थाचे मूळ कोणते? त्याचे अद्वैत स्वरूप कसे वर्णिले आहे? (४) ऋषी विचारवंत कोणत्या चर्चेत गुंतले आहेत? त्यांना मूळाकडे का यावे लागते? (५) मूळातून प्रकटलेल्या अश्वत्थाचे सृष्टीरूप वर्णन करतांना मानवी लौकिक जीवनाचा कोणता तपशील दिला आहे?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय पंधरावा : पुरुषोत्तमयोग** : भ. गी. श्लोकसंख्या २०, ओवीसंख्या ५९९ (पैकी २१० ते ४००) (भाग दुसरा)

**बैठक क्र. १५ दि. १०/७/२०२४ व ११/७/२०२४**

संसाराचे अनित्यत्व व परमात्म्याचे नित्यत्व हेच खरे ज्ञान. जीवात्मा आणि परमात्मा ऐक्यभाव.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| २१० ते २६६ | परमात्मा या मूळातून निर्माण झालेले अश्वत्थस्वरूप प्रकृतिवृक्ष हा आभास वृक्ष केवळ ज्ञानाने (परमात्मज्ञानाने अर्थात अद्वैतज्ञानाने) उन्मळता येतो. वास्तविक मूळातच हा अधःशाख असलेला प्रकृतिवृक्ष (संसारवृक्ष) हा अज्ञानवश भासतो. त्यामुळे तो मुळातच नाही मग उन्मळण्याचा प्रश्न नाही. परंतु जीवात्म्याला या अज्ञानवशतेने दुःखकारक भववृक्ष कसा नाहिसा करता येईल याची चिंता वाटते. वृक्ष आणि चिंता दोन्ही भ्रामकच. कल्पांती यातील दोन्हीही आपोआप नाहिसे होतात व अविनाशी स्थिर परमात्मा निर्विकारपणे नित्य असतो. भवसागर अर्थात प्रकृतिरूपी अधःशाख ही माया किंवा अविद्या असते त्यातील घटकांना ती रज्जूसर्पन्यायाने खरी वाटते. ज्ञान झाले की आभास नाहिसा होतो म्हणून या भवाश्वत्थाला आत्मज्ञानाच्या खड्गानेच नाहिसे करता येते. | ज्ञान झाले की भ्रामक असा भववृक्ष आपोआप नाहिसा होतो. |
| २६७ ते २८४ | आपण आपल्यातील आत्मतत्त्वाचा शोध आपल्याच ज्ञानेंद्रियांनी घेणे म्हणजे ज्ञानसाधना करणे होय. हे ज्ञान ठायीच प्रकटते. त्यामुळे देहाहंकार नाहीसा होतो. | देहाहंकार टाकून आत्मशोध घ्यावा. |
| २८५ ते ३०७ | निराकार निर्गुण अशा ज्ञान स्थितीत अद्वैत होणे हे ज्याच्याठायी ज्ञानाग्नी पेटला त्याच्याठायी शक्य आहे. ही स्थिती अहंकार विषमता, वासना, आसक्ती, देहभाव नाहिसा करण्याच्या अभ्यासाने जो आत्मशोध घेतो त्याच्याठायी ज्ञानाग्नी प्रज्वलित होतो व तो भवरूपी अधो अश्वत्थाच्या मूळात अर्थात परमात्म्यात म्हणजेच ज्ञानात अद्वैत अनुभवतो. | ज्ञानाने अविनाश परब्रह्म पदाचा लाभ होतो. |
| ३०८ ते ३४२ | निजस्वरूपाचे म्हणजे आत्मरूपाचे निजधाम हे ब्रह्मांडा पलिकडे अस्तित्व व आकारहीनतेने जाणवते. तेच खरे सत्य, चिद्, आनंद स्वरूप आहे. ते सर्व ब्रह्मांड प्रकटविते. त्यामुळे ते चिद्रूपाने सर्व ब्रह्मांडात व्याप्त असते. ते ब्रह्मांडातच व्याप्त असल्याचे जाणवत असताना त्या ब्रह्मांडापलिकडील आत्मरूप कसे प्रकाशणार? म्हणून ब्रह्मांड घटक असलेल्या अग्नी, सूर्य, चंद्र यांनाही ते दिसू शकत नाही. तरी त्याचे असणे नाकारता येत नाही. जेव्हा ते ब्रह्मांड रूपात लपते तेव्हा ते दिसत नाही. ब्रह्मांडालाच सत्य मानून मिथ्याशोध घेण्याचा प्रकार घडतो. जेव्हा महाप्रलयांती ब्रह्मांड नाहिसे होते. (प्रकृति नाहीशी होते) तेव्हा ब्रह्मांड सच्चिदानंदस्वरूपात विरून गेल्याने आत्मरूपाचे ज्ञान होते तेव्हा ब्रह्मांड दिसत नाही. देहभाव असतांना आत्मरूपाचा विसर पडतो तर आत्मरूपाचे ज्ञान झाले की देहभावाचा विसर पडतो. हे ज्ञानानेच उमगते. ज्ञानमय अर्थात परमेश्वरस्वरूप झालेली ज्ञानी व्यक्ती ही पुनर्जन्माच्या फेऱ्यात सापडत नाही मात्र ती सगुणसाकार ब्रह्माण्डरूप असल्याने ती पूर्णब्रह्मरूप होऊनही देहाने भिन्न दिसते. | परब्रह्म ब्रह्माण्ड होऊन प्रकटले की परब्रह्म लोपल्यासारखे वाटते. आणि ब्रह्मांड प्रलयास गेले की आत्मरूपच ज्ञात होते. देह दिसतो तेव्हा आत्मरूप दिसत नाही. आत्मरूप जाणवले की देह नाहिसा होतो. |
| ३४३ ते ४०० | उत्तम पुरुष प्रातिनिधीक रूप ब्रह्माण्डातील पुरुषाठायी मन असते. मन प्रकृतित मिसळून प्रकृतिचा म्हणजे जन्ममृत्यू फेऱ्यांचा अनुभव घेताना पुरुषाचाच विसर पडतो त्यावेळी तो आत्मांश सगुणसाकार म्हणून इंद्रियव्यवहार करू लागतो. मन वासनाधीन होऊन स्वतःचे आत्म रूप विसरते व देह ठेवल्यावरही वासनासत्तेनेच वागू लागते. म्हणून देहभावाचे अज्ञान नाहिसे झाले तरच आत्मज्ञान होते. ते आत्मज्ञान सर्व ब्रह्माण्डातील भूतजातात अंशात्मक शक्तिरूपात ज्ञान्यांना जाणवते. | पुरुषोत्तम<br>पुरुष प्रकृति<br>मन → ऐंद्रिय<br>विकार भाव |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) भव वृक्ष केव्हा व का उन्मळून पडू शकतो? (२) ठायीच्या आत्मतत्त्वाचा शोध कोणत्या प्रक्रियेने घेता येईल? (३) अविनाशी परब्रह्माचा अनुभव केव्हा शक्य आहे? (४) आत्मरूपाचे निजधाम कोठे व कसे आहे? (५) ब्रह्म व ब्रह्माण्ड यांच्या अनुभूतीचा लपंडाव श्री ज्ञानेश्वरांनी कोणत्या प्रकारे वर्णिला आहे? (६) पुरुष-मन आणि प्राकृतिक ऐंद्रिय यांचा संबंध स्पष्ट करा. (७) ज्ञानी पुरुषोत्तमाशी स्वरूप होऊनही त्याचे भिन्नत्व कोणत्या प्रकारे जाणवते? मन आणि देहवासना यांचे साहचर्य कसे स्पष्ट केले आहे?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय पंधरावा : पुरुषोत्तमयोग** : भ. गी. श्लोकसंख्या २०, ओवीसंख्या ५९९ (पैकी ४०१ ते ५९९) (भाग तिसरा)

**बैठक क्र. १५ दि. १७/७/२०२४ व १८/७/२०२४**

संसाराचे अनित्यत्व व परमात्म्याचे नित्यत्व हेच खरे ज्ञान. जीवात्मा आणि परमात्मा ऐक्यभाव.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| ४०१ ते ४०६ | पृथ्वीवरील भूतमात्राचे त्यांच्या ठायी संचारून चंद्र, अन्न, पाणी या रूपाने परमात्माच भूतमात्र धारण करतो. | |
| ४०७ ते ४२० | भूक, अन्नपाणी इ. साठी परमात्माच रूपे घेऊन जीवमात्रांचे पोषण करतो. शब्द, रस, गंध, स्पर्श, दुःख ही त्याचीच ज्ञान व अज्ञान मूलक रूपे होत. | |
| ४२१ ते ४७० | अविद्या नाहिशी केली की पूर्ण ज्ञानमय अवस्था निर्माण होते. ज्ञानमय अवस्थेत कार्य व कारण दोन्ही नाहिसे होते. मूळ विस्तार, कार्य, कारण व्यवहार इ. सर्व परमात्मा व्यापून आहे. वेदनिर्माता आणि वेद जाणणाराही तोच आहे. परमेश्वर सर्वव्यापी असल्याने जाणीव आणि नेणीव दोन्ही रूपे त्याचीच असतात. हे कृष्ण व अर्जुन या द्वैत भावातून प्रकटते. स्वरूप समजून घेण्यासाठी कृष्णाशी एकरूप असलेला अर्जुन अज्ञानवश द्वैत होतो व प्रश्न विचारतो. एरवी कृष्णार्जुन दोन नाहीत. तो पुरुषोत्तमच पुरुषरूपाने प्रकृतिठायी संचारून लीलाविग्रह अनुभवतो. | वास्तविक पुरुषोत्तमच पुरुष–प्रकृतिरूपाने सगुण साकार झाला. वास्तविक दोन्ही अवस्था एकात्म असतात. |
| ४७१ ते ५२४ | आत्मा (नाथसंप्रदायाप्रमाणे), पुरुष (ईश्वर–परमात्मा) आणि जीवात्मा अशा तीन पुरुषांचे विवेचन आहे. त्यात जीवात्मा क्षरपुरुष, पुरुष हा कारण अक्षरपुरुष तर आत्मा पुरुषोत्तम अक्षरपुरुष असे विवरण केले आहे. पंचमहाभूते + त्रिगुण अशी अष्टधाप्रकृति सांख्य दर्शना प्रमाणे ३६ भेदाने देहरूप व्यवहार करते. त्यातील जीवात्मा हा प्रकृतिसंयोगाने क्षरपुरुष होय. जन्मच नाही त्याला नाश नाही म्हणून तो अक्षरपुरुष होय. बीज न्यायाने अक्षरपुरुष काम करतो. बीजरूप तो अक्षरपुरुष. चैतन्य म्हणजेच अक्षरपुरुष. | सर्व जीवमात्र हे क्षरपुरुष होत.<br><br>सांख्यातील पुरुष हा अक्षरपुरुष होय. |
| ५२५ ते ५९९ | जे ऐंद्रिय अनुभवापेक्षा केवळ जाणवते तो पुरुषोत्तम होय. नाथ (आत्मा) इतरांना (परमात्मा) हा उत्तमपुरुष होय. निखळ आनंद भोगणारा (ओ. ५४५ ते ५५०) स्वयंप्रकाशी, क्षर, अक्षर – यांत सर्वोत्तम पुरुष. वेदांनी पुरुषोत्तम नाव ठेवले. सच्चिदानंदरूप, स्वतःसिद्ध (पूर्ण) श्री ज्ञानेश्वर पुरुषोत्तमरूपाचे म्हणजे ज्ञानाचे वर्णन करतांना (ओ. ५७१ ते ५७४) सर्व आनंदाचे, ज्ञानाचे मूळ या दृष्टीने वर्णन करतात. आत्म्याचे पुरुषोत्तम स्वरूप १५ व्या अध्यायात मंत्रअक्षरांनी प्रकटविले आहे. १५ व्या तील श्लोक एकाग्रचित्ताने म्हणण्याचा अभ्यास (भक्तिस्वरूप) केला तर आत्मरूपाचा साक्षात्कार होते. आत्मज्ञानाने स्वतःच स्वतःला अद्वैतसिद्धी घडवितो. ज्ञानेश्वर नम्रपणाने श्रोत्यांना रसिक होऊन संजयाप्रमाणे हा मांडलेला पुरुषोत्तम प्रमेय (सिद्धान्त) समजून घ्यावा असे म्हणतात. | आत्मा/परमात्मा<br>उत्तमपुरुष<br>↓<br>पुरुष – प्रकृति<br>(अक्षर)<br>→ प्रकृतित जीव चैतन्य क्षर |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) पुरुषोत्तम हे नाव कोणत्या अवस्थेस दिले आहे? (२) पुरुषोत्तमातून अक्षर आणि क्षर पुरुषाचा विस्तार कोणत्या न्यायाने होतो स्पष्ट करा. (३) पुरुषोत्तम स्थितीचे स्वरूप श्री ज्ञानेश्वरांनी कोणत्या ओव्यांतून स्पष्ट केले आहे स्पष्ट करून लिहा. (४) आत्मा/परमात्मा – या कल्पनांचा जीवदशेशी असलेला संबंध स्पष्ट करून लिहा. (५) श्रीकृष्णाच्या अंतःकरणातील गुह्य ज्ञान कोणते? ते का प्रकट झाले? (६) गुह्य ज्ञान समजून घेण्यासाठी श्री ज्ञानेश्वरांनी श्रोत्यांना कोणत्या प्रकारे आग्रह केला आहे? (७) पंधराव्या अध्यायातील वीस श्लोकांचे सामर्थ्य स्पष्ट करा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय सोळावा : दैवासुर संपाद्विभागयोग** : भ. गी. श्लोकसंख्या २४, ओवीसंख्या ४७३ (पैकी १ ते १८५) (भाग पहिला)

**बैठक क्र. १६ दि. २४/७/२०२४ व २५/७/२०२४**

ज्ञानमय अवस्थेसाठी दैवीसंपत्ती अंगी असणे असे एकमेव साधन होय.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १ ते ४० | नाथ सांप्रदायिक श्रीगुरु निवृत्तीनाथ यांचा सूर्यरूपकाच्या आधारे गुरुमहिमा वर्णन व ग्रंथसंपदेचे श्रेय प्रदान. | पंथगुरु हाच ज्ञानसूर्य होय. |
| ४१ ते ६७ | पुरुषोत्तम योगात ज्ञान अर्थात आत्मरूपाविषयी गुह्य प्रतिपादन करून आनंदसाम्राज्य अर्जुनाला प्राप्त झाले. आत्मज्ञान प्राप्त झाले की सम्यक दृष्टीने वर्तन घडून, ज्ञानमय योगक्षेम घडू लागतो असे श्रीकृष्णांनी सांगितले. हे ज्ञान अर्जुनाप्रमाणे कोणत्या प्रकारच्या गुणी व्यक्तीला प्राप्त होते याचे विवेचन करतांना दैवी संपत्ती व आसुरी संपत्ती विवेचन करणारा १६ वा अध्याय प्रकटला आहे. दैवी संपत्ती असणारालाच ज्ञानमय अवस्था प्राप्त होते. | ज्ञान जाणीव हाच पुरुषोत्तम योग |
| ६८ ते ११३ | (१) **अभय–** हे अभय अद्वैत ज्ञानाने प्राप्त होते. तेथे सम्यक ज्ञान होते.<br>(२) **सत्वशुद्धी–** विना विकल्प स्थिर बुद्धीने विवेक ठेवणे.<br>(३) **आत्मलाभ–** आत्म्याविषयी जाणीव<br>(४) **ज्ञानयोग–** एकचित्त, स्थिरबुद्धी होणे.<br>(५) **दान–** श्रांताला मन विश्रांत करणे हेच मोक्षाचे साधन, सपात्र दान.<br>(६) **दम–** वासनांचे दमन करणे.<br>(७) **यज्ञ–** वैराग्य– निरपेक्षता, कर्म– निष्काम कर्म हाच यज्ञ.<br>(८) **स्वाध्याय–** अर्थात अभ्यास नित्य करणे.<br>(९) **तप–** वेदाभ्यास– निष्ठेने, अग्निदिव्य करावे तसा अभ्यास– ध्यासपूर्वक अभ्यास हेच तप. विवेकपूर्वक अभ्यास.<br>(१०) **आर्जव–** प्राणिमात्रांविषयी प्रेम. | दैवी गुण संपत्ती |
| ११४ ते १८५ | (११) **अहिंसा–** जगाच्या सुखाच्या दृष्टीने वागणे.<br>(१२) **सत्य–** योग्य परिणाम साधणारे अविकारी.<br>(१३) **अक्रोध–** क्रोधाने बोलले असे वाटणार नाही असा शब्दाघात असावा.<br>(१४) **त्याग–** बुद्धिमंताने देहातील अहंकार टाकणे म्हणजे त्याग.<br>(१५) **शांती–** अभिमान सांडणे – ज्ञान–ज्ञाता–ज्ञेय याविषयी अभिमान सांडणे.<br>(१६) **अपैशून्य–** सर्वाठायी नम्रता हेच मोक्षाचे साधन.<br>(१७) **दया–** उत्तम अधम विचार न करता दुःख हरण करण्याचा प्रयत्न करणे. कणव ठेवून करणे.<br>(१८) **अलोलुप्तत्व–** परसुख जाणणे, निरपेक्ष प्रेम–निरासक्ती.<br>(१९) **मार्दव–** सर्वांना हवाहवासा गोडवा–मृदु सुखद वर्तन.<br>(२०) **अचापल्य–** देहाविषयी निरासक्ती– अचंचलत्व– वासनादेहाचा कंटाळा. | दैवी गुण संपत्ती |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) श्री गुरुंसाठीचे सूर्याचे रूपक स्पष्ट करून लिहा. (२) पुरुषोत्तम योग अर्थात ज्ञान प्राप्तीसाठी कोणत्या गुणसंपत्तीची आवश्यकता असते? (३) दैवीगुण संपत्तीची गुणवैशिष्ट्ये स्पष्ट करून लिहा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय सोळावा : दैवासुर संपाद्विभागयोग** : भ. गी. श्लोकसंख्या २४, ओवीसंख्या ४७३ (पैकी १८६ ते ३४७) (भाग दुसरा)

**बैठक क्र. १६ दि. ३१/७/२०२४ व १/८/२०२४**

ज्ञानमय अवस्थेसाठी दैवीसंपत्ती अंगी असणे असे एकमेव साधन होय.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १८६ ते २१२ | (२१) जीवात्म्याचे (निज) ईश्वराकडे ध्यासपूर्वक सहज धावणे या अध्यात्मिक स्थितीला **तेज** असे नाव आहे. (२२) **क्षमा–** सर्व प्रकारे दाहकता आणि गौरव वाट्याला येऊनही गर्व न होणे (२३) **धृति–** मनसर्वथा विचलित, नामोहरम होण्याच्या प्रसंगीही धैर्य धरणे म्हणजे धृति. (२४) **शौच–** अंतःकरण पूर्णतः वासनाविकाररहित गंगामृतासारखे शुद्ध असणे. (२५) **अद्रोहत्व–** निःस्वार्थ प्रेम (२६) **अमानित्व–** नम्रता. हे दैवी संपत्तीचे गुणवर्णन. | एकूण २६ दैवीगुण ब्रह्मसंपदा |
| २१३ ते २६४ | विषवर्ग असे आसुरी गुण हे दोष रूपी वृक्षाचे खोड होय.<br>(१) दंभ– वाडपणा – उद्धट वर्तन किंवा चुकीचे वर्तन – अधर्म<br>(२) दर्प– उतलेपणाने वागणे – उन्मत्त होणे<br>(३) अभिमान– गर्वोद्धत्त मत्सर<br>(४) क्रोध– दुसऱ्याचे यश पाहून संतापणे किंवा मनाविरुद्ध गोष्टीने विचलन<br>(५) पारुष्य– अधमपणा, अस्पर्शता<br>(६) अज्ञान– जात्यंध, खरेखोटे कळत नाही असा, कळून न कळला असा. | सहा दोष – आसुरी संपत्ती |
| २६५ ते २८० | दैवीसंपत्ती मोक्षाकडे नेते तर आसुरी संपत्ती मायामोहाकडे नेते. म्हणून दैवीसंपत्तीचा आश्रय करावा. प्रकृति हीच आसुरी संपत्तीचे कारण आहे. | |
| २८१ ते २९४ | प्रवृत्ती मोहाकडे नेते, निवृत्ती मोक्षाकडे नेते, आसुरी संपत्तीला याचे भान राहात नाही. त्यामुळे तो मोहजालात अडकतच जातो. म्हणून आसुरी संपत्तीमुळे ओढवणारा प्रसंग जाणावा. | |
| २९५ ते ३०० | विश्वाचा मांडलेला प्रपंच द्रष्ट्या ऋषींनी व्यवस्थापित केला. न्याय शास्त्राचे मंडन व विश्वाचा न्यायबुद्धीने उपभोग घेण्याचा न्याय्य कर्ममार्ग सांगितला. (स्वधर्माचरणाचा बोध केला) या श्रुति, स्मृति, दर्शने यांच्या व्यवस्थेला आसुर थोतांड मानून टवाळी करू लागले. दैवीसंपत्तीने सिद्ध केलेली व्यवस्था देहबुद्धिप्रामाण्याने खोटी मानू लागले (आस्तिकांनी मांडलेली अध्यात्म निष्ठ व्यवस्था नास्तिक थोतांड मानू लागले.) | दैवीसंपत्ती– आस्तिक भाव– आसूरी संपत्ती नास्तिक भाव – दोहोत अनादि संघर्ष |
| ३०१ ते ३१३ | आसुरांचे विचार (चार्वाक सिद्धांत/बुद्धिप्रामाण्यवादी सिद्धांत) | भौतिक ते सत्य |
| ३१४ ते ३२२ | आसुर लोक सर्वानाशाला ओढवून घेतात. | स्वार्थलोलूप |
| ३२३ ते ३३६ | आसुर बुद्धीचे लोक स्वैर वर्तन करू लागले. विधिनिषेध नसतो. भोग लोलूप होतात. | भोगलोलूप |
| ३३७ ते ३४७ | अन्यायाने लुबाडणूक करीत, शिकाऱ्याच्या मार्गाने जातात. | अन्याय्य मार्ग |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) दैवी संपत्तीचे गुण वर्णन करा. (२) आसुरी संपत्तीचे गुण वर्णन करा. (३) देहबुद्धी सर्वनाशास कारणीभूत होते असे का म्हटले आहे? (४) दैवी संपत्ती आणि आसुरी संपत्ती यांचा सनातन संघर्ष स्पष्ट करून लिहा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय सोळावा : दैवासुर संपाद्विभागयोग** : भ. गी. श्लोकसंख्या २४, ओवीसंख्या ४७३ (पैकी ३४८ ते ४७३) (भाग तिसरा)

**बैठक क्र. १६ दि. ७/८/२०२४ व ८/८/२०२४**

ज्ञानमय अवस्थेसाठी दैवीसंपत्ती अंगी असणे असे एकमेव साधन होय.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| ३४८ ते ३७७ | आसुरी गुणांनी आशाळभूत होऊन, हावभरला होतो. अहंकाराने तो विश्वजेता झाल्याचे व परमेश्वराची गादी मिळविल्याचे मानू लागतो. त्याची स्तुती करील त्याला सर्वकाही देण्याचे आश्वासन तो देतो. इतरांना लुबाडून ऐश्वर्याचा वाटेल तसा भोग घेण्यात तो दंग होतो. वस्तुतः तो असंतुष्टतेच्या नरकात गटांगळ्या खात असतो. | आसुरी व्यक्तिमत्त्व नेहमी असंतुष्टच असते. |
| ३७८ ते ४२४ | दांभिकपणाने स्वतःच्याच मोठेपणात दंग होऊन आपणच जगाचे भले करण्यासाठी सेवा करीत आहोत असे भासवून लुबाडणूकच करण्यात यश मानतात. अहंकार, बल, उद्दामपणा, काम आणि क्रोध यांनी वेढलेले हे आसुरी लोक परमेश्वराचाच द्वेष करू लागतात. तेव्हा परमेश्वर त्यांना त्याच प्रकारच्या पुनर्जन्मात भोगण्यासाठी पाठवण्याची व्यवस्था करतो. त्यामुळे ते पुढे पुढे अत्यंत अधोगतीला जातात म्हणून आसुरी संपत्तिपासून दूर राहावे. | स्वतःला परमेश्वरच समजू लागतात त्यामुळे ते जन्मोजन्मी नरकयातनांच्या चक्रात सापडतात. |
| ४२५ ते ४५४ | काम, क्रोध, लोभ हे दुर्गुण त्यजावेत. म्हणजे उत्तम गति प्राप्त होते. म्हणजेच आत्मज्ञानी होतो. परंतु या शास्त्राविरुद्ध जो आसुरी संपत्तीला कवटाळतो त्याला नरकच अटळ आहे. | दुर्गुणांचा त्याग हाच परमगतिचा मार्ग. |
| ४५५ ते ४६९ | विवेकाने शास्त्रप्रमाण मानून म्हणजेच दैवीसंपत्ति अंगीकृत करूनच ज्ञानाप्रत जाता येते. अर्थात पुरुषोत्तम योग अनुभवता येतो. | यासाठी वेदनिष्ठ व्हावे. आस्तिक व्हावे. |
| ४७० ते ४७३ | श्रोतृसंवाद – पुढील अध्यायाचा प्रस्ताव. | |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) आसुरी गुणांनी नरजन्माला कोणत्या प्रकारची अवस्था व गति प्राप्त होते. वर्णन करून लिहा. (२) आसूरी संपत्तिने नर्कभोग अटळ असे का म्हटले आहे? (३) आत्मज्ञानी होण्यासाठी श्रीकृष्णाने कोणत्या गोष्टींचा त्याग करावयास सांगितला आहे? (४) वेदनिष्ठ व्हावे असे श्रीकृष्णांनी का बजावले आहे?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय सतरावा : श्रद्धादिनिरुपणयोग** : भ. गी. श्लोकसंख्या २८, ओवीसंख्या ४३३ (पैकी १ ते १३८) (भाग पहिला)

**बैठक क्र. १७ दि. १४/८/२०२४ व १५/८/२०२४**

श्रद्धेचे प्रकार व युक्त श्रद्धायुक्त कर्मयोगाने माणूस सफल होतो.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १ ते ४<br>५ ते २०<br>२१ ते ३२ | श्रीगुरुचे रुपकात्मक निवेदन श्री निवृत्तीगुरुरावांचा गौरव<br>शास्त्रानुसार जे वागत नाहीत त्यांना केवळ श्रद्धेने मोक्षाप्रत जाता येते का?<br>शंकांचे निवेदन करून १७ व्याचा प्रस्ताव | श्रीगुरुंमुळेच सर्व शंकांचे निरसन व शास्त्रानुसार कार्य करता येते |
| ३३ ते ४५<br><br><br><br>४६ ते ४८ | श्रीअर्जुनाचे शंका कथन, शास्त्र अनुसरतांना चुकला तर? शास्त्रच माहीत नाही तर? विविध देवतांचे श्रद्धेने पूजन केले तर? केवळ श्रेष्ठ शास्त्रज्ञानी श्रद्धावंताचे अनुकरण केले तर? सत्व, रज, तम प्रवृत्तीच्या शास्त्र न जाणता किंवा अनुकरणाने कर्मे केल्यास कोणते फळ अशा श्रद्धेने प्राप्त होते? इ. शंकांचे कथन<br>श्रीकृष्ण स्तुती व श्रीकृष्ण उत्तरांचा प्रस्ताव | शंकेखोर सामान्य जनांचा प्रतिनिधी अर्जुन |
| ४९ ते ६५ | सात्विक, राजस आणि तामस अशा तीन प्रकारची श्रद्धा असते. ही गुणांवर अवलंबून असते. ज्याचे अधिक्य तशी श्रद्धा कर्मे. सात्विक श्रद्धा मोक्षाकडे नेते तेव्हा रज, तम अडथळे आणतातच असे तीन प्रकारांवर आक्रमण करून अंकुश ठेवण्याचा प्रयत्न गुण करतात. | श्रद्धा तीन प्रकारची आहे<br>सत्व – सात्विक<br>रज – राजस<br>तम – तामस |
| ६६ ते ७५ | ज्याची जशी श्रद्धा तसे त्याचे कर्म घडून मोक्षमार्गाकडे प्रवास. | |
| ७६ ते ९२ | सात्विक श्रद्धा स्वर्गमार्गी होते. ते विद्याभ्यास करतात, रजोगुणी राक्षसादि उग्र देवतांना भजतात. तमोगुणी भूतप्रेतादि शूद्र दैवतांवर विश्वास ठेवतात. म्हणून सात्विक श्रद्धेच्या मार्गाने जावे. | श्रद्धा स्वभावाने देवतांचे स्वरूप |
| ९३ ते १०४ | जे सात्विक गुणाविरुद्ध व अशास्त्रपणे वागतात ते आसुरी संपत्तिच्या आहारी जाऊन स्वतः च्या अधोगतीला कारण होतात. | |
| १०५ ते ११९ | सत्व, रज, तम तीन प्रकारच्या आहारावर स्वभाव व श्रद्धानिष्पत्ती अवलंबून असते. म्हणून सात्विकाचा अनुसार करावा. योग, भक्ति दोन्ही संप्रदायांच्या आहाराचे<br>मार्गदर्शन. | |
| १२० ते १३८ | तीन प्रकारचे आहार आपल्या प्रभावाने कर्मप्रवृत्त करतात. सात्विक आहारात माधुर्य असते. सात्विक आहाराने रोग स्पर्श करीत नाहीत. आनंदी जीवन होते. असा सात्विक आहार मन आणि शरीरास उपकारक आहे. | सात्विक आहार मोक्षदायी असतो. |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) श्री निवृत्तीनाथ हे शिवाहूनही श्रेष्ठ होत असा गौरव का केला जातो? (२) श्रद्धेचे तीन प्रकार का केले आहेत? (३) शास्त्रानुसार वर्णनाविषयी अर्जुनाने कोणत्या शंका उपस्थित केल्या आहेत? (४) श्रद्धा, गुण आणि आहार यांचा संबंध श्रीकृष्ण कसा स्पष्ट करून सांगतात?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय सतरावा : श्रद्धादिनिरुपणयोग** : भ. गी. श्लोकसंख्या २८, ओवीसंख्या ४३३ (पैकी १३९ ते २९३) (भाग दुसरा)

**बैठक क्र. १७ दि. २१/८/२०२४ व २२/८/२०२४**

श्रद्धेचे प्रकार व युक्त श्रद्धायुक्त कर्मयोगाने माणूस सफल होतो.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १३९ ते १५३ | आम्ल, खारट, तिखट, रुक्ष (कोरडे), चुरमुरु खाणे, जिभेचे लाड करीत अन्न भरती. लवंग सुंठ (मसाले), माजवण (खुराक), उत्तेजित करतात, त्यामुळे राजस स्वतःच दुःखाला कारण होतो – **राजस आहार.** | चटकदार खाण्याने दुःखाला कारण होतो. |
| १५४ ते १७० | शिळे, उष्टे, कचरट, रसाळपणाकडे दुर्लक्ष, त्याच्या तोंडाला घाण येते. टाकावू मांस खातो. अपेयपान, अखाद्य खाद्य, असे उन्मत्त करणारे अन्न घेतो. – **तामस आहार.** | अपवित्र होतो नुसता पोटभऱ्या |
| १७१ ते २०१ | आहारानुसार यज्ञ प्रकार (कर्मप्रकार) आपले स्वहित विवेकाने जाणून निरहंकार असे निरपेक्ष ते सात्विक यज्ञ होय. स्वधर्माचरण ते **सात्विक यज्ञ** हे कर्म वेदोक्त असते.<br>**राजस यज्ञ–** व्यावहारिक, अहंकारी, स्वार्थपर फलाशेने केलेले कर्म म्हणजे राजस यज्ञ होय.<br>**तामस यज्ञ–** उत्श्रृंखल, विधिनिषेध विरहित कर्म.<br>हे तीनही एकाच शरीरात वास करतात त्यांना विवेकाने वळण लागते त्यासाठी तप (अभ्यास/सवय) आवश्यक असते. तपही तीन प्रकारचे आहे. | स्वधर्म– अर्थात सात्त्विक यज्ञ<br><br>स्वस्वार्थलोलुप कर्म |
| २०२ ते २३९ | **शारीर तप–** विधिनिषेध, धर्मकर्म, तीर्थाटन, व्रतवैकल्ये, गुरुसेवा, परोपकार इ. प्रकारे स्वधर्मानुसार कर्मठपणाने, सोवळेपणे वर्तनाची सवय – शारीर तप होय.<br>**वाङ्मय तप–** वेदशास्त्रविहित वर्तन करतांनाही भाषा, शास्त्र आणि विधिनिषेध यांचा मधुर, सर्वांना सुखविणारा, सत्य, कल्याणात्मक वाङ्मयव्यवहार म्हणजे– वाङ्मय तप होय.<br>**मानस तप–** मन मुळात चंचल, ते एकाग्र करून स्वरूपाशी स्वरूप करण्याचा प्रयत्न करीत समदृष्टीने, वैराग्याने, निजबोधासाठी स्थिर करत शास्त्रविहित वर्तनाचा अभ्यास म्हणजे मानसतप होय. मात्र गुणत्रयाप्रमाणे तप आचरण प्रयत्नपूर्वक करावे. | कर्मठ स्वधर्माचरण<br><br>अध्यात्मलक्ष्यीपणे मनाला वागण्याची सवय लावणे |
| २४० ते २६५ | निरपेक्ष तपाचरण व्हावे म्हणजे सात्विकता येईल. (सात्विक गुण) धनमानाच्या आशेने स्वार्थाहंकार युक्त ते तप (राजस गुण) हे तप कधीच पूर्ण होत नाही. कारण लोभ, मोह, आशा संपत नाहीत. अहंकार, स्वार्थपरतेने विध्वंसक वृत्तीने मूर्खपणे (अविवेकाने) केलेले कर्म. हे तामसकर्म (तामसगुण) | |
| २६६ ते २९३ | तीन प्रकारचे दान– वेदशास्त्रनिती विहित स्वधर्माचरण करीत, प्राप्त झालेले सर्वकाही यथायोग्य विवेकपूर्वक, सर्वकल्याणासाठी खर्च करणे हे **सात्विक दान** होय.<br>स्वार्थसापेक्ष दानाचा देखावा करणे म्हणजे राजस दान होय. | जोडुनिया धन उत्तम व्यवहारे उदास विचारे वेच करी |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) तीन प्रकारांचे आहार कोणते? त्यामुळे तीन गुण कोणते निर्माण होतात? (२) आहारानुसार यज्ञ अर्थात कर्म कोणत्या प्रकारे घडते? (३) तपाचे प्रकार स्पष्ट करून लिहा. (४) दानाचे प्रकार स्पष्ट करा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय सतरावा : श्रद्धादिनिरुपणयोग** : भ. गी. श्लोकसंख्या २८, ओवीसंख्या ४३३ (पैकी २९४ ते ४३३) (भाग तिसरा)

**बैठक क्र. १७ दि. २८/८/२०२४ व २९/८/२०२४**

श्रद्धेचे प्रकार व युक्त श्रद्धायुक्त कर्मयोगाने माणूस सफल होतो.

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| २९४ ते ३२७ | अयोग्य वेळ, व्यक्ति आणि कारण यासाठी दिलेले दान तामस दान होय. तामसदानाने चुकून जरी चांगले झाले असे वाटले तरी अखेर परिणाम अकल्याणकारी होतो. राजस दानाने अहंकार बळावतो व फारतर स्वर्गीय सुखकारक मोठेपण प्राप्त होते तरी<br>समाधान मिळत नाही तर तामस दानाने नरकाचीच वाट निर्माण होते. म्हणून श्रद्धायुक्त अंतःकरणाने, स्वधर्मकारक सर्वकल्याणाच्या दृष्टीने केलेले दान सर्वांना मोक्षमार्गाकडे नेते. | तामस दान – नरक<br>राजस दान – असंतुष्ट स्वर्गसुख<br>सात्विक दान – मोक्षमार्ग |
| ३२८ ते ३५३ | मोक्षमार्ग ॐ तत्सत्ब्रह्म या प्रत नेतो. हे ज्ञान प्रस्तुत करून स्वधर्माचरणाचा सत्प्रवृत्त मार्ग प्रशस्त करण्यासाठी वेद, उपनिषदे, दर्शने आदींचा बडिवार माणसाने (ऋषीमुनींनी) मांडला. ॐ या एकाक्षर ब्रह्मात हा सत्वगुणाचा ठेवा साठविला आहे. त्यात आदिवर्ण अ, तत्कार स्वरूप उ, सत्कारस्वरूप म साठविला असून त्यामुळे परब्रह्म्याला ॐकार हे नाम लाभले त्यातच सत्, चिद्, आनंद साठविले आहे. त्याचे ध्यान करून केलेले कर्म सात्विक कर्म होते. हे ज्ञान ऋषींनी आपल्यास देऊनही जर आपण दुर्लक्ष केले तर अन्न पुढे असून जेवणे कळत नाही असे होईल. | श्रुतिविहित ज्ञानानुसार सत्वगुणाची जोपासना करून स्वधर्माचरणाने मोक्षमार्गी व्हावे. |
| ३५४ ते ३६८ | ब्रह्मवादिनी स्वधर्माचरण करणेच श्रेयस्कर होय म्हणून कर्मारंभी ॐकार उच्चार करून विवेकपूर्वक कर्म करावे. ब्रह्मवादिंनी ऋषींचे अनुकरण करीत वेदविहित कर्म करीत जावे. | श्रुतिंचे अनुसरण करावे. |
| ३६९ ते ३७९ | श्रुतीविहित कर्म करतांना परब्रह्म ठायीच जाणावे. म्हणजे ठायीचे कर्म ब्रह्मकर्म होईल. | अहं ब्रह्मः अस्मि हे जाणावे. |
| ३८० ते ४०५ | श्रुतिवचनाप्रमाणे तत्, सत्, ब्रह्म, स्वरूप ज्ञान हे ॐकारात साठविले आहे.<br>ओ.क्र. ३८३ प्रमाणे सर्वाभूती ब्रह्म लक्षात घेऊन समदृष्टीने वागावे म्हणजे ॐ एकाक्षरब्रह्म ब्रह्मस्वरूपाप्रत नेईल. | श्रुतिज्ञानाचा मंत्र 'ॐ' |
| ४०६ ते ४१३ | वेदाचा संदेश म्हणजे तत् सत् ब्रह्मार्पणमस्तु या ध्येयाने सर्व कर्म ब्रह्मार्पण करावे म्हणजे यज्ञ, दान, तप हे मोक्षप्रद होईल. | |
| ४१४ ते ४२३ | तत्, सत् ब्रह्म स्वरूपात 'ॐ' मंत्राद्वारा श्रद्धेनेच कर्म करावे. अश्रद्धेने केलेले कर्म विफल ठरते | अश्रद्धा वैफल्यास कारण ठरते. |
| ४२४ ते ४३३ | युद्धाच्या समयी सुद्धा अर्जुनाला स्वानंदसुख प्राप्त झाले. त्याने प्रश्न विचारल्याने ते सुख सर्वांना प्राप्त होते म्हणून अर्जुनही सद्गुरुच होय. परंतु धृतराष्ट्राला हे कळणे शक्य नाही. | श्रोतृसंवादात्मक आत्मगत संवाद |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) तामस दान म्हणजे काय? (२) तामस व राजस दान बाजूला सारून सात्विक दानाचा अवलंब करावा असे श्रीकृष्ण का म्हणतात? (३) 'ॐ' एकाक्षराचे महत्त्व व स्वरूप (श्रीकृष्णांच्या शब्दात) श्री ज्ञानेश्वरांनी कोणत्या प्रकारे विषद केले आहे? (४) ठायीचे स्वधर्माचरण ब्रह्मकर्म स्वरूप केंव्हा होईल? स्पष्ट करून लिहा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय अठरावा : सर्वगीतार्थसंग्रह योग** : भ. गी. श्लोकसंख्या ७८, ओवीसंख्या १८१० (पैकी १ ते १४४) (भाग पहिला)

**बैठक क्र. १८ दि. ६/११/२०२४ व दि. ७/११/२०२४**

वेदांचे स्वर – उपनिषदे – उपनिषदांचे सार – श्रीमद्‌भगवद् गीता – भगवद्‌गीतेची भावार्थदीपिका – श्री ज्ञानेश्वरी

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १ ते २५ | देव (निर्गुण, निराकार, निर्विकार इ. परमात्मा/आत्मरूप) या अस्तित्वाचे परोपरीने वर्णन. देव सर्वशास्ता आहे आणि आपले गुरु श्री निवृत्तीनाथ हेच देव-स्वरूप झाल्याची जाणीव वर्णनातून व्यक्त करतात. देव आणि सद्‌गुरु अद्वैतामुळे स्तुती करणे शक्य कारण त्याच सद्‌गुरुमुळे आपण सद्‌गुरुस्वरूप झालो आहोत हे श्री ज्ञानेश्वर उघड सांगतात. आत्मा/परमात्मा/सद्‌गुरु हे पूर्ण निरुपाधिक असल्यामुळे त्यांची उपाधीयुक्त स्तुती करणे सद्‌गुरुचे कमीपण ठरेल म्हणून सद्‌गुरुशी एकरूप (अद्वैत) पावलेल्या शिष्याने मौनच साधावे. | देव-गुरु-अद्वैत वर्णन करतात आत्मा आणि सद्‌गुरु एकच आहेत व निरुपाधिक (निर्गुण इ.) त्यांनी शिष्यालाही आपल्यासारखेच केले आहे. |
| २६ ते ३८ | परोपरीने विनंती करणाऱ्या ज्ञानेश्वरांना श्री निवृत्तीनाथांनी पुढे कथा आरंभ करावयास सांगितली, तेव्हा १८ व्या अध्यायाचा महिमा कळसाध्याय म्हणून वर्णन करतानाच भगवद्‌गीता ही उपनिषदांच्या आधारे धर्म, अर्थ, काम या पुरुषाचे श्रेय वर्णन करण्यासाठी व्यासांनी कळसाध्याय लिहिला. तथापि श्रीगुरु निवृत्तींच्या प्रसादाने १८ वा अध्याय मोक्ष पुरुषार्थाचे साधन करण्याचे कार्य श्री ज्ञानेश्वर करीत आहेत. | गीतेत धर्म अर्थ काम याकडे जीवनकला म्हणून प्रकाश ते ज्ञानेश्वरीत मोक्षसाधन म्हणून चर्चा |
| ३९ ते ६६ | गीतेची रचना इमारतीच्या सांगरुपकातून स्पष्ट करून १५ व्या अध्यायापर्यंत गची, सोळावा घटाकाश, सतरावा कळसाची बैठक, अठरावा कळस व व्यासप्रतिभा हा ध्वज अशी मांडली. कर्म करीत असताना पाठांतर, श्रवण आणि ज्ञानग्रहण मार्गाने गीता समजून घेण्याचा प्रयत्न करतात. या सर्वांनाच गीता मोक्षाप्रत नेते. अद्वैत हे सूत्र सदैव लक्षात ठेवून श्री ज्ञानेश्वर प्रवचन करतात व अखेर नाम माहात्म्य कथन करतात. | गीता मोक्षदायिनी आहे व ती अद्वैत साधते, केवळ ब्रह्मनाम स्मरणाने मोक्ष मिळतोच,<br>श्री निवृत्तींशी संवाद श्रोतृसंवादच आहे (सच्चिदानंदबाबा लिखित) |
| ६७ ते ८६ | नाम महिम्याने कर्म झाकोळायचे कारण नाही. मग संन्यास आणि कर्म यात भेद कसा करावा? या प्रश्नाने अठरावा अध्याय सुरू होतो. येथे श्री ज्ञानेश्वर अठरावा अध्याय हा एक अध्याय नसून एकाध्यायी गीता आहे हे स्पष्ट करतात व कर्म हे ब्रह्मनिष्ठ असावे यावर भर देतात. | १८ व्या अध्यायाचा प्रस्ताव |
| ८७ ते १४४ | संन्यास म्हणजे प्राप्त, स्वाभाविक, स्वधर्मपर अशी प्रपंचातील कर्मे सोडून मोक्षमार्गी होणे होय. स्वधर्मपर शास्त्रविहित कर्मे करून फळाची अपेक्षा न ठेवणे याला त्याग म्हणतात. प्रपंचात गुरफटलेला काम्यकर्म (म्हणजे फलसापेक्ष कर्म करतो) करतो. ही काम्यता सांडणे म्हणजे त्याग असे ज्ञानेश्वर म्हणतात.<br>श्रीकृष्ण विस्तृतपणे नित्य नैमित्तिक कर्म फल व काम्यकर्मफल या दोन्हींचे विवेचन करून संन्याशी या सर्व प्रकाराचा त्याग करून जातात. प्रापंचिकाने केवळ त्यागण्याचे धोरण ठेवले तर ना प्रपंच ना परमार्थ होतो. फले भोगावीच लागतात मात्र त्यात लिप्त न होता म्हणजे फलाची अपेक्षा न ठेवता जो जन्ममृत्यू फेऱ्यातील स्वाभाविक कर्मे जगरहाटीप्रमाणे निरपेक्षपणे करतो त्याला त्यागी असे म्हणतात.<br>विहितकर्म त्रासदायक म्हणून ते टाकून देण्याचा प्रयत्न करणारे असे काही लोक तर यज्ञ याग दान अशी कर्मे चित्त शुद्धीसाठी करावीत असे म्हणणाऱ्यांचा वर्ग याविषयी श्रीकृष्ण अधिक भाष्य करावे लागेल असे म्हणतात. | सर्व कर्मत्याग करून मुमुक्षु होणे – संन्यासी– प्रपंचात राहून नित्यनैमित्तिक कर्मे करणे म्हणजे त्याग.<br>कर्माविषयी दोन मते<br>१) त्रासदायक – त्याज्य<br>२) चित्तशुद्धीसाठी – सात्त्विक कर्म |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) देव आणि गुरू यातील अद्वैत कोणत्या प्रकारे वर्णन केले आहे? (२) श्री ज्ञानेश्वरांना सद्‌गुरुंची स्तुती का करता येईना? (३) १८ व्या अध्यायाचे माहात्म्य श्री ज्ञानेश्वरांनी कोणत्या प्रकारे कथन केले आहे? (४) गीतारचनेचे इमारत सांगरूपक स्पष्ट करून लिहा. (५) नाममाहात्म्याविषयी कोणते विचार व्यक्त झाले आहेत? (६) अठरावा अध्याय हा एकाध्यायी गीता तथा ज्ञानेश्वरी आहे असे का म्हटले स्पष्ट करा. (७) संन्यास आणि त्याग यातील भेद कसा स्पष्ट केला आहे?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय अठरावा : सर्वगीतार्थसंग्रह योग** : भ. गी. श्लोकसंख्या ७८, ओवीसंख्या १८१० (पैकी १४५ ते ३०४) (भाग दुसरा)

**बैठक क्र. १८ दि. १३/११/२०२४ व दि. १४/११/२०२४**

वेदांचे स्वर – उपनिषदे – उपनिषदांचे सार – श्रीमद्‌भगवद् गीता – भगवद्‌गीतेची भावार्थदीपिका – श्री ज्ञानेश्वरी

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १४५ ते १६५ | त्याग तीन प्रकारचा आहे. संसारबंधनातून आपली मुक्तता व्हावी असा निश्चय असावा लागतो. मुमुक्षु या बाबतीत सतत जागृत असतो. प्रापंचिकाने यज्ञ, दान, तप ही कर्मे सांडू नयेत. चित्तशुद्धी असावी. तीर्थाटन बाह्य मळ घालविते तर आत्मज्ञान मिळवावे. हा निश्चय मन शुद्धी करतो. म्हणजे प्राप्त कर्मे हातोपाती सहज होतात. अतिकर्म नैष्कर्म्याला कारणीभूत होते. मुमुक्षु कर्मबंधन मुक्त असतो. | निश्चय आणि सत्वशुद्धी हे सर्वप्रकारे निरपेक्ष कर्म करविते. |
| १६६ ते २११ | अहंकार टाकावा व फलाची आशा न धरता कर्म करावे या युक्तीने कर्म केले असता आत्मस्वरूपाचे ज्ञान होते. त्यागाचे तीन प्रकार– (१) तामस त्याग जो कर्मसफल होत नाही. आत्मक्लेषाने कर्म सोडतो तो तामस त्याग होय. (२) राजस– मन आणि शरीर यांना दुःख, क्लेश होतील म्हणून कर्मत्याग करणे हा राजस त्याग होय. (३) सात्त्विक त्याग– ज्या कर्मत्यागाने अज्ञानासह सर्व क्रिया लोप पावतात व मोक्ष मिळतो तो सात्त्विक कर्मत्याग होय. आसक्ती व फलाकांक्षा सोडून कर्तव्य म्हणून कर्म केले जाते त्याला सात्त्विक त्याग म्हणतात. | तामस, राजस, सात्त्विक असे तीन प्रकारे त्याग असतात. अहंकार टाकणे व निरपेक्ष कर्म करणे या युक्तीने कर्मे करावी. |
| २१२ ते २७७ | प्राप्त झालेली शुभाशुभ कर्म निरासक्तपणे कर्तव्यबुद्धीनी देहाचे अनिवार्य कर्म केल्या कर्मात लिप्त न होण्याचा सात्त्विक त्याग घडतो. निष्काम कर्म म्हणजेच कर्मासंबंधाने सात्त्विक त्याग. श्वासोच्छवासा प्रमाणे देह स्वभाव म्हणून कर्म करावीत. देहधारीला कर्म अनिवार्य आहे. कर्माची फळे शुभ, अशुभ किंवा शुभाशुभामिश्र अशाप्रकारे भोगावीच लागतात हा सनातन व्यवहार आहे अशा कर्मात जो देहाहंकाराने लिप्त होतो त्याला ती फळे भोगावीच लागतात. संन्यासी संपूर्ण व्यवहाराचा त्याग करून दूर जातात व ज्ञानात्मक तेव्हढाच कर्मभाग, तोही लिप्त न होता करतात. त्यामुळे त्यांना फळभोगाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. संसारी देहधारी आत्म्याच्या कारणाने कर्म घडते असे मानून कर्मभोग भोगतो. वास्तविक कर्म आणि आत्मा परस्पर विरोधी व दूर आहे. आत्मतत्त्वाचा केवळ चैतन्यप्रवाह देहाठायी असतो त्यामुळे देह अपरिहार्यपणे कर्माधीन होतो. कर्म देहाचा स्वभाव आहे आणि देहवासनेमुळे दुःख, सुख, सुखदुःख अशा त्रिविध प्रकारचे भोग अनुभवास येतात. आत्मतत्त्वाचे ज्ञान झाले की देह आणि कर्म यात देहधारी लिप्त होत नाही. त्यामुळे ज्ञानवानपणे कर्मत्याग घडतो व संसारातही संन्यास सुखाचा म्हणजे आत्मसुखाचा अनुभव येतो. याकरिता ज्ञानवानपणे कर्मत्याग अर्थात निरपेक्ष कर्मे करावीत. आत्मा हे कर्माचे कारण नसून पंचभौतिक देह पाच प्रकारे कारणीभूत होतो. | कर्म देहाचा स्वभाव देह हे कर्माचे कारण आत्मा पूर्णतः अलिप्त. भ्रामकतेने आत्माच कारणीभूत मानून लिप्तपणे कर्माची शुभ, अशुभ, शुभाशुभ फळे भोगावी लागतात. आत्म्याचे ज्ञान झाले की कर्मलिप्तता जाते व संसारातच निरपेक्ष कर्मपरता म्हणजे ज्ञानवान कर्म करते व संन्यासाचा अनुभव येतो. |
| २७८ ते ३०४ | ही पाच कारणे अर्जुनही जाणत असेल असे म्हणून श्रीकृष्णांनी स्वतः आणि अर्जुन यातील प्रेमद्वैताविषयी संभाषण सुरू केले हे ऐकताना अर्जुनाची भावसमाधी लागली. त्यास भानावर आणून ज्ञान चर्चेसाठी मी आणि तू असे भाषण आवश्यक असते हे सांगून पुन्हा आत्मतत्त्वाचा कर्माशी कोणताही संबंध नसतो तर कर्माची कारणे देहाधीन असतात हे सांख्यदर्शनाची आठवण करून स्पष्ट केले.<br>अ. २ मध्ये– २५ विश्वनिर्मितीची कारणे. अ. १३ मध्ये २५ + ११ अशा ३६ गुणांचा संघात दिला आहे. यातील ३६ + १ परमात्मा व १३ व्यात व १४ व्यात पुन्हा पंचमहाभूते वगळून २० + तीन गुण व युग = २४ + १ परमात्मा = २५. पुरुष, प्रकृती, बुद्धी/अहंकार मन वासना = ५ + पंच ज्ञानेंद्रिये + पंचकर्मेंद्रिये + पंच तनमात्रा + सत्व, रज, तम + युग = २४ असे २४ तत्त्वांचे देह हे कुटुंब घर आहे यावर लक्ष केंद्रित केले आहे. | सांख्य दर्शनाने पंचीकरणातून – कर्म – कारणे स्पष्ट केली आहेत. त्यात संभाषण करताना प्रेमाद्वैताच्या जाणिवेत श्रीकृष्णार्जुन बुडून गेले. अर्जुनाचे ठिकाणी अष्टसात्त्विक भाव दाटले. |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) त्याग तीन प्रकारचा आहे हे श्रीकृष्णांनी अर्जुनाला कोणत्या प्रकारे समजावून दिले? (२) आत्मतत्त्वाचे जीवदशेतील अस्तित्व कोणत्या प्रकारचे असते? स्पष्ट करा. (३) सांख्य वेदान्ताची आठवण अर्जुनास का करून द्यावी लागली? (४) कृष्णार्जुन प्रेमाद्वैताचे स्वरूप स्पष्ट करा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय अठरावा : सर्वगीतार्थसंग्रह योग** : भ. गी. श्लोकसंख्या ७८, ओवीसंख्या १८१० (पैकी ३०५ ते ४६०) (भाग तिसरा)

**बैठक क्र. १८ दि. २१/११/२०२४ व दि. २२/११/२०२४**

वेदांचे स्वर – उपनिषदे – उपनिषदांचे सार – श्रीमद्भगवद् गीता – भगवद्गीतेची भावार्थदीपिका – श्री ज्ञानेश्वरी

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| ३०५ ते ३५३ | कर्माच्या पासून आत्मतत्त्व पूर्ण उदासीन असते. ते निमित्तकारण, कारण किंवा उपादान कारणही नसते. कर्माची पाच कारणे पृथकपणे समजावून घ्यावी लागतात.<br>कर्माची पाच कारणे (१) देह (अधिष्ठान) (२) कर्ता (शरीरातले चैतन्य हे आत्मतत्त्वाचे प्रतिबिंब असते) कर्त्याला चैतन्याचे प्रतिबिंब म्हणतात. यालाच जीव म्हणतात. (३) ज्ञानेंद्रिये (४) वायुशक्ती = प्राण (५) दशेंद्रियात असलेल्या देवता-सूर्य इ. | देह, कर्ता, ज्ञानेंद्रिये, प्राण आणि इंद्रियांच्या ठिकाणीच्या देवता ही कर्माची पाच कारणे होत. |
| ३५४ ते ३७५ | मन कर्माचा संकल्प करते. वाणी त्याचा उच्चार करते. इंद्रियसंघात कर्म करू लागतो असा देह कर्माचा कर्ता होतो. देह मनाच्या हेतुने कर्म करतो. मन + देह = कर्म = देहच कर्माचे कारण. या कर्माला बावन्नवर्णमयी वाणी (सांस्कृतिक) आकार देते. ते कर्म स्वैरपणे घडते. शास्त्रामुळे त्याला विहिततेची जोड मिळते. | मन + वाणी + इंद्रिये = देह हा कर्म कर्ता. |
| ३७६ ते ४०२ | पंच कारणे हेच पांच हेतु असून त्यांपासून कर्म घडते म्हणजे देहाच्या ठिकाणी देहाकडून देहामुळे कर्म घडते. त्यात केवळ चैतन्याचा संचार स्पर्श असतो किंवा देहाच्या अस्तित्वामुळे चैतन्याचा संचार असल्यासारखे वाटते. त्यात वास्तविक आत्मतत्त्वाचा संबंध नसतो.<br>आत्मतत्त्वाला कर्माचे कारण मानणे म्हणजे मूर्खपणा होय. आत्मतत्त्व देहात स्वसंवेद्य स्वभावाने संचारित असते. त्याचा उपयोग देह व वाणी कर्माच्या ठिकाणी करतात. शास्त्र न जाणणारे व सद्गुरुंकडून ज्ञान न घेणारे देहालाच आत्मा असे समजून आत्मा हेच कर्माचे कारण, हेतु व कारक आहे असे मानतात. हे घुबडाने दिवसा डोळे मिटून आत्ता रात्र आहे असे म्हणण्यासारखे आहे. सद्गुरुकृपेने ज्ञानवान झालेले मुमुक्षु देहधारक असूनही आत्मतत्त्वाप्रमाणे कर्मापासून तटस्थ असतात. संन्याशी असतात. | आत्मतत्त्व कर्मापासून पूर्णतः तटस्थ असते. |
| ४०३ ते ४६० | मुमुक्षु किंवा संन्याशी अन्य माणसांप्रमाणेच जीवदशा (अविद्येतील – मायेतील जन्म मृत्यू फेरा) भोगित असतो त्याला सद्गुरुने शक्तिपातपूर्वक 'तत्त्वमसि' असा बोध घडविला त्यामुळे त्याच्याभोवती असलेला मायेचा विळखा नाहिसा झाला. त्याच्या चराचर वस्तुमात्रात आपणच (आत्मतत्त्व) आहोत असे आपलेच रूप दिसू लागते.<br>आत्मस्वरूपता आल्याने तो विदेही होतो. त्यामुळे त्याचा कर्माशी कोणताही संबंध राहात नाही. देह हेच कर्माचे कारण हेतु व कर्ता अशी त्रिपुटी असते. 'अहं ब्रह्म' या स्थितीत स्वरूप स्थितीमध्ये समाधीमग्न पुरुष देहस्थितीला जाणत नाही. तो व्यवहारात देहाने वावरत असताना देहाकडून कर्मे घडतच राहतात मात्र तो स्वरूप स्थितीतील मुमुक्षु त्यात दुरान्वयानेही लिप्त नसतो. त्याच्यासाठी केवळ आत्मतत्त्व हेच कर्म, कर्ता, कर्महेतु, कार्य इ. सारे काही असते. देहाशी त्याचा सूतराम संबंध नसतो हे अनेक उदाहरणात माऊली पटवून देतात. त्यामुळे जो केवळ आत्मतत्त्वच झाला आहे तो कर्माच्या बंदिशाळेत राहातच नाही. | तत्त्वमसि बोध होताच तो समदृष्टीने पाहू लागतो.<br>स्वस्वरूप झालेल्या स्थितीला – देहभाव नसतो म्हणून कर्मभावही नसतो.<br>तो सर्वस्वी स्वसंवेद्य आत्मरूपच असतो. |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) कर्माची पाच कारणे स्पष्ट करून लिहा. (२) कर्म प्रक्रिया कशी घडते स्पष्ट करा. (३) कर्माची त्रिपुटी केवळ देहाच्या ठिकाणी असते असे का म्हटले आहे? (४) मुमुक्षुची तत्त्वमसि स्थिती कोण घडविते? कशी? त्याचा परिणाम काय घडतो? (५) आत्मस्वरूप झालेल्या स्थितीत विदेहीपणाचा अनुभव मुमुक्षुला व जगताला कोणत्या भिन्नप्रकारे घडतो?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय अठरावा : सर्वगीतार्थसंग्रह योग** : भ. गी. श्लोकसंख्या ७८, ओवीसंख्या १८१० (पैकी ४६१ ते ६१०) (भाग चौथा)

**बैठक क्र. १८ दि. २७/११/२०२४ व दि. २८/११/२०२४**

वेदांचे स्वर – उपनिषदे – उपनिषदांचे सार – श्रीमद्‌भगवद् गीता – भगवद्‌गीतेची भावार्थदीपिका – श्री ज्ञानेश्वरी

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| ४६१ ते ५१६ | ज्ञान, ज्ञेय आणि ज्ञाता हे जगाचे कारण आहे. (इशा–उपनिषद) ज्ञान म्हणजे जाणिवेत येणारी अवस्था – ज्ञेय म्हणजे ज्याचे ज्ञान होते ती वस्तु ज्ञाता ज्याच्या ठिकाणी ज्ञान होते ती व्यक्ती. ही प्रवृत्ती होय. ही प्रवृत्ती मनाच्या योगाने होते. यासाठी अनेक दृष्टांत दिले आहेत. जीव हा ज्ञाता, जाणीव हे ज्ञान, विषय हे ज्ञेय. ज्ञान प्रक्रिया घडतांना १) ज्ञेय २) ज्ञान ३) ज्ञाता असा क्रम होतो. ज्ञेय–शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यानी अनुभूत होऊ लागते. ज्ञेय हा विषय असतो. ते अनुभवताना प्रिय अप्रिय ठरते त्यानुसार कर्म घडते. म्हणून ही त्रिपुटी सर्व कर्माचा प्रारंभ आहे. ज्ञाता हाच कर्माचा कर्ता होतो, ज्ञेय हेच कार्य होते. अंतःकरण चतुष्ट्य– बुद्धी, मन, चित्त, अहंकार व ज्ञानेंद्रिये यांच्या योगाने कर्म घडते. त्यामुळे कर्ता, करण व कार्य हा कर्मसंचय आहे. कर्ता– ज्याच्याकडून कार्य घडते तो देह. करण–कारणीभूत होणारा विषय यालाच ज्ञेय–कार्य कर्ता करण यांच्या अनुबंधाने घडते. | ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय ह्या त्रिपुटीने कर्मारंभ होतो आणि<br>कर्ता, कर्म व करण या कर्मसंचयात ज्ञानानुसार कार्य घडते. |
| ५१७ ते ५८५ | सांख्य योगाप्रमाणे ज्ञान, कर्म आणि कर्ता हे सत्व, रज, तम या तीन प्रकारे असतात. मोहाच्या राशींची २४ तत्त्वांच्या नावाने सांख्यांनी मोजणी केली आहे. (पुरुष + बुद्धी – अहंकार + मन + वासना + प्रकृती = ५) + (पंचज्ञानेंद्रिये + पंच कर्मेंद्रिये + पंचतनमात्रा = १५) = २० + तीन गुण + युग = २४. सात्त्विक गुण – सर्वांभूती परमेश्वर अशी समदृष्टी निर्माण झाल्याने बुद्धि–अहंकार नाहीसा होऊन कर्म, कर्ता, कार्य हे निरासक्त अनुभूत होते. तो सात्त्विक गुण. हाच मोक्षाप्रत नेतो. राजसगुण – भेदकारक बोध घडवितो. विश्वातील प्रत्येक उपाधी (वस्तू, जीवमात्र) भिन्न मानून उपभोगात्मक विचार करतो तो राजस गुण होय. तामस गुण – अशास्त्रीय बोध म्हणजे तामसगुण. कोणताही पदार्थ निषिद्ध न मानता त्याचा उपभोग घेत वासना भोगतो. केवळ वासना तृप्ति एव्हढेच जाणतो. नास्तिक असतो. निरर्थक बोधाने जगतो. या तीन गुणांनुसार कर्त्याच्या क्रिया उघड दिसतात. | सत्व, रज, तम या त्रिगुणात्मक बोधभेदानुसार देहाकडून वर्तन घडते. |
| ५८६ ते ५९४ | आसक्तिरहित निरपेक्ष विहीत कर्म म्हणजे सात्त्विक कर्म होय. जन्मास आल्यानंतर सारणी, स्थल, काल आणि परिस्थितीनुसार वाट्यास आलेले कर्म निरपेक्ष व कर्तव्यबुद्धीने स्वधर्मपालन म्हणून करणे याला सात्त्विक कर्म म्हणतात. | स्वधर्मपालन म्हणजे सात्त्विक कर्म |
| ५९५ ते ६१० | वासनेनुसार फलाच्छेने हवे तेव्हढे श्रम घेऊन काम करून फळ मिळवत राहाणे व तरी असंतुष्टच असणे हे राजस कर्म होय. | क्लेश सोसूनही काम्यकर्म करणे हे राजस कर्म होय. |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) कर्मारंभाची त्रिपुटी कोणती? त्यातून कर्मसंचय कसा घडतो? (२) सांख्य योगाप्रमाणे त्रिगुणात्मकबोध देहाचे ठिकाणी कोणत्या प्रकारे घडतो? (३) २४ गुणांचा उल्लेख सांख्याधारे कसा केला जातो. (४) सात्त्विक कर्माचे वर्णन करा. (५) राजस कर्म कोणत्या प्रकारे घडते?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय अठरावा : सर्वगीतार्थसंग्रह योग** : भ. गी. श्लोकसंख्या ७८, ओवीसंख्या १८१० (पैकी ६११ ते ७७१) (भाग पाचवा)

**बैठक क्र. १८ दि. ४/१२/२०२४ व दि. ५/१२/२०२४**

वेदांचे स्वर – उपनिषदे – उपनिषदांचे सार – श्रीमद्‌भगवद् गीता – भगवद्‌गीतेची भावार्थदीपिका – श्री ज्ञानेश्वरी

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| ६११ ते ६३० | विहित कर्मा संबंधाने निषिद्ध कर्म म्हणजे तामस कर्म होय. काम्यवासनेच्या अट्टाहासाने केलेले कर्म कर्त्याचा नाश झाला तरी सफल होत नाही. हे तामस कर्म दुसऱ्याला क्लेश देण्यातच आनंद मानते. तो सर्वांच्या नाशास कारणीभूत होणारे कर्म करतो. असे कर्म तामस कर्म होय. त्रिगुणांच्या गुणस्वरूपानुसार एकच कर्ता तीन प्रकाराने अनुभवास येतो. | करू नये ते कर्म अट्टाहासाने करणे म्हणजे तामस कर्म होय. |
| ६३१ ते ६६२ | १) सात्त्विक अवस्था– विषयसुख निरपेक्षता, देहवासना हरपतात, आणि प्राप्त कर्माचा केवळ आनंद अनुभवास येतो तेव्हा ती सात्त्विक अवस्था असते. अशा अवस्थेतील कर्त्याला सात्त्विक कर्ता म्हणतात. निरासक्त मनाने स्वधर्माचरण करणाऱ्या समदृष्टीच्या कर्त्यास सात्त्विक कर्ता असे म्हणतात.<br>२) राजस अवस्था– विषयासक्त, कर्मफलेच्छू, लोभी, परपीडक, अपवित्र व हर्षशोकयुक्त अशा कर्त्याला राजसकर्ता म्हणतात. स्वार्थीपणाने कर्म करताना इतरांची पर्वा न करणे अशी मानसिक अवस्था म्हणजे राजस अवस्था. अंतरबाह्य स्वार्थाने बरबटलेला असतो. लाभाने हर्षित होतो तर नुकसानाने शोकाकुल होतो. शुद्धतेची काळजी करत नाही. | निरपेक्ष समदृष्टीने स्वधर्माचरण करणे = सात्त्विक |
| ६६३ ते ६८९ | ३) तामस अवस्था– संस्कारहीन, विधिनिषेधविहीन, अहंकारी, कपटी दुसऱ्याचे चांगले बघवत नाही असा आळशी, असंतुष्ट दीर्घसूत्री (काम सतत पुढे ढकलणारा) अशी मानसिकता म्हणजे तामस अवस्था होय. असा कर्ता तामस कर्ता होय. ही गोष्ट संत ज्ञानेश्वरांनी पंधरावर दृष्टांत देऊन तामसकर्ता पापाचा पुतळा कसा असतो हे सांगितले आहे. | पापी कृत्ये करण्याची मनःस्थिती पापाचा पुतळा |
| ६९० ते ७१७<br><br>व<br><br>७१८ ते ७२३<br><br>७२४ ते ७३२<br><br>७३३ ते ७७१ | **त्रिधाबुद्धी त्रिधा धैर्य–** सत्व, रज, तम गुणांनी बुद्धि व धृती (धैर्य) यांचे तीन प्रकार होतात.<br>**सात्त्विक बुद्धी–** कार्याकार्यविवेक पाहून प्राप्त विहीतकर्म जी बुद्धी निवृत्तीपरतेने करते (निरासक्तपणे–निष्कामपणे) करते ती सात्त्विक बुद्धी होय.<br>**राजस बुद्धी–** जी बुद्धी धर्म–अधर्म रूप कृत्ये–अकृत्ये यांची निवड न करता सरसकट वासनानुरुप आचरण करत जाते ती राजस बुद्धी होय.<br>**तामस बुद्धी–** शास्त्रसंमतच असत्य वाटते. कल्याणप्रद गोष्टी अनर्थकारक वाटतात, गुण तेच दोष वाटू लागतात, असे श्रुती विरहित विचार करणारी बुद्धी ही तामस बुद्धी होय.<br>धृती ही गुणांच्या विभागाने तीन प्रकारची होते. (धृती–धैर्य)<br>**सात्त्विक–** समाधीसाधनेचे धैर्य. अशा धैर्यात मन, प्राण, इंद्रिये व्यवहार बंद करतात. अशा धृतीला सात्त्विक धृती म्हणतात. (आत्मसंयम योग–प्रमाणे)<br>**राजस धैर्य–** देहाहंकाराने धर्म, अर्थ, काम या तीहीत स्वर्ग व संसार साधण्याचा प्रयत्न करतो व सापेक्ष कर्म करतो ते धैर्य राजस धैर्य होय.<br>**तामस धैर्य–** निद्रा, भय, शोक, विषाद, विषयवासना तथा मद हे पाच तमाचे दोष ज्या धैर्याने धारण केले आहेत व त्यासह तो सतत काम्यकर्म करीत राहतो अशा बुद्धीला तामस बुद्धी असे म्हणतात.<br>बुद्धी धैर्याच्या योगाने कार्य सिद्धी करते. | |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) तामसकर्म कोणत्या प्रकारे घडते? (२) त्रिगुणांमुळे कोणत्या प्रकारच्या अवस्था कर्त्याच्या ठायी निर्माण होतात? (३) बुद्धी आणि धैर्य (धृती) यांचेही तीन प्रकार का जाणवतात? स्पष्ट करा. (४) त्रिगुणांमुळे कर्मांवर कोणता परिणाम होतो ते सोदाहरण स्पष्ट करा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय अठरावा : सर्वगीतार्थसंग्रह योग** : भ. गी. श्लोकसंख्या ७८, ओवीसंख्या १८१० (पैकी ७७२ ते ९१३) (भाग सहावा)

**बैठक क्र. १८ दि. ११/१२/२०२४ व दि. १२/१२/२०२४**

वेदांचे स्वर – उपनिषदे – उपनिषदांचे सार – श्रीमद्‌भगवद् गीता – भगवद्‌गीतेची भावार्थदीपिका – श्री ज्ञानेश्वरी

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| ७७२ ते ८१७ | आत्म्याच्या दर्शनाने जीवाला आनंद होतो ते सुख होय. आत्मा + जीव = सुखलाभ परंतु त्रिगुणामुळे हा सुखलाभ तीन प्रकारे होतो.<br>**सात्त्विक सुख –** वैराग्यामुळे अविद्येचा नाश होऊन समदृष्टी प्राप्त होते व त्यामुळे सात्त्विक धैर्य प्रकट होऊन आत्मानुभवाचा आनंद मिळतो ते सात्त्विक सुख होय.<br>**राजस सुख–** विषय इंद्रिये यांच्या संयोगाने जे सुख जीवाला सुखावते ते परिणामी दुःखदायक होते. हे वाटलेले सुख स्वप्नवत नाहिसे होते. इहलोकीचे सुख परिणामी दुःखच देते. असे वरवर सुख वाटते ते राजस सुख होय.<br>**तामस सुख–** आरंभी आणि शेवटी चित्ताला मोह पाडणारे निद्रा, आळस, प्रमाद (अनैतिक वर्तन) यांपासून उत्पन्न झालेले सुख (आनंद) हे तामस सुख होय.<br>त्रिगुणात्मकतेचा परिणाम सर्व जीवसृष्टीवर होतोच. चार वर्णात विभागलेल्या मनुष्यमात्राच्या ठिकाणी कर्मसंबंधी त्रिगुणात्मक लीला असतेच. त्रिगुण देहधारकांना अनिवार्य होय. तीन देव, तीन लोक झाले एवढा परिणाम. | सात्त्विक सुख – शाश्वत सुख<br>राजस सुख हे क्षणभंगुर सुख<br>तामस सुख – कायम दुःखकारक सुख. |
| ८१८ ते ८७९ | प्रकृतीच्या गुणांनी (सत्व, रज, तम) चार वर्णांत कर्माचा विस्तार केला. ब्राह्मणांच्या ठिकाणी कमीअधिक गुणांनी ब्राह्मण व क्षत्रीय निर्माण झाले तसेच रज + सत्व यामुळे वैश्य निर्माण झाले आणि रज + तम मिश्रणाने शुद्र निर्माण झाले. प्रत्येकाच्या ठायी गुण एकरूप असल्याने चार वर्ण निर्माण झाले. ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य यांच्याशी सेवाकार्याने शूद्र जोडले गेले त्यामुळे श्रुतींनी त्यांचाही स्वीकार केला. बुद्धी + आत्मा = आत्मशांती = **शम**[१], इंद्रियांना स्वधर्माने चालवणारा तो **दम**[२], ईश्वर चिंतन सतत करणे = **तप**[३], शौच दोन प्रकार– अंतर, बाह्य – शुद्ध मनाने सत्कर्म करणे **शौच**[४] होय. **क्षमा**[५], सरलवर्तन अर्थात **आर्जव**[६], शास्त्र **ज्ञान**[७], ध्यानाच्या बळाने ईश्वर तत्त्वाशी एकरूप होणे असे **विज्ञान**[८] (योग), **अस्तिक्य**[९] – वेदविहित कर्मे करणे अशा **नव गुणांनी आचरण करणारा तो ब्राह्मण वर्ण**<br>**शौर्य[१], प्रगल्भ[२] तेजस्विता धीर[३] (धृती), नित्य दक्षत्व[४], झुंजारपणा, शत्रुला सामोरे[५] असणे** (पळपुटेपणा नसणे), **उदारतायुक्त[६], दान, ईश्वर [७] (निष्ठा)** अशा सात गुणांनी युक्त पवित्र कर्मे करणारा तो क्षत्रीय वर्ण होय. याने तो पृथ्वीपति ठरतो. | स्त्रीशुद्रांना श्रुतींचा अधिकार असल्याचे ज्ञानेश्वरांनी स्पष्ट केले. |
| ८८० ते ८८४<br><br>८८५ ते ९१३ | कृषी, गोरक्ष, व्यापार हे तीन स्वभावधर्म वैश्यांचे होत. ब्राह्मण, क्षत्रीय व वैश्य या तीन वर्णांना द्विज (दोन जन्म घेणारे, मौंजीबंधन होऊन गुरुगृही जाणे. १ ला जन्म आईपासून २ रा जन्म गुरुपासून) या तीनही द्विजवृत्तींची सेवा करणे हा शूद्रांचा स्वभावधर्म होय. याप्रमाणे स्वभावधर्म अर्थात विहीत कर्म पालन करणाराला सिद्धी (मोक्षप्राप्ती) होते. शास्त्रानुसार स्वधर्म ओळखून आचरण करावे. हे तत्परतेने निष्कामतेने करणे आवश्यक असते तर वैराग्य प्राप्त होऊन मोक्षाप्रत जाता येते. वैराग्यामुळे आत्मज्ञान होते. विहित कर्म हा आत्महित साधण्याचा सुखाचा मार्ग होय. | निष्काम कर्मानेच मोक्षाप्रत जाता येते |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) गुणांमुळे सुखाचे किती, कोणते प्रकार होतात? (२) वर्णव्यवस्थेत स्वभावधर्म कसे विभागले आहेत? (३) विहीत कर्म म्हणजे काय ते स्पष्ट करा. मोक्षाप्रत जाण्यासाठी विहीत कर्म करताना कोणती अट पाळावी लागते? (४) चातुर्वर्ण्य व्यवस्थेत सर्वांना मोक्षाप्रत जाण्यासाठी कोणता एकच मार्ग सुचविला आहे? स्पष्ट करा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय अठरावा : सर्वगीतार्थसंग्रह योग** : भ. गी. श्लोकसंख्या ७८, ओवीसंख्या १८१० (पैकी ९१४ ते १०४९) (भाग सातवा)

**बैठक क्र. १८ दि. १८/१२/२०२४ व दि. १९/१२/२०२४**

वेदांचे स्वर – उपनिषदे – उपनिषदांचे सार – श्रीमद्‌भगवद् गीता – भगवद्‌गीतेची भावार्थदीपिका – श्री ज्ञानेश्वरी

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| ९१४ ते ९५५ | परमात्म्यापासून निर्माण झालेल्या भूतमात्रांनी विहीत कर्म करणे म्हणजेच परमेश्वराची सेवा होय. विहित कर्म अहंकाररहीततेने निष्काम कर्म केल्याने ठायी वैराग्यप्राप्ती होते. म्हणून मोक्षाची इच्छा करणारांनी स्वधर्माचे पालन करावे. शास्त्राने सांगितलेले विहित कर्म (स्वधर्म) आचरणाने संसाराचे बंधन तुटते. स्वधर्म कष्टप्रद असला तरी त्याचे आचरण श्रेयस्कर होय. प्राप्त जीवनशैलीनुसार (स्थल, काल, परिस्थिती) जे कर्म स्वभावतः वाट्याला आले तेच स्वधर्माचरण करावे. इतरांशी तुलना करू नये. स्वाभाविक लाभलेले कर्म सोडून वरवर पाहता इतर कर्म सोपे वाटले तरी ते नंतर भ्रामक ठरते. म्हणून विहित कर्म टाकू नये. स्वधर्माने जन्ममरणाचे श्रम नाहिसे करून मोक्षप्राप्ती होते. म्हणून स्वधर्माचरणाचा त्याग करू नये. स्वधर्म निष्कामपणे करतांना रज व तम आपसुकच नाहिसे होतात व संसिद्धी म्हणजे वैराग्य प्राप्त होऊन आनंदप्रदता प्राप्त होते. | स्वधर्माचरण सर्वार्थाने श्रेयस्कर अर्थात शाश्वत आनंद देणारे होय. |
| ९५६ ते १०१० | निरासक्त, जितेंद्रिय, निस्पृह व्यक्ती संन्यास योगाने ज्ञानी होते (सिद्ध होते). जी व्यक्ती वरील प्रकारे जीवन व्यतीत करू लागते अशा व्यक्तीला श्रीगुरुची आपोआपच प्राप्ती होते. श्रीगुरु व्यक्तीचा देहाहंकार नाहिसा करतात. गुरुकृपेने जिज्ञासूला ज्ञान प्राप्ती होते. त्याला जगत भ्रामक वाटू लागते आणि अंतरआत्म्याचे स्वरूप उमगते. (स्वस्वरूप उमगते) यामुळे नैष्कर्म्य सिद्धी प्राप्त होते. ही सिद्धी म्हणजे सर्वश्रेष्ठ आत्मसिद्धी होय. (परमेश्वरस्वरूपात – अद्वैत प्राप्ती होते.) गुरुकृपेमुळे द्वैत नाहिसे होऊन वृत्ती आत्मस्वरूपी स्थिर होते. गुरु महावाक्य बोध करतात (अहं ब्रह्मः अस्मि, तत् त्वम् असि । इ.) अशा पुरुषाला जगतातील व्यवहारकर्म उरत नाही. गुरुपदेशापर्यंत व्यक्तीला रज, तमावर मात करून सत्वशीलतेने वागण्याचा अभ्यास करावा लागतो तेव्हा गुरुकृपा होते. गुरुकृपेने सुद्धा देहभावावर मात करीत अर्थात आत्मसंयमनाने तप करावे लागते तेव्हा ब्रह्मस्वरूप ठायी दृढ होण्याची प्रक्रिया घडते. कठोर वैराग्य आणि विवेकपूर्ण संयम या तपाने आत्मस्वरूपाचा ठेवा प्राप्त होतो. म्हणजे योग्यता सिद्ध झाल्यावर आत्मसिद्धी प्राप्त होते. | आत्मसंयम योगाने श्री गुरुकृपेने रज, तमावर मात करून संन्यासी वृत्तीने तपाचरण केल्याने आत्मसिद्धीपर्यंत पोचता येते. |
| १०१० ते १०२१ | बुद्धी, ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये यांची ऐहिक जीवनातील रजतमात्मक वासनांपासून संयम व विवेकाने शुद्धी करावी व वृत्ती, चित्त आत्मसंयमयोगाकडे लावावे. हे भोवतालच्या जगतात इष्टानिष्ट भोगांमुळे कठीण असते. म्हणून साधनेसाठी वननिवास स्वीकारावा. ही साधना गुरुकृपेच्या सहाय्याने करावी. ही ब्रह्मस्वरूप होण्यासाठीची आरंभीची प्रक्रिया होय. | आत्मसंयमनाचा अभ्यास करावा. |
| १०२२ ते १०४९ | एकांतवास, मितहार, वाणी, शरीर व मन यांचे नियमन, वैराग्यपूर्ण अशा स्थितीत ध्यानधारणा व योग याविषयी तत्पर-एकाग्र असावे. गुरुआज्ञेप्रमाणे तप करावे. | समाधी साधना करावी |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) स्वधमर्माचरणाविषयी कोणते समुपदेशन केले आहे? (२) सद्‌गुरुची आवश्यकता आत्मसंयम योग सिद्धीसाठी का निवेदिली आहे? (३) आत्मसंयमन योगासाठी कोणता अभ्यास करावयास सांगितला आहे? (४) ब्रह्मस्वरूप होण्यासाठी कोणत्या प्रकारची सिद्धता आवश्यक असते? स्पष्ट करा.

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय अठरावा : सर्वगीतार्थसंग्रह योग** : भ. गी. श्लोकसंख्या ७८, ओवीसंख्या १८१० (पैकी १०५० ते १२०३) (भाग आठवा)

**बैठक क्र. १८ दि. २५/१२/२०२४ व दि. २६/१२/२०२४**

वेदांचे स्वर – उपनिषदे – उपनिषदांचे सार – श्रीमद्भगवद् गीता – भगवद्गीतेची भावार्थदीपिका – श्री ज्ञानेश्वरी

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १०५० ते १०९० | ब्रह्मस्वरूप होण्यासाठी अंगी पात्रता निर्माण करावी लागते. अहंकार, बल, गर्व, इच्छा, परिग्रह, ममत्व यांचा त्याग करून ब्रह्मसन्मुख व्हावे लागते असा निग्रह लागतो. (१) देहाहंकाराने पुनर्जन्म फेऱ्यात सापडतो. तो अहंकार भोग भोगण्यात गुंतवतो तो टाकणे आवश्यक. (२) वासना पूर्तीसाठी बल अहंकार निर्माण होतो. त्याला प्रिय विषयच आवडतो, सन्मार्ग विसरून अधर्माच्या वाटेला जातो ते बल त्याग करून सन्मार्गी लावावे. (३) गर्वाने भरलेला माणूस दहशत माजवतो व कामतृप्तीकडे जातो. तो गर्व नाहिसा करावा लागतो. (४) इच्छापूर्ती अर्थात काम भोगू तेव्हढे अधिक हवेसे वाटते व इच्छापूर्तीसाठी क्रोधवश होतो म्हणून काम अर्थात इच्छा याचा त्याग केला पाहिजे. (५) क्रोध आपोआपच कामत्यागाने नाहिसा होतो. (६) म्हणून देहाहंकारामुळे निर्माण दोष निर्ममत्वामुळे म्हणजे आसक्ती रहिततेमुळे नाहीसे होतात व तो ब्रह्मस्वरूप स्थितीला योग्य होतो. (७) परिग्रह हा दोष माणसाला देहाहंकारात अडकवतो. निर्ममत्वाच्या सहाय्याने परिग्रहापासून मुक्तता मिळविता येते. असे सिद्ध झाले तरच ज्ञानाचे सार्वभौम राज्य प्राप्त होते. त्याला रिद्धी सिद्धी प्राप्त होतात व त्याला ब्रह्मस्वरूप होण्याची अवस्ता प्राप्त होते. द्वैत नाहिसे होते. शांती प्राप्त होऊन तो ब्रह्मस्वरूप होतो. | षड्रिपुंचा नाश करून निरासक्तीच्या तपाने ब्रह्मस्वरूप होण्याची अवस्था प्राप्त होते. |
| १०९१ ते ११२९ | ब्रह्मभाव योग्यता पावलेला माणूस आत्मवेधाच्या सिंहासनावर आरूढ होतो. सुखदुःख, आपपर, सानमोठे काही राहात नाही. समदृष्टीने तो पाहू लागतो. त्याच्या ठिकाणी अद्वैत सिद्धी अर्थात चौथी भक्ती प्रकट झालेली असते. आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी या भक्तीच्या अवस्था त्याचे ठायी न येता स्वरूपभक्ति अर्थात सायुज्यमुक्ती अर्थात ब्रह्मरुपता त्यास अनुभवास येते तो देही विदेही होऊन ही पूर्ण ब्रह्मस्वरूप अवस्था भोगतो. भ्रामकता, द्वैत सारे हरपते. | ब्रह्मस्वरूप पावलेला माणूस समदृष्टीने सर्वाठायी ब्रह्म अर्थात स्वतःला अनुभवतो. |
| ११३० ते १२०३ | ज्ञानभक्तीच्या योगाने भक्त परमेश्वराशी समरस होतो (स्वरूप होतो) ज्ञानभक्ति सर्वोत्तम असून भक्त व भज्य (परमात्मा) अद्वैत होतात हे सातव्या अध्यायात सांगितले आहे. (ज्ञानी माणसाचा आत्मा = परमात्म्याचा आत्मा = ज्ञान परमात्मा ज्ञानस्वरूपच आहे – पूर्णाद्वैत) या पूर्णाद्वैत अवस्थेचे वर्णन करताना श्री ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेला अनावरता आली. एकप्रकारे 'तत् त्वम् असि', 'अहं ब्रह्मा अस्मि' या महावाक्यांची प्रतिती ज्ञानी भोगतो. म्हणजे परब्रह्मस्वरूप होऊनच त्याचे वर्तन घडते. या भक्तीला ज्ञानी लोक स्वसंविति तर शैव शक्ती म्हणतात (अमृतानुभव अनुभूती) परंतु भागवत (आम्ही–वैष्णव) या स्थितीला परमभक्ती असे म्हणतात. ही अवस्था भागवताच्या निमित्ताने भगवान विष्णूंनी ब्रह्मदेवास कथन केली. | ज्ञानभक्तीची अवस्था पूर्णाद्वैत भक्ती |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) ब्रह्मस्वरूप होण्याची अवस्था केव्हा व कशी प्राप्त होते? (२) ब्रह्मस्वरूप माणूस कोणत्या दृष्टीने कर्म करू लागतो? (३) ज्ञानभक्तीला सर्वश्रेष्ठ भक्ती का म्हटले आहे? (४) ज्ञानभक्तीने अद्वैत स्थिती प्राप्त झाल्यावर त्या विभूतींचे वर्तन कोणत्या प्रकारे वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय अठरावा : सर्वगीतार्थसंग्रह योग** : भ. गी. श्लोकसंख्या ७८, ओवीसंख्या १८१० (पैकी १२०४ ते १३५२) (भाग नववा)

**बैठक क्र. १८ दि. १/१/२०२५ व दि. २/१/२०२५**

वेदांचे स्वर – उपनिषदे – उपनिषदांचे सार – श्रीमद्भगवद् गीता – भगवद्गीतेची भावार्थदीपिका – श्री ज्ञानेश्वरी

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १२०४ ते १२४५ | गीतेत सांगितलेल्या सर्व उपायांनी मोक्षच मिळतो हे स्वयंसिद्ध आहे. इतर शास्त्रांनी प्रमाणांनी ते सिद्ध करता येत नाही. गीतेव्यतिरिक्त अन्य शास्त्रे स्वतंत्रपणे आत्मबोध करीत नाहीत. ज्यांना अद्वैताचे ज्ञान झाले ते आपणच ईश्वर (ब्रह्म) आहोत याचा अनुभव घेतात. हे अनेक दृष्टांतांनी समजावून दिले आहे. | अद्वैत व अनुभूती म्हणजे ब्रह्मस्वरूपता गीता हे मोक्ष सिद्धी देणारे शास्त्रांचे शास्त्र |
| १२४६ ते १२५९ | ज्ञानी विभूती कर्म ज्ञानवान होते (परमेश्वरस्वरूप होते) त्या कर्माने सर्वांना आनंदाचाच अनुभव येतो. चारी पुरुषार्थ (चौरमौळी) ज्ञानात्मकतेने सिद्ध होतात. माझ्याशी (परमात्म्याशी) समरसतेचे सुख तो भोगतो त्याला सायुज्य मुक्ती मिळते व तो अविनाशी होतो. | |
| १२६० ते १२९८ | बुद्धियोगाच्या आश्रयाने (आत्मा हेच ब्रह्म आपल्या ठायी आहे अशी एकाग्र बुद्धीने–जाणिवेने) सतत परमेश्वरनिष्ठ राहून परमेश्वरी कार्य किंवा योजना म्हणून कर्म ब्रह्मार्पण करणे अशा कर्मसंन्यासाने वर्तन करावे. अशा कर्मसंन्यास अवस्थेत प्रकृती ही गोष्टच राहात नाही. प्रकृतीही परमात्म्यात सम रस होते. निरहंकारी होऊन परमात्म समरसता साधली की आपोआपच संकटे (त्रिताप) नाहिशी होतात. अहंकारी देहभावाने जन्म मृत्यू त्रिताप फेरा सुरूच राहतो. भ्रांती सोडून अर्जुनाने स्वधर्म (क्षात्रधर्म) पालन करणे श्रेयस्कर अर्थात लोकसंमत होय. स्वधर्म स्वाभाविक स्वधर्मानुसार कर्मास सिद्ध होतोच. अर्जुनाचा अनुभव सांगून (प्रमाण देऊन) अर्जुनाचा स्वधर्म कार्यान्वित करण्याचा प्रयत्न आहे. प्रकृतीठायीच्या प्राप्त अपरिहार्य जीवनकर्माला प्रारब्ध असे नाव दिले. भोग अनिवार्य असतात. | बुद्धियोग कर्मसंन्यास अद्वैत संकल्पनांचे स्पष्टीकरण |
| १२९९ ते १३१८ | परमात्मा, प्रकृति (अविद्या/माया) यांच्या रूपाने अनेकरूपे धारण करून देहभावाने कार्य करीत असतो त्यावेळी परमात्मा (पुरुष) तटस्थ (गोसावी) राहून देहेंद्रियांच्या योगाने कळसुत्री बाहुल्यांप्रमाणे क्रीडा करवित असतो. त्या देहाकडून स्वधर्मानुसार अपरिहार्य क्रिया घडत असते. चित्ताने, मनाने, मोहवशतेने क्रीडा नाकारली तरी ती घडणारच. कारण कर्म अपरिहार्य आहे. करणारा, क्रिया ज्यावर होते ती वस्तु व क्रिया या तिन्ही गोष्टीत आत्मरूप सहभागी नसते मात्र ही प्रकृतिक्रीडा परमेश्वरसत्तेने घडते. | परमात्म्याचा पुरुष–प्रकृति योग |
| १३१९ ते १३५२ | परमशांती लाभाकरिता कर्मसंन्यास योगाने काया, वाचा, मन इ.सह परमेश्वराशी समरस व्हावे अन्यथा इच्छेनुसार वागावे. परंतु परमात्म्याचे गुह्यज्ञान (प्रत्येक भूतमात्राचे ठिकाणी ब्रह्मच आहे – ब्रह्म होऊन जगावे) या ज्ञान अवस्थेत अर्जुन मुग्ध झाला व 'अहं ब्रह्मः अस्मि'चा अनुभव घेऊ लागला. तेव्हा श्रीकृष्णांनी त्यास द्वैताची वारी (द्वैत दशा) टाकून, अद्वैत भोगावे अशी सद्गुरु आज्ञा दिली. हा उपदेश आपण आपल्याच हितासाठी (परमेश्वरस्वरूप उलगडण्याचे – अरुपाचे रूप – कळण्यासाठी) करतो आहोत असे भगवान म्हणाले. मी–तू अवस्थेची संधी घेतली. | कर्मसंन्यास योग हे परम ज्ञान साधन होय. अद्वैत अवस्था जाणून जगावे. |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) अद्वैत अनुभूतीचे वर्णन अनेक दृष्टांत देऊन कसे केले आहे वर्णन करा. (२) ज्ञानी पुरुषाच्या कर्माचे स्वरूप स्पष्ट करा. (३) बुद्धियोग, कर्मसंन्यास या संकल्पनांचा संबंध कोणत्या प्रकारे स्पष्ट केला आहे? (४) परमात्मा – प्रकृति (माया/अविद्या) रूपाने कोणत्या प्रकारे क्रीडा करतो. या क्रीडेतील पुरुषाचे (परमात्मा) कार्य स्पष्ट करा. (५) श्रीकृष्णाने कोणते गुह्य ज्ञान अर्जुनास दिले? का?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय अठरावा : सर्वगीतार्थसंग्रह योग** : भ. गी. श्लोकसंख्या ७८, ओवीसंख्या १८१० (पैकी १३५२ ते १५०८) (भाग दहावा)

**बैठक क्र. १८ दि. ८/१/२०२५ व दि. ९/१/२०२५**

वेदांचे स्वर – उपनिषदे – उपनिषदांचे सार – श्रीमद्‌भगवद् गीता – भगवद्‌गीतेची भावार्थदीपिका – श्री ज्ञानेश्वरी

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १३५३ ते १३८९ | परमात्मा हाच तुझ्या अंतरबाह्य जीवनाचा कर्म व व्यवहाराचा विषय कर. सर्वत्र माझाच अनुभव घे असा अभ्यास झाला की मी तू पण संपून जाईल. अंतिम लक्ष्य ही मीच आहे. अर्थात अद्वैत आहे याचा अनुभव येईल. सर्वत्र माझे नाव घे त्यामुळे देव आणि भक्त अद्वैत होईल. वेदांनी ज्याचे वर्णन केले ते हेच आहे याची जाणीव होईल असे श्रीकृष्णाने सांगितले. त्यावर अर्जुन म्हणाला, हे विपरित बोलणे वाटते तेव्हा श्रीकृष्ण म्हणाले, याच उपायाने मद्‌रूप होता येईल. सर्व कर्मे परमेश्वरास अर्पण केली व सर्वत्र माझेच (परमेश्वराचे) स्मरण केले तर शुद्ध ज्ञान प्राप्ती होऊन अद्वैत घडेल. गीता सर्वप्रपंच अज्ञान घालवते व परमात्म्याचे दर्शन ठायीच घडवते असा सिद्धान्त आहे. असे आत्मज्ञान परोपरीने सांगितले तेव्हा ज्ञानीपणाने धर्माधर्म कल्पना टाकू नये. | आपले अंतरबाह्य व्यवहार परमेश्वरास अर्पण केले तर स्वधर्मकर्मयोग घडेल व अद्वैत अनुभूती येईल. |
| १३९० ते १४८५ | स्वर्गनरकादी कल्पना टाकून द्याव्यात. अज्ञान नाहिसे झाले की ज्ञान म्हणजे परमात्मा एव्हढेच शिल्लक राहाते – अद्वैत होते. आत्मांशरूपाने आत्मरूपात विलीन व्हावे. ज्ञानोत्तर कृष्णार्जुनांना अद्वैत प्रेमावेग. नामामुळे द्वैत न मोडता अद्वैत साधता येते. वेदाचे मूळ सुत्र असे अद्वैत गीताशास्त्ररूपाने प्रकट केले (१४२६) गीता हे वेदाचे मूळ होय. उपपत्ती (१) परमेश्वर स्वतः ज्ञान बोध करीत आहे. (२) गीतेमध्ये सर्व प्रकृती परमात्म्यात विरून जाते (लपते) (३) ॐ (कांडत्रय) रूपाने वाणी विस्तार गीतेत झाला. कांडत्रय = कर्म, उपासना व ज्ञान ही वेदाची तीन कांडे. अवतरण हेतूने तिन्ही कांडाचे स्पष्टीकरण. १४३५ ते १४५५ अवतरणिका. सांख्य सागराविषयी निर्णय देणारा भगवद्‌गीता वेगळाच वेद आहे. (गीतेला वेदाचे स्थान दिले आहे. ही व्यासांची महती) वेद परंपरेने (कर्मठपणामुळे) त्रैवर्णिकांनाच अधिकार देणारा ठरला. त्या सर्व वर्णांतील स्त्रीशूद्र यांना ज्ञानाचा अवसर राहिला नाही. कर्मठपणाने कोंडला गेलेला वेद घाबरून प्रकट होण्यासाठी गीतेच्या उदरात शिरला. १४६५ ते ७३ पर्यंत श्री ज्ञानेश्वर–गीता थोरवी. | गीतेची थोरवी भगवद्‌गीता हा वेदांचाही वेद अद्वैत शास्त्र |
| १४८६ ते १५०८ | ज्ञान दानाविषयीच्या सूचना – तत्त्वहीन, तामस, गुरुभक्तीहीन माणसाला हे ज्ञान देऊ नये. निष्काळजी असेल तर त्याला ज्ञान देऊ नये. शास्त्राचा कंटाळा असलेल्याला हे ज्ञान देऊ नये. कपटी माणसाला देऊ नये. निंदकाला सांगू नये. हे दोष नसणाऱ्यास ज्ञान द्यावे. | ज्ञानदानाविषयी सूचना. |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) रजधर्मात्मक वर्तनातून अद्वैत योग कोणत्या प्रकारे घडेल? (२) गीता हे वेदांचे मूळ सूत्र सांगणारे शास्त्र आहे असे का म्हटले आहे? (३) गीतेची थोरवी ज्ञानेश्वरांनी कोणत्या शब्दांत वर्णन केली आहे? (४) गीतेचे ज्ञान दान करतांना कोणती सावधानता घ्यावयास सांगितली आहे?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय अठरावा : सर्वगीतार्थसंग्रह योग** : भ. गी. श्लोकसंख्या ७८, ओवीसंख्या १८१० (पैकी १५०९ ते १६६४) (भाग अकरावा)

**बैठक क्र. १८ दि. १५/१/२०२५ व दि. १६/१/२०२५**

वेदांचे स्वर – उपनिषदे – उपनिषदांचे सार – श्रीमद्भगवद् गीता – भगवद्गीतेची भावार्थदीपिका – श्री ज्ञानेश्वरी

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १५०९ ते १५५७ | कर्म, उपासना व ज्ञान या तीन मात्रांमध्ये (त्रिकांडात) प्रणव ॐ अडकून पडला होता. तो गीतारूपाने पुन्हा प्रकट झाला. ॐ एकाक्षरब्रह्म पुन्हा गीता रूपाने प्रकट झाले. असे मंत्रसामर्थ्य ज्या गीतेत आहे तीतील ज्ञान परमेश्वरावर निस्सीम भक्ती ठेवून जो योग्य ज्ञानपिपासूस सांगेल तो अखेर परमेश्वरस्वरूपच होईल. हे गीताज्ञान सांगणारा परमेश्वराला सर्वात प्रिय होतो. जो भक्त मेळाव्यात ईश्वरस्वरूप होण्यासाठी भगवद्गीता संतसभेत मांडतो. मदरूप होण्याच्या हेतूने सांगत असल्याने मद्रूपच होतो. संतांच्या सभेत जो अष्टसात्त्विक भावांसह निवेदनात रंगून जाऊन सर्वांना रंगवितो त्याच्या जीभेवर प्रत्यक्ष श्रीकृष्णच प्रकटतो इतका तो प्रिय होतो. कृष्णार्जुन संवादाचे पठण करणारा कृष्णाचे ज्ञानयज्ञाने पूजन करतो असे फल प्राप्त होते. श्रद्धावान, निर्मत्सर व्यक्तीला पठणाने पुण्य प्राप्त होऊन शुभलोक (स्वर्ग/वैकुंठ) मिळतो. श्रद्धाळू माणसाला कानावर गीता पडली तरी मोक्ष मिळतो. अश्वमेध केल्याचे फळ प्राप्त होते. ही फलश्रुती सांगून, अर्जुनाला कर्मप्रवृत्त करण्यासाठी आपण सांगितलेला सांख्य, कर्म, योग, भक्ती आणि वेदान्त समजला की व्यर्थ गेला असा प्रश्न श्रीकृष्णांनी विचारला तेव्हा अर्जुनाला ज्ञानमय अवस्थेने अष्टभाव दाटून आले. | पूज्यभावाने गीता ज्ञान द्यावे.<br><br>गीता सांगणारा सहज अद्वैत पावतो.<br><br>अज्ञानी माणसाला केवळ पठणाने सुद्धा मोक्ष मिळतो. |
| १५५८ ते १५८६ | श्रीकृष्णाच्या कृपाप्रसादाने अर्जुनाचा संदेह – (मोह–शंका) नाहिसा झाला. श्रीकृष्णाच्या आज्ञेप्रम ाणे कर्म करीन असे वचन अर्जुनाने दिले. केवळ आज्ञा म्हणून कर्म अन्यथा कृष्णार्जुन अद्वैत झाल्याने त्रिगुणात्मकताच नाहिशी झाली. श्रीकृष्ण हाच अर्जुनाचा सद्गुरु असल्याने अद्वैताने अर्जुन ब्रह्मरूप झाला. तुमळ युद्ध सुरू झाले. हे कृष्णार्जुनांचे संभाषण ऐकून संजयांनी आपणा दोघांनाही श्री व्यासांनी (बादरायण) उद्धरून कसे नेले ते धृतराष्ट्राला सांगण्यास सुरुवात केली. ते दिव्यचक्षूंमुळे आपल्याला ब्रह्मानंद भोगवित आहेत. ते ऐकूनही धृतराष्ट्रावर काही परिणाम झाला नाही. सुखाने वेडा झालेला संजय तरी सुद्धा या संवादाचे वर्णन करीतच होता. | अर्जुन निःसंदेहपूर्वक ज्ञान अवस्थेत पोचला.<br>कृष्णार्जुन अद्वैत घडले. हा प्रसंग संजयाने व्यास कृपेने अनुभवला. |
| १५८७ ते १६१५ व १६१६ ते १६६४ | श्रीकृष्णार्जुन अद्वैताचा प्रत्यक्ष अद्भूत व रोमहर्षक अनुभव आपण घेत आहोत. दोघात काया, वाचा, मन असा कोणताच भेद नाही. जे उपनिषदांनाही सांगता आले नाही ते प्रत्यक्ष अनुभवले. व्यासकृपेने मला अद्वैताचा अनुभव आला. अर्जुनाच्या निमित्ताने देवाचे बोल ऐकता आले. ह्या संवादाच्या स्मरणाने पुन्हा पुन्हा हर्ष होत आहे. संजय धृतराष्ट्र, एव्हढे अद्भूत विश्वरूप परमेश्वररूप पाहूनही काहीच प्रतिक्रिया देत नाही हे पाहून चकित झाला. तरी दुर्लक्ष करून स्वतःच्या ठायी दाटलेल्या अष्टसात्त्विक भावात मग्न झाला. धृतराष्ट्र मात्र दुर्योधनाच्या जयाविषयक भाकिताची उत्कंठेने वाट पाहात होता. अनेक अद्वैतस्वरूप साहचर्याची उदाहरणे सांगून विजय नामक अर्जुन व विजयस्वरूप श्रीकृष्ण जेथे एकत्र आहे तेथे विजय निश्चित असे सांगितले. विजय स्वाभाविक आहे याविषयी दृष्टांत दिले आहेत. याप्रमाणे संपूर्ण महाभारताचे सार 'यत्र योगेश्वरः–' या ७८ व्या श्लोकात आहे. सव्वा लाख श्लोकांचे महाभारत ७०० श्लोकांत गीतारूप झाले तेही एकाच श्लोकात एकवटले. संजय व्यासशिष्य असल्याने घडले. म्हणून हा श्लोक गीतारूपी काशीचे परमामृत आहे. | संजयाची अष्टसात्त्विक भावानुभूती<br>अद्वैतानुभूती<br><br>७८ वा श्लोक म हाभारताचे सारसर्वस्व आहे. |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) प्रणव ॐकार कशात अडकून पडला होता? तो कशाप्रकारे स्वतंत्र आणि सर्वगत झाला? (२) गीतेचे पठण, अध्ययन, श्रवण करण्याचे कोणते फळ भगवंतांनी सांगितले आहे? (३) भगवंतांनी अर्जुनाला कोणता प्रश्न अखेर विचारला? का? (४) अर्जुनाची अखेर स्थिती कोणत्या प्रकारे सिद्ध झाली? (५) कृष्णार्जुनाचा संवाद ऐकून संजयाची अवस्था कोणत्या प्रकारची झाली? (६) विजयप्राप्तीसाठीचा कोणता निर्णय संजयाने धृतराष्ट्राला ऐकवला? (७) गीतेची थोरवी श्रीकृष्णांनी कोणत्या शब्दात वर्णन केली? शेवटच्या श्लोकाचे महत्त्व कोणते?

# श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग

## वाचन, अभ्यास व चिंतनासाठी

**अध्याय अठरावा : सर्वगीतार्थसंग्रह योग** : भ. गी. श्लोकसंख्या ७८, ओवीसंख्या १८१० (पैकी १६६५ ते १८१०+५) (भाग बारावा)

**बैठक क्र. १८ दि. २२/१/२०२५ व दि. २३/१/२०२५**


वेदांचे स्वर – उपनिषदे – उपनिषदांचे सार – श्रीमद्‌भगवद् गीता – भगवद्‌गीतेची भावार्थदीपिका – श्री ज्ञानेश्वरी

| ओवी क्र. | विषय | विशेष नोंद |
|---|---|---|
| १६६५ ते १७०७ | जो गीतेचा सेवक होईल तो स्वानंद साम्राज्याचा चक्रवर्ती होईल. तीत सर्व शास्त्रे (आगम) एकवटले आहेत. गीता ही श्रीकृष्णाची वाङ्मयमूर्ती आहे. अनुष्टुभ छंदात स्त्रीशूद्रांनाही समजेल असी भाषा वापरली. आईच्या ममतेने विषयांचे घास भरविले. श्रीकृष्ण मुखीच्या बोलाच्या रूपाने व्यासांनी विश्वावर थोर उपकार केले आहेत. तोच ग्रंथ मी मऱ्हाठीत आणला आहे असे ज्ञानेश्वर म्हणतात. | गीता महती कथन – श्रोतृसंवाद ओ. १६६१ ते १७०७ |
| १७०८ ते १७२४ | श्री ज्ञानेश्वरीची रचना कोणत्या प्रकारे घडत आहे याचे निवेदन आपल्या शक्तीनुसार आपण ग्रंथ सांगत आहोत. तो आपला जन्मसिद्ध अधिकार आहे (माशी, कळशी, पाखरू इ. दृष्टांत) तसे प्रत्येकाने विहार केलाच पाहिजे. व्यासांप्रमाणे आमच्या आवाक्याप्रमाणे ज्ञानसाधनेत आम्हालाही यश मिळणारच म्हणून आम्ही प्राकृतात देशीकार (मराठी) ओवी हा बंध लिहून गीता सांगितली तर ते अनुचित नव्हे. व्यासांचा मागोवा घेत भाष्याकार (श्री आद्य शंकराचार्य तत्सम भाष्यकार) यांचे मार्गदर्शन घेत सांगत असल्याने अयोग्य कसे घडेल? अज्ञान नाहीसे करण्यासाठी आपण हे सांगत आहोत. | तत्कालीन कर्मठ पाखंडी संस्कृत आग्रही लोकांना श्री ज्ञानेश्वरांनी उत्तर दिले आहे. श्रोतृसंवाद हेतु – गीतार्थ सांगून आनंद/ज्ञानाचे आवार मांडायचे आहे. |
| १७२५ ते १७९३ | सद्‌गुरु हेच परमात्म्याचे स्वरूप आहे या श्रद्धेने सद्‌गुरु गौरव करीत असतांना माझ्या मुखे गीता भाष्य होणे आश्चर्य नाही. गुरुकृपेने श्वासोच्छवासही प्रबंध होतात. मराठी मुळातच आंगचीच सुंदर (मराठीचा अभिमान). गीता मुळातच अमृत आहे. त्यावरील भाष्य आपोआपच काव्य सुमधुर होते. ही केवळ गुरुकृपा होय. शास्त्रज्ञानाची गुरुपरंपरा शक्तीला (पार्वतीला) शिवशंकराने सांगितली. ते मत्स्याच्या पोटात मच्छिंद्रनाथांनी ऐकले – चौरंगीनाथ – मीनानाथ – गोरक्षनाथ – सर्वेश्वरांनी (गोरक्षनाथ/शिव) शांभवीविद्या (शिवाद्वैत–अमृतानुभवात आलेले तत्त्वज्ञान) – गहिनीनाथांना लाभले – त्यांनी श्री निवृत्तीनाथांना आज्ञा केली. म्हणून शिवशंकरांपासून परंपरा आहे. माझ्या निमित्ताने श्री निवृत्तीनाथांनीच हे ज्ञान देऊन जगाचे रक्षण केले. यशस्वी प्रवचनाचे श्रेय गुरू आणि श्रोते यांना दिले. गीतार्थरूपी आवारात श्रीगुरुरूपी लिंगपूजन केले. भावार्थदीपिका ही निवृत्तीनाथांनी श्री ज्ञानेश्वरांसाठी प्रतिसृष्टी उभी केली. (सांख्य पुन्हा प्रकटविले) त्यामुळे माझे धर्मकीर्तन (स्वधर्मकीर्तन–प्रवचन व प्रबोध) हा ज्ञानेश्वरांचा स्वधर्म सिद्ध झाले. | श्रोतृ संवाद |
| १७९३ ते १८०० | पसायदान | |
| १८०१ ते १८१० | निवृत्तीनाथांनी पसायदान मन्तव्य सिद्ध होईल असा आशीर्वाद दिला. कलियुगात, महाराष्ट्र मंडळात (बृहन्महाराष्ट्रात), श्री गोदावरी कुळातील दक्षिणेकडील (प्रवरा/अमृतवाहिनी) त्रिभुवनात जगाचे जीवसूत्र (जगत्माता–म्हाळसाई–पार्वती) श्री महालया (पार्वती) हीच सृष्टी व तीच शिवात महाप्रलय घडविते (अमृतानुभव) तेथे यादव कुळातील रामचंद्र यादव न्यायप्रिय व भूमिपति आहे. शिवसाक्षीने त्यांच्यापासून सुरू झालेल्या निवृत्तीनाथ सुत (पुत्र/शिष्य) यांनी देशीभाषेत व्याख्यान केले. महाभारतात भीष्मपर्वात श्रीकृष्णार्जुन संवादातून गीता प्रकटली – शके १२१२ मध्ये ही टीका ज्ञानेश्वरांनी केली. सच्चिदानंदबाबांनी आदरपूर्वक लेखनिक म्हणून काम केले. | रामदेवरावांचा उल्लेख |
| १ ते ५ | श्री संत एकनाथ यांचे निवेदन – शके १५०६, तारण नाम संवत्सरात जनार्दनस्वामीशिष्य एकनाथ यांनी ज्ञानेश्वरी प्रतिशुद्ध केली. भाद्रपदात कपिलाषष्ठी योगावर गोदातटी पैठण येथे लेखन पूर्ण झाले. श्री ज्ञानेश्वरांची ओवी ही अमृताप्रमाणे आदर्श न भूतो न भविष्यती आहे. | |

### आकलन व चिंतनासाठी प्रश्न

(१) ज्ञानेश्वरकृत गीता थोरवी स्पष्ट करा. (२) ज्ञानेश्वरांची गुरुपरंपरा सांगा. (३) पसायदानातील आशय स्पष्ट करा. (४) ज्ञानेश्वरांचा स्वधर्म कोणता? (५) भगवद्‌गीतेला शास्त्रांचे शास्त्र असे का म्हटले आहे?

# प्राचार्य डॉ.अनिल सहस्रबुद्धे
# यांचा व्यक्ती-परिचय



**नाव** : अनिल नागेश सहस्रबुद्धे

**जन्म** : २४ ऑगस्ट १९४७ (अकोले, अहमदनगर तथा अहिल्यानगर)

**शिक्षण** : टी.डी., बी.एड., एम.ए. (मराठी), पीएच.डी.

**पत्ता** : 'आई', समर्थनगर, श्रीराम चौक, (हॉटेल सागरच्या मागील बाजूस), पाईपलाईन रोड, अहमदनगर. महाराष्ट्र.
दूरध्वनी (०२४१) २४२४१६७, भ्रमणभाष ९८८१५००९४२.
usahasrabuddhe@gmail.com, Website : www.anilsahasrabuddhe.in

**सर्व वाङ्मयप्रकारांमध्ये लेखन. २०२४ पर्यंत ८५ पुस्तके/ग्रंथ प्रसिद्ध**

**पीएच.डी.**

'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास'. पीएच.डी.साठी प्रबंध पुणे विद्यापीठ. पीएच.डी. १९७९-८०.

## प्रसिद्ध साहित्य

**अ) संशोधन / समीक्षा / वैचारिक :**

**लोकसाहित्य :**

१) चाळीसगावडांगाणी (खंड १) लोकवाङ्मय- आनंदोत्सव प्रकाशन मंच, ३१ डिसेंबर २०१३.
२) चाळीसगावडांगाणी (खंड २) लोकबंधात्मक आकलन- आनंदोत्सव प्रकाशन मंच, ३१ डिसेंबर २०१३.
३) लोकसाहित्य विचार : सविता प्रकाशन, औरंगाबाद १९९०.
४) लोकबंध : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९९५, द्वितीय आवृत्ती नितीन प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे २०१२.
५) लोकसाहित्य संशोधन पद्धती : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९९७, द्वितीय आवृत्ती नितीन प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे २०१२.
६) लोकसाहित्याचा अन्वयार्थ : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २००३.
७) लोकसाहित्याच्या अभ्यासातील चकवे आणि उतारे : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २०१०.
८) लोकबंधात्मक चिकित्सा : नितीन प्रकाशन पुणे, प्रकाशक श्री. नितीन गोगटे, २०१२.
९) लोककला, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २०२१.
१०) लोकसंस्कृती व लोकसाहित्य, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद २०२१.

**संत साहित्य :**

१) 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९९१, द्वितीय आवृत्ती २००५.
२) लोकी अलौकिक तुकाराम : प्रकाशक डॉ. लहवितकर प्रोफेसर व प्रमुख श्री तुकाराम अध्यासन, पुणे विद्यापीठ, पुणे २०१२.
३) (सार्थ) 'बालावबोध' : समर्थ स्वामी त्र्यंबकराज महाराज (भावानुवाद) - समर्थ स्वामी त्र्यंबकराज देवस्थान ट्रस्ट, देवळाली प्रवरा, राहुरी, अहमदनगर २०१२.
४) '(सार्थ) योगसंग्राम' संत श्री शेख महंमद महाराज (भावानुवाद) : संत श्री शेख महंमद महाराज उत्सव समिती ट्रस्ट श्रीगोंदा, अहमदनगर २०१४.
५) 'संतांचिया संगे' : मोरया प्रकाशन, पुणे/डोंबिवली २०१४.
६) श्री संत शेख महाराजकृत अभंगवाणी : श्री संत शेख महंमद महाराज देवस्थान उत्सव प्रतिष्ठान व ग्रामस्थ, श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर, फेब्रुवारी/मार्च २०१७.
७) संत वाङ्मयाच्या आशयनिष्ठ अभ्यासाची दिशा : गंधर्ववेद प्रकाशन, पुणे, २४ ऑगस्ट २०१८.
८) संत वचनांची मात : गंधर्ववेद प्रकाशन, पुणे २०२१.
९) संत प्रबोधित मनोस्वरूप विचार : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे, २०२१.
१०) अमृतगुटिका : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२१
११) स्वरूपाशी संवाद : पसायदान, आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२२.
१२) हरिपाठ (हरिपाठाचे मर्मलक्षी विवेचन) : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२२.

**साहित्यशास्त्र / समीक्षा :**

१) प्रस्तावना : स्वरूप आणि संकल्पना : पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००७.
२) समीक्षा : प्रयोजन आणि कार्य : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २००८.
३) 'साहित्याची समग्रता' : चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद २०१७.
४) वाङ्मय संस्कृती : साद-संवाद, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २४ ऑगस्ट २०१९.

**संशोधन / तत्त्वज्ञान / वैचारिक :**

१) अन्नासाठी दाही दिशा : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २००२.
२) आदिमांचे वर्तमान, चिन्मय प्रकाशन, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), २०१५.
३) लोकनिष्ठ अध्यात्मवाद : पद्मगंधा प्रकाशन, पुणे २०१६.
४) 'लोकधर्म' : आनंदोत्सव, नगर २०१६.
५) 'लोकार्थ'– आनंदोत्सव नगर २०१७,
६) शोध पांडुरंगाचा : पद्मगंधा प्रकाशन, पुणे, डिसेंबर २०१९.
७) चिंतन मोती : आनंदोत्सव, नगर २०१८.
८) मनोस्वरूप विचार : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे, २०२१.
९) संतप्रबोधित मनोस्वरूप विचार : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे, २०२१.
१०) रामदासांचे वैश्विक रामराष्ट्र : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२२.
११) प्रवरा परिक्रमा : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे, २०२२.
१२) नमामि देवी अमृते : आनंदोत्सव, नगर, २०२२.
१३) महर्षी अगस्तिमुनी दर्शन : श्री अगस्तीऋषी देवस्थान ट्रस्ट, अकोले, अहिल्यानगर, २०२३.
१४) उत्सव : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे, २०२३.
१५) गोदावरी तीरीच्या अगस्त्यलीला, आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहिल्यानगर, २०२४.
१६) समाधी साधन : वीहा पब्लिकेशन्स, अहिल्यानगर, २०२४.

**चरित्र :**

१) संत शेख महंमद महाराज : गंधर्ववेद प्रकाशन, पुणे (संत द्वादशी प्रकल्पांतर्गत)– जुलै २०१८.
२) 'कैवल्यगंध' : आनंदोत्सव, नगर २०१६.
३) हनुमान चरित्र : गंधर्ववेद प्रकाशन, पुणे २०२१.
४) राष्ट्रयोगी : (प.पू. गोविंददेवगिरी महाराज चरित्र व सार्थ दर्शन), मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे, २०२४.

**ब) ललित साहित्य :**

**कादंबरी :**

**अ) सामाजिक :**

१) डांगाणी : परिमल प्रकाशन. औरंगाबाद १९८५.
२) काळ साद घाली : 'अद्‌भूत कादंबरी' मासिक, संपा. ग. वा. बेहेरे १९८६.
३) वावटळ : राजेंद्र पब्लिकेशन पुणे/ठाणे १९८७.
४) भेद : राजेंद्र पब्लिकेशन पुणे/ठाणे १९८८.
५) मातंगी : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे १९९२.

**ब) नवप्रयोगात्मक :**

१) सत्यनारायण थापाडे पाटील : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे १९९३.
२) परवेडा : प्रीती प्रकाशन, पुणे २००२.
३) अनंत : विमल पब्लिकेशन प्रा. लि. पुणे, मार्च २०१९.

**क) पौराणिक चरित्रात्मक :**

१) 'अगस्त्य' : पद्मगंधा प्रकाशन, पुणे २८, फेब्रु. २०१०, द्वितीय आवृत्ती २०१७. ('अगस्त्य' कादंबरीचा इंग्रजी अनुवाद व कन्नड अनुवाद ई-बुक).
२) 'नारद': पद्मगंधा प्रकाशन, पुणे २०१७.
३) 'राधा' : पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०२४.

**ड) अद्‌भूत :**

१) क्षयवटाच्या पारंब्या : राहुल प्रकाशन, मुंबई १९९२.

**इ) ऐतिहासिक :**

१) अहिनकुल : परिमल प्रकाशन, औरंगाबाद १९८६.

**कथासंग्रह :**

१) इंडियन फ्रायडूच्या चंद्री आणि इतर कथा : क्रिएटिव्ह कम्युनिकेशन, नगर २००१.
२) कारव : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे २००२.
३) विलक्षण : प्रीती प्रकाशन, पुणे २००३.

४) नारद ब्रेकींग न्यूज : पद्मगंधा प्रकाशन, पुणे, एप्रिल २०१२
('बापाचे बाप सोऽहम' - नारद ब्रेकींग न्यूज, इंग्रजी अनुवाद प्रा. स्फूर्ती सहस्रबुद्धे-देशपांडे, आनंदोत्सव प्रकाशन, द्वितीय आवृत्ती)

**नाटक :**

१) भरारी आणि भानगडी : नंदा प्रकाशन, मुंबई २००१.
२) संभव असंभव : प्रीती प्रकाशन, पुणे २००२. (नाटकांचे विविध प्रयोग झाले)
३) जातक यज्ञ : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२१.

**एकांकिका :**

१) कातळी निखारे : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे २००३.

**कवितासंग्रह :**

१) आव्हान : स्फूर्ती प्रकाशन, नगर १९९४.
२) कोऽहम : हेमंत प्रकाशन, नगर २००६.
३) प्रिया : हेमंत प्रकाशन, नगर २००६.
४) श्री अगस्त्य महात्म्य : प्रकाशक सौ. उषा सहस्रबुद्धे, नगर (प्रथमावृत्ती) २००८, (द्वितीय आवृत्ती, प्रकाशक श्री अगस्ती देवस्थान ट्रस्ट अकोले फेब्रुवारी २०१८) (पोथी)
५) मानसतरंग : क्रिएटिव्ह प्रकाशन, डिसेंबर २०११.
६) ऋषी लोपामुद्रा चरित्र : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर, (फेब्रुवारी २०१८)
७) ऋषी अगस्त्य नित्यपाठ-अभंग : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर, (फेब्रुवारी २०१८)
८) श्री अगस्त्यऋषी अभंगावली : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर, (फेब्रुवारी २०१८).
(श्री अगस्त्य महात्म्य कन्नड अनुवाद श्री. श्रीकांत पाठक, कल्याण, आनंदोत्सव, नगर २०१५)
('आव्हान'चा हिंदी अनुवाद डॉ. अमरजा रेखी ('चुनौती') आनंदोत्सव प्रकाशन, द्वितीय आवृत्ती)
('प्रवरामाय' कवितेचा इंग्रजी अनुवाद प्रा. स्फूर्ती सहस्रबुद्धे-देशपांडे, आनंदोत्सव प्रकाशन, द्वितीय आवृत्ती)
९) आरती संग्रह : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२२

**ललित/चिंतनात्मक :**

१) जनात आणि मनात : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे २००२.
२) मनात आणि अवकाशात, मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे २००३.
३) स्पंदन शिल्पे : आनंदोत्सव प्रकाशन मंच, नगर, ऑगस्ट २००९.
४) गौरव गाभारा : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२१.
५) मनाशपथ खरं सांगेन - साक्ष ७५, मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे २०२२.

**संपादित :**

१) ज्ञानवेध : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे १९९० (डॉ. मोरजे गौरवग्रंथ)
२) तेजाची लेणी : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९९९ (स्वातंत्र्यवीर सावरकर, कवी कुसुमाग्रज आणि शाहीर अमरशेख यांच्या राष्ट्रीय जाणिवेच्या निवडक कवितांचा संग्रह. पुणे विद्यापीठाचे एफ.वाय.बी.ए.साठी नेमले गेलेले पाठ्यपुस्तक.)
३) 'अभंगपौर्णिमा' या ग्रंथात समीक्षालेखन सहभाग आणि संपादन साहाय्य, अभंगपौर्णिमा प्रकल्प प्रमुख, आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर. अभंगपौर्णिमा : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २०११.
४) आनंदमेळा - कविसंमेलन : आनंदोत्सव प्रकाशन मंच, नगर २०१२.

**प्रासंगिक :** विविध दैनिके आणि नियतकालिके यांतून विपूल लेखन.

**मिळालेले महत्त्वाचे पुरस्कार :**

१) आदर्श शिक्षक पुरस्कार (१९८७), महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषद. अहमदनगर.
२) 'विद्वत् पुरस्कार' : 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' या ग्रंथास 'कांची कामकोटी पीठ', जगद्गुरु शंकराचार्यांकडून ज्ञानेश्वरी लेखन सप्तशताब्दी वर्षात महाराष्ट्रातील निवडक नऊ विद्वानांत विद्वत पुरस्कार (१९९२).
३) संशोधन पुरस्कार : 'लोकबंध' ग्रंथास लोकसाहित्य संशोधन मंडळ, औरंगाबाद येथील संशोधन पुरस्कार (२०००).
४) अकोले गौरव पुरस्कार : अकोले (जन्मगावी) लोकरंजन प्रतिष्ठानच्यावतीने साहित्य क्षेत्रातील कामगिरीबद्दल 'अकोले गौरव' पुरस्कार २० फेब्रुवारी २०१०.
५) तत्त्वज्ञानविषयक श्रेष्ठता पारितोषिक : 'अगस्त्य' कादंबरी, 'अगस्त्य महात्म्य' उपासना पोथी, यासह अन्य लेखनातील तत्त्वज्ञान प्रसृतीकरणाबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषद श्रेष्ठता पारितोषिक २००९-२०१० या वर्षातील महाराष्ट्र साहित्य परिषदेचे राजा फडणीस पुरस्कृत रामाचार्य अवधानी तत्त्वज्ञानविषयक लेखन पारितोषिक. (१६ मे २०१०)

६) साहित्य सेवा पुरस्कार : समग्र साहित्यिक कामगिरीबद्दल 'साहित्यसेवा' पुरस्कार द्वारा पद्मश्री विखे पाटील फौंडेशन प्रवरानगर २०१२
७) जीवनगौरव पुरस्कार : द्वारा- गुरुकुल भागवताश्रम, चिचोंडी पाटील, अ.नगर २०१४
८) अभिजात मराठी पारितोषिक : 'चाळीसगावडांगाणी (खंड-१) - 'लोकवाङ्मय' व 'चाळीसगावडांगाणी (खंड २) लोकबंधात्मक चिकित्सा' या खंडात्मक ग्रंथास अभिजात मराठी पारितोषिक (सामाजिक शास्त्रे या विषयांतर्गत स्वतंत्र ग्रंथास) द्वारा- महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, २०१४.
९) राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार : चाळीसगावडांगाणी खंड १ व २ साठी 'लोकगंगा' राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार २०१४
१०) वैचारिक वाङ्मयाचा मु. ब. यंदे पुरस्कार : 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' या ग्रंथास नाशिक सार्वजनिक वाचनालयाचा वैचारिक वाङ्मयासाठीचा मु. ब. यंदे पुरस्कार २०१७
११) तत्त्वज्ञान व मानसशास्त्र ना. गो. नांदापूरकर पुरस्कार : 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' या ग्रंथास महाराष्ट्र शासनाचा स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजनेअंतर्गत सन २०१६ चा एक लाख रुपयांचा 'ना. गो. नांदापूरकर पुरस्कार' २०१७. (वितरण मराठी भाषा गौरव दिनी २७ फेब्रुवारी २०१८)
१२) आदिवासी जीवनावरील उत्कृष्ट लेखन जीवनगौरव पुरस्कार : कै. यशवंतराव भांगरे आदिवासी विकास प्रतिष्ठान, शेंडी (भंडारदरा डॅम) अकोले यांच्यावतीने 'आदिवासी जीवनावरील उत्कृष्ट लेखन जीवनगौरव पुरस्कार' २९ जानेवारी २०१८.
१३) श्रीपाद जोशी ग्रंथकार पुरस्कार : संदर्भग्रंथ अनुवाद आंतरभारती कार्य यासाठीचा 'श्रीपाद जोशी ग्रंथकार पुरस्कार' मे २०१८
१४) महर्षी अगस्त्य लोकरत्न पुरस्कार : स्वरानंद प्रबोधिनी, अहमदनगर जुलै २०१८.
१५) साहित्यभूषण पुरस्कार : कै. काकासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फौंडेशन, अहमदनगरचा 'साहित्यभूषण' पुरस्कार १३ जानेवारी २०१९.
१६) पूर्णाचार्य पुरस्कार : भारतीय गुरूसेवा मंडळ व जीवन कला मंडळ, औरंगाबाद यांच्यावतीने कै. पंडित किसनरावजी पाडळकर स्मृती पुरस्कार, २४ फेब्रुवारी २०१९
१७) संत सेवा गौरव पुरस्कार : संत शेख महंमद महाराज देवस्थान उत्सव प्रतिष्ठान व ग्रामस्थ, श्रीगोंदा यांच्यावतीने ह.भ.प. तथागत श्रीरंग अंबादास लोखंडे स्मरणार्थ पुरस्कार, १४ मार्च २०१९.
१८) ग्रंथ पुरस्कार : 'श्री संत शेख महमद महाराज' या गंधर्ववेद प्रकाशन प्रकाशित ग्रंथास कै. श्री. ना. बनहट्टी स्मृति ग्रंथ पुरस्कार 'पुणे नगर वाचन मंदिर', पुणे, एप्रिल २०१९.
१९) कृतज्ञतापूर्वक कार्य गौरव पुरस्कार : महर्षी अगस्तिमुनी देवस्थान ट्रस्ट अकोले, अ'नगर २०२२.
२०) ग्रंथोत्तेजक सभा पुणे चा 'लोककला' ग्रंथासाठी अतिसन्मानाचा राज्यस्तरीय पुरस्कार २०२२.
२१) ज्ञानविज्ञान पुरस्कार : ज्येष्ठ नागरिक मंच, सावेडी, अ'नगर २०२४.
२२) संत साहित्य गौरव पुरस्कार : मुंबई मराठी साहित्य संघ २०२४.

**विशेष लक्षणीय उपक्रम**

१) महर्षी अगस्तिमुनी कथा ज्ञानयज्ञ - सप्तदिवसीय कथा ज्ञान यज्ञ सादरीकरण.
२) 'जातकयज्ञ' संगीत नाटकाचे प्रयोग.
३) २०२३ पासून ते २०२५ श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग - आचार्य पदावरून श्री ज्ञानेश्वरी अभ्यास अध्यापन, चिंतन.

**डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्या साहित्यावर झालेले संशोधन आणि समीक्षा ग्रंथ**

* ओंजळीतले मोती, संपादक डॉ. माहेश्वरी गावित, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, २००६.
* डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांचे साहित्य : स्वरूप आणि आविष्कार, संपादक डॉ. भीमा मोदळे व डॉ. सुभाष शेकडे, प्रकाशक- क्रिएटिव्ह कम्युनिकेशन, २००३.
* ज्ञानबीजाचा विस्तारू, संपादक डॉ. माहेश्वरी गावित, डॉ. सुभाष शेकडे, डॉ. उज्ज्वला जाधव, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, २४ ऑगस्ट २००७.
* डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्या कादंबरीवर १ पीएच.डी., ७ एम.फिल. झाले आहेत.
* डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्या समग्र साहित्यावर १ पीएच.डी. करत आहे.

**डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांचे संकेतस्थळ** : www.anilsahasrabuddhe.in

संकेतस्थळावर 'अहिनकुल', 'डांगाणी', 'अगस्त्य', 'नारद' अशी जवळपास २० पुस्तके फ्री डाऊनलोड केलेली आहेत. ती पाहता येतील.
अनेक लेखकांचे, समीक्षकांचे डॉ. सहस्रबुद्धे यांच्यावरील अभिप्राय विस्तृतपणाने उपलब्ध आहेत.
'साहित्ययात्री' ही स्वतंत्र पुस्तिका २००३ पर्यंतच्या वाङ्मयाचा परिचय करून देते. ती स्वतंत्र प्रसिद्ध आहे.